पडद्यामागील बालगंधर्व

सौ. पद्मा खेडेकर
आणि
दुर्गाराम खेडेकर

व्हीनस बुकस्टॉल : पुणे २

प्रकाशक

सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.

व्हीनस बुकस्टॉल, पुणे २

●

१ ली आवृत्ती : १५ जुलै १९६८

●

●

मूल्य

रुपये चार मात्र

●

मुखपृष्ठ

श्री. सुधाकर खासगीवाले

●

मुद्रक

दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक)

चित्रशाळा प्रेस

५६२ सदाशिव पेठ, पुणे २.

मनीषा

लेखिका म्हणून लिहिणे मला जमण्यासारखे नाही व माझे ते क्षेत्रही नव्हे. माझे परमपूज्य पिताजी कै. ती. नाना (बालगंधर्व) यांच्याविषयी वाटणाऱ्या भक्तिभावाने प्रेरित होऊन, माझ्या मनश्चक्षूंसमोर सदैव वावरणाऱ्या त्यांच्या स्मृती उजळण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून हे मला न साधणारे कार्य करण्याचे धाडस मी करीत आहे.

पूर्वनियोजनात्मक असा काहीच विचार नसल्याने, यात ग्रथित झालेले प्रसंग तारीखवार लिहिता आले नाहीत. आतापर्यंत त्यांच्याबद्दल पुष्कळच लिहिले गेले आहे व गुणगौरवही मोठ्या प्रमाणात झालेला आहे; पण त्यांच्या निकट सान्निध्यात माझा जो काळ गेला त्या वेळच्या त्यांच्या गुणधर्मानुसार घडलेल्या प्रापंचिक गोष्टींच्या स्मृती मनातल्या मनात साठवून, घोळत बसण्यापेक्षा, केवळ वेगळा मार्ग म्हणून त्या ग्रथित करण्याचा हा प्रयत्न आहे.

या लेखनाची कालमर्यादा १९३२-३३ पासून पुढची असली तरी मागील कित्येक गोष्टींचा संदर्भ त्यात येणे अपरिहार्य आहे. लेखनाचा सराव नसल्याने सुचेल आणि आठवेल त्याप्रमाणे घडलेल्या गोष्टी निवेदन करण्याचा प्रयत्न केला असल्याने त्यात सुसंगती न दिसल्यास वाचकांनी दोषारोप करू नये अशी विनंती.

या संग्रहातील दुसऱ्या विभागात दुर्गाराम (मास्टर दुर्गाराम) यांनी नानांच्या सहवासात आल्यापासूनच्या (१९३२) घटना आणि प्रसंग अनुभवले त्यासंबंधी लिहून आपली श्रद्धाञ्जली वाहिली आहे. मनात आले ते सांगितले अशा रीतीने हे लिहिण्याचे ठरल्याने, स्थळकाळाविषयी त्यात निश्चितपणा दर्शविता आला नाही याबद्दल दोष देऊ नये. ज्या भक्तिभावाने आणि अमर्याद प्रेमाने रसिक जनतेने माझ्या स्वर्गस्थ पिताजींना जोपासले त्याच्या शतांशाने जरी या कृतीकडे काणाडोळा केला तरी मी कृतार्थ होईन.

कोल्हापूर
१५-७-१९६८

सौ. पद्मावती दुर्गाराम खेडेकर

आठवणींचा बटवा उघडण्यापूर्वी

रंगभूमीवरचे बालगंधर्व असंख्य रसिकांनी तीन तपांपेक्षा अधिक काळ पाहिले असले तरी 'पडद्यामागचे बालगंधर्व' पाहण्याची संधी ज्यांना लाभली त्यांची संख्या—असंख्यांच्या तुलनेत किती तरी मर्यादितच आहे. बालगंधर्वांच्या कन्या सौ. पद्मा आणि तिचे पती दुर्गाराम, यांनी या पुस्तकांत रंगभूमीवरील बालगंधर्वांच्या काही आठवणी सांगितल्या असल्या, तरी पडद्यामागील बालगंधर्वांच्या भावभावनांचे दर्शन हेच या आठवणींचे वैशिष्ट्य आहे. उदार आणि दिलदार स्वभाव, विश्वातील माङ्गल्यावरील—देवदेवतांवरील—गुरुजनांवरील—अण्णासाहेब किर्लोस्कर आणि भाऊराव कोल्हटकर यांनी निर्माण केलेल्या संगीत रंगभूमीच्या, महान् परंपरेवरील निष्ठा सुखदुःखांना सारखेच लेखणारी स्थितप्रज्ञता असे पडद्यामागील बालगंधर्वांच्या वृत्तीचे अनेक पैलू होते. रंगभूमीवर भूमिका करीत असताना नाटककाराने निर्माण केलेल्या भूमिकेच्या भावभावना बालगंधर्व इतक्या तद्रूपतेने आणि कौशल्याने व्यक्त करीत असत, की त्यांच्या गायनाभिनयामुळे रसिक मंत्रमुग्ध होत असत. परंतु, त्यांच्या स्वतःच्या भावभावनांचे दर्शन मात्र ते पडद्यामागे गेल्यानंतरच घडत असे. बालगंधर्वांनी त्यांच्या उभय कन्यांना लिहिलेले पत्र या पुस्तकात प्रसिद्ध केले आहे. बालगंधर्वांच्या गायनाभिनयापासून लाभणाऱ्या आनंदात तल्लीन झालेल्या प्रेक्षकांना, त्यांच्या अंतःकरणाचा सतत दाह करीत असलेल्या—आणि त्या पत्रांत व्यक्त झालेल्या दुर्दैवाच्या ज्वालांची यत्किंचित तरी कल्पना कधी आली असेल का? नाटकाच्या सुरुवातीला धूप जाळावा अशी मराठी रंगभूमीची परंपरा आहे. स्वतः आमूलाग्र जळत असतानासुद्धा आपल्या सुगंधामुळे सभोवतालच्या वातावरणात प्रसन्नता आणि पवित्रता निर्माण करावी, असेच बालगंधर्वांचे

जीवन होते. बालगंधर्वांविषयीच्या अनेक आठवणींचा सौ. पद्मा आणि दुर्गाराम यांच्या मनांत जो कोंडमारा झाला होता त्याला तोंड फोडण्या-साठी त्यांनी त्यांच्या आठवणी कोणताही आडपडदा न ठेवता सांगून टाकल्या आहेत. त्यांच्या दृष्टीला बालगंधर्व जसे दिसले तसेच्या तसे त्यांनी वाचकांसमोर उभे केले आहेत. बालगंधर्वांविषयीच्या आठवणींना कोणताही प्रचारात्मक किंवा साहित्यिक साज चढविण्याची असमर्थता, हाच या आठवणींचा गुणविशेष आहे.

स्त्रीवेष परिधान करून बालगंधर्वांनी रंगभूमीवर पाऊल टाकले म्हणजे ते अतिशय सुंदर दिसत असत. परंतु स्त्रीजातीच्या अनेक भावभावनांचा आपल्या अभिनयाने आणि गायनाने ते जो अविस्मरणीय आविष्कार करीत असत, तो त्यांच्या सौंदर्यापेक्षाही अधिक सुंदर होता. किंबहुना, वाढत्या वयावरही मात करणारे तेच त्यांच्या सौंदर्याचे सामर्थ्य होते ! त्यांच्या गायनाभिनयाने असंख्य पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा मोहित केले होते. विश्वातील सौंदर्याचे आणि माङ्गल्याचे दर्शन घडविण्याचा आपला अधिकार एका पुरुषाने हिरावून नेला म्हणूनच की काय, अपमानित झालेल्या नियतीने त्यांच्या जीवनाला जी एक सर्वस्वी अकल्पित आणि विपरीत कलाटणी दिली, त्या प्रकरणातील प्रारंभीच्या प्रसंगाची आठवण दुर्गाराम यांनी कथन केली आहे. दुर्गाराम यांनी सांगितलेल्या आठवणींत सत्याचा आभास निर्माण करून, तो आभास म्हणजेच सत्य आहे असे प्रस्थापित करण्याची करामत नसून जे खरोखरच घडले त्याचे त्यांनी निवेदन केले आहे. दुर्गाराम यांच्या नजरेसमोर घडलेल्या घटनांचे कोडे अद्याप त्यांना सुटले नसल्या-मुळे, हताश होऊन ते मंत्रतंत्रासारख्या अघोरी साधनांचा हवाला देतात ! पण मला मात्र वाटते की, ज्या घटनेचा उगम दोषात नसून दुर्दैवात असतो, तिचे कोडे कोणाला कधीच उलगडता येणार नाही !

बालगंधर्वांविषयी आतापर्यंत जितके लिहिले गेले तितके मराठी रंगभूमीवरील दुसऱ्या कोणत्याही नटाबद्दल लिहिले गेले नाही. परंतु बालगंधर्वांच्या निकटच्या सहवासाचे भाग्य लाभलेल्या त्यांच्या नातेवाइकांनी त्यांच्याविषयी लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. या आठवणींत पांडित्याचा लवलेशसुद्धा नसला तरी प्रामाणिकपणा आहे. सौ. पद्मा आणि दुर्गाराम यांनी सांगितलेल्या आठवणींवर श्री. अनंतराव लिमये यांच्या हौसेचा प्रकाश पडल्यामुळे, बालगंधर्वांच्या पहिल्या स्मृतिदिनाचा योग साधून पडद्यामागच्या बालगंधर्वांचे दर्शन वाचकांना घडत आहे.

पुणे
१५-७-१९६८

वसन्त शान्ताराम देसाई

व्हीनस बुक स्टॉल
अप्पा बळवंत चौक, पुणे २
१५ जुलै १९६८

आदराञ्जली

नटसम्राट कै. नारायणराव राजहंस – बालगंधर्व यांसी सादर नमस्कार विनंती विशेष.

आज बरोबर एक वर्ष झालं. आपण आपल्या स्वतःच्या माहेरी म्हणजेच गंधर्वनगरीत निघून गेलात. दर्शन अशक्य झाले. स्मृती मात्र अजूनही रेंगाळत आहेत. तुमचा अभिनय पाहण्याचे आणि संगीत ऐकण्याचे थोडेफार भाग्य आम्हांस लाभले. पण महाराष्ट्रात आणि जिथे जिथे मराठी भाषा बोलली जाते अशा किती तरी ठिकाणी तुम्हांला न पाहिलेले लोक आहेत. ज्यांनी तुम्हांस पाहिले त्यांपैकी बहुतेकांनी रंगभूमीवरच तुमचे दर्शन घेतले होते. रंगभूमीवर तुम्ही प्रवेश केल्या-पासून पडद्याआड जाईपर्यंत अवघ्या प्रेक्षकांची नजर तुमच्यावर खिळून असे; पण तुमच्या खाजगी जीवनातून काही कथा सांगता आल्या तर पहाव्या असा आम्ही विचार केला. आज ज्याप्रमाणे संगीताच्या बाबतीत तुमच्या ध्वनिमुद्रिकांवरच आम्हांला समाधान मानून घ्यावे लागत आहे, त्याप्रमाणेच तुमचे स्मृतिशेष हेच आता आमच्यासाठी उरले आहेत.

तुमची कन्या सौ. पद्मावतीबाई व जावई श्री. दुर्गाराम खेडेकर यांनी आठवणींची जबाबदारी उचलली. श्री. के. टी. देशमुख, श्री. बापुराव नाईक, राजदत्त आर्टस् स्टुडिओ, श्री. तेजुमलशेठ, डॉ. वाबळे,

श्री. केशवराव भोळे यांनी चित्रांच्या व इतर बाबतींत मदत करून या आठवणींचे नेपथ्य सजवले. श्री. वसंत शान्ताराम देसाई यांनी या आठवणींच्या बटव्यातील गुपित उघड करून दाखवले. श्री. खाजगीवाले यांनी मुखपृष्ठ सजविले. व्ही. जोशींनी ठसे तयार केले. केसरी मुद्रणालयाने मुखपृष्ठ व इतर चित्रांची छपाई केली. चित्रशाळा मुद्रणालयाने छपाईची जबाबदारी उचलली. या सर्वांच्या मदतीने या वाङ्मयीन प्रयोगाची सर्वसिद्धता झालेली आहे. ही सेवा भाक्तिभावे घ्यावी एवढीच प्रार्थना आहे. कळावे.

आपले

अ. ह. लिमये

सौ. सुलोचना लिमये

श्री.नारायण
श्रीपाद
राजहंस
ऊर्फ
बालगंधर्व



नटसम्राट्
बालगंधर्व
ऊर्फ
नारायण
श्रीपाद
राजहंस



माझे स्वर्गीय मायबाप !

तीर्थरूप नाना (बालगंधर्व) यांच्या
प्रथम वार्षिक पुण्यतिथी-दिनी
सादर समर्पण

सौ. पद्मावती दुर्गाराम खंडेकर

१५-७-१९६८

स्थलान्तर व कुटुंब-व्यवस्था

पुढे आजीबाईंचे बिऱ्हाड शुक्रवार पेठेतील साने यांच्या वाड्यात नं. २१३ येथे गेले आणि आम्ही प्रभात टॉकीजजवळील जमखंडीकरांच्या नवीन ब्लॉकमध्ये राहू लागलो. माझी थोरली बहीण सरोजिनी (सौ. नलिनीबाई वाबळे), मी तिला माई म्हणते, तिचा विवाह झाल्याने, ती केव्हा केव्हा घरी येऊन–जाऊन असे. नाना व बापूकाका 'गंधर्व कंपनी' बरोबर फिरतीवर असल्याने, पुण्यास येतील तेव्हा त्यांचे वास्तव्य वरील ठिकाणी व्हावयाचे. एकंदरीत माझा ओढा आजीबाईंच्याकडे आणि थोरल्या काकांच्या मुलांकडे असल्याने माझे जाणेयेणे तेथे फार असे. आजीबाईंनीही मला अखेरपर्यंत ममतेने वागवले.

पुण्यास नानांचा फार मोठा मित्रपरिवार होता. त्यातील नेहमीच्या बैठकीतील म्हणजे पापासाहेब चिपळूणकर, सातपुते बंधू (मनोहरपंत, रमाकान्त, माधवराव), बाबूराव व दत्तोपंत खाडिलकर, मामा मिटकर, दादासाहेब रानडे इत्यादी मंडळी नाना पुण्यास असले म्हणजे आजीबाईंच्याकडे अगर दादा रानडे यांच्या दुकानी जमत असत. शिवाय इतर बरेच लोक भेटीच्या निमित्ताने येत–जात असतच.

कुटुंबातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती

गंधर्व कंपनीचा मुक्काम जेव्हा जेव्हा मोठमोठ्या शहरी, म्हणजे मुंबई, बडोदा, सोलापूर, कोल्हापूर, सातारा अशा ठिकाणी जात असे, त्या वेळी आम्ही सर्व कुटुंबीय मंडळी कंपनीच्या मुक्कामी जाऊन राहात असू. नाना रंगमंचावर नटसम्राट म्हणून प्रसिद्ध असले तरी आमच्या घरीसुद्धा एकेकांचे स्वभावधर्म व वागणे एखाद्या कसलेल्या नटासारखे असे. थोरले काका दादासाहेब हे आजीबाईंच्या अर्ध्या

वचनात वागत असत. त्यांचा भोळाभाबडा व गरीब स्वभाव आणि आपल्या मातोश्रींबद्दल वाटणारा प्रेमादर यामुळे कित्येकदा विनोद निर्माण होत असे. त्यांच्या जेवणाखाण्यावर आणि बाहेर जाण्यायेण्यावरसुद्धा आजीबाईंचा करडा पहारा असायचा; आणि तेही एखादी लहानसहान गोष्टसुद्धा आपल्या मातोश्रींना विचारल्याशिवाय करीत नसत. 'मी थोडा वेळ उभा राहिलो तर चालेल का?' किंवा जेवताना 'हे खाऊ की ते खाऊ' याचीसुद्धा ते परवानगी घेत असत. आजीबाईसुद्धा त्यांना (GET UP) ऊठ, (GO OUT) गो आउट, (NO) नो, वगैरे शब्दांनी हुकूम करून सांगत तेव्हा त्यांचा आविर्भाव एखाद्या कसलेल्या नटासारखा असे. त्या वेळी त्या इंग्रजी शब्द उच्चारीत. अजूनसुद्धा तेव्हाच्या प्रसंगांचे स्मरण झाले म्हणजे एक प्रकारचे कौतुक वाटते.

वेळेचे भान नसे

मुंबईसारख्या ठिकाणी कंपनीचा मुक्काम असे तेव्हा बहुतेक पुण्याची मित्रमंडळी जमायची. शिवाय इतर लोकांचीही वर्दळ असायचीच. कुटुंबातील सर्व मंडळी अशा वेळी कंपनीच्या जागेतच राहात असल्याने, आजीबाईंची नजर नानांच्यावर असायची. चार स्नेही मंडळी जमली, आणि जर नाना त्यांच्याशी गप्पागोष्टीत रंगले आणि वेळेचे भान राहिले नाही, तर आजीबाई बैठकीत येऊन— "तुला काही समजते की नाही? आज नाटक नाही का? स्नान केव्हा करणार? विश्रान्ती केव्हा घ्यायची?" वगैरे गोष्टी चार लोकांत सुनावत असत! त्या वेळचा त्यांचा मुद्राभिनय व हावभाव कौतुकास्पद वाटे. त्यांच्या मनात राग नसे— फक्त नानांनी वेळच्या वेळी सर्व गोष्टी कराव्यात हाच हेतू असे. त्या वेळी नाना जर त्यांच्या सांगण्याप्रमाणे उठून गेले तर त्या आपण स्वतः त्या मंडळीत येऊन मंडळींशी गोष्टी करीत बसत.

तीन मिनिटांत मी काय गाणार ?

सन १९३५ मध्ये नाना 'प्रभात' फिल्म कंपनीत काम करीत होते. 'धर्मात्मा' पिक्चर चालले होते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे, शान्ताराम बापू म्हणायचे की, "अहो नाना ! तुम्हांला तीन मिनिटांतच गाणं म्हणायचं आहे ! तेव्हा त्या दृष्टीनं सुरुवात करा !" नाना म्हणायचे की, "अहो बापू ! तुम्ही मला तीन मिनिटांत गाणं आटपा म्हणता कसे ? त्यापेक्षा तुमच्या त्या सिनेमात मला कामच करायचं नाही !" म्हटल्याप्रमाणे त्या वेळच्या चालू चित्रपटाचे काम संपताच, त्यांनी पुन्हा नाटकात कामे करायला सुरुवात केली.

बालगंधर्वांशिवाय 'गंधर्व नाटक मंडळी'

माझे धाकटे काका श्री. बापूराव राजहंस आणि माझे पती दुर्गारामजी हे दोघे नानांच्या पश्चात गंधर्व कंपनी चालू ठेवून नानांच्या भूमिका करीत असत. काका 'सावित्री आणि द्रौपदी' या नाटकात भूमिका करीत असत. पण त्यांना मनापासून रंगभूमीवरील कामाचा कंटाळा असे. इतर सर्व नाटकांत दुर्गारामजी नानांच्या भूमिका करीत होते. सर्व गंधर्व संचात त्या होत असल्यामुळे त्यांत फारशी उणीव भासत नव्हती. नानांनी जेव्हा 'प्रभात'मधून आपले अंग काढून घेतले तेव्हा ताबडतोब आपल्या नेहमीच्या भूमिका करायला, कंपनी चालूच असल्याने पुढे अडचण भासली नाही.

नानांना कोणालाच गाणे शिकविता आले नाही, किंवा त्यांना ते जमलेच नाही. माझ्या थोरल्या बहिणीला म्हणजे सौ. नलिनीबाई बाबळे हिला त्यांनी थोडेफार सांगितले,— म्हणजे तिनेच त्यांच्याकडून मिळविले होते असे म्हणणे योग्य होईल. 'बालगंधर्व–प्रभात'मध्ये नानांचे सिनेमात काम चालू असताना शान्ता आपटे या बहुतेक

वेणी पडली,-पण गाणे रंगले

नगर मुक्कामी मूकनायक नाटकातील सरोजिनीची भूमिका बालगंधर्व करीत असताना दुसऱ्या अंकातील सरोजिनीच्या पदाच्या ऐन गाण्याच्या रंगाच्या वेळी 'अवचित गेले किंकर करिं मी' हे पद बालगंधर्व म्हणत असताना त्या पदात अंतऱ्याच्या वेळी एखादे मशीन फिरल्याप्रमाणे त्यांच्या गळयातून मधुर ताना गरगर फिरत होत्या. तानांच्या ऐन रंगाच्या वेळी बालगंधर्वांचा टोप व गंगावनाचा बुचडा सुवासिक फुलांच्या वेणीसह खाली पडला. त्या दिवशी तो टोप चांगला बांधला गेला नसल्यामुळे अर्थातच ऐन वेळी फुलांच्या वेणीसहित तो खाली पडला. झालेल्या प्रकारामुळे बालगंधर्व किंचितही गांगरले नाहीत. उलट मोठ्या शिताफीने शालूचा खांद्यावरचा पदर त्यांनी डोक्यावर घेतला. आतील अंगच्या छोट्या केसांचा भांग चापूनचोपून बसलेला होता. त्यामुळे पुष्कळशा प्रेक्षकांच्या ध्यानात टोप पडल्याची गोष्ट आलीच नाही. बालगंधर्वांनी ते पद व त्यापुढील दोन्ही पदे उत्तम म्हटली. त्या तिन्ही पदांस वन्समोअरच्या टाळ्या झाल्या. तो प्रवेश संपवून बालगंधर्व आत आले.

आमच्या जिमखान्यावरील बंगल्यात गाणे शिकण्याच्या उद्देशाने येत असत. नाना म्हणायचे, "मला शिकवता येत नाही. मी म्हणून दाखवीन."


स्वतःच्या वास्तूत राहणे शक्य नाही

नानांचे 'प्रभात'मध्ये काम चालू असताना डेक्कन जिमखान्यावरील ज्या बंगल्यात आम्ही राहात होतो, तो अदमणे यांचा बंगलाच खरेदी करावा, म्हणजे सर्व कुटुंब एकाच ठिकाणी राहू शकेल, अशी आम्हा सर्वांची फार इच्छा होती. पण-'गंधर्व कंपनी'ला कर्ज असताना मी बंगल्यात (स्वतःच्या) राहणे ही गोष्ट योग्य होणार नाही. तुम्हा इतरांना त्यात काय सुख वाटते कोण जाणे- असे ते म्हणत. माझ्या कंपनीतील मंडळींचे हित मला बघितले पाहिजे असे त्यांनी बजावले, व हेच ध्येय शेवटपर्यंत अमलात आणले. स्वतःच्या सुखदुःखाची पर्वा त्यांनी कधीच केली नाही. कंपनी हेच त्यांचे सुखसर्वस्व होते.

इंजेक्शन घेऊन का होईना,- मी गाणारच

नानांची आपल्या कुलदैवतावर- श्रीजोतीबावर अतिशय भक्ती ! कोल्हापुरास येत असत त्या त्या वेळी ते श्रीजोतीबाच्या दर्शनास न चुकता जात असत. एकदा असेच ते त्यांचे कोल्हापूरचे परम स्नेही श्री. बाबूराव जमदग्नी यांच्याकडे मुक्कामास होते. तेथे नित्य गाण्या-बजावण्याच्या बैठकी होत असत. एकदा गाण्याच्या वेळी नानांचा दम्याचा विकार बळावला. अॅटॅक येऊन आवाज निघणेही अशक्य झाले. सर्वांच्या मते गाणे बंद ठेवावे असे ठरले व पुढे गाणे म्हणू नये असे सर्वजण सांगू लागले. पण थोडा वेळ थांबून नाना म्हणाले की, "डॉ. राशिंगकरांना बोलवा ! एक इंजेक्शन घेऊन मी पुन्हा गाणं म्हणणार; नाही तर, बाप्पा, सर्वांचा विरस होईल. इच्छा अशी की, कोणीही नाराज होता कामा नये." त्यांचे इतके धैर्य आणि मनोनिग्रह पाहून त्यांच्या सर्व चाहत्यांना आणि स्नेह्यांना त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटली तर त्यात काय नवल ?

हेहि
नारायणरावच



पणजी-गोवा
न्याशनल थियेटर
गं. ना मंडळी

श्री. तारीख २० मार्च. सन १९४१

श्रीकेदारनाथप्रसंन्न

चिरंजीव सौभाग्यवती सरोजिनीला नारायणाचा अनेक आशिर्वाद चिरंजीव पद्माला माझा अनेक आशिर्वाद. चिरंजीव पद्मास ताप येत होता, हे ऐकून, वाचून मनाला काय वाटले ते लिहिता येत नाही. यापुढील माझे आयुष्य अगदी बाहेर जाणार असे वाटते प्रभू कृपेने आयुष्यातील ५३ वर्षे फुकट गेली. हे नशीबच झाले. परंतु आयुष्याचा शेवट गोड साधला पाहिजे, परंतु ते नशीबी दिसत नाही. आता माझे आयुष्याचे काही विलक्षण धोरण झाले. आणि ते चांगल्या तऱ्हेने यांचा शेवट लागेल असे वाटत नाही मी या परिस्थितीला कंटाळलो आहे. याचे फार फार वाईट वाटते. मी जे काही केले ते गंधर्व कंपनीकरिताच केले. तुम्हाला तुम्ही माझे आहात म्हणून कळविले तो इतकेच

अनेक आशिर्वाद. कळावे.

आपला.

नारायण.

देहदंड

वरील प्रसंगाच्या अगदी उलट उदाहरण म्हणजे, गंधर्व कंपनीचा अहमदनगर येथे मुक्काम असतानाची गोष्ट. माझ्या आईची आणि नानांची काही गोष्टीवरून बोलाचाली झाली. असे प्रसंग काही ना काही कारणावरून वरचेवर येत असत. पण या प्रसंगी– भर दुपारी बारा वाजता कंपनीच्या बिऱ्हाडातील वरच्या तापलेल्या पत्र्यावर, उन्हात पाय भाजत असताना उघडे–बोडके ते उभे राहिले. कंपनीतील इतर मंडळी जेवणाकरिता खोळंबली होती. नानांचे बॉडीगार्ड म्हणून काम करीत असलेले श्री. तळेगावकर यांनी त्यांची परोपरीनें विनवणी केली की, " नाना ! असं तुम्ही करू नका ! तुम्ही उन्हात उभे राहिले आहात, पण चटके आम्हांला लागताहेत ! " हरतऱ्हेने सांगूनसुद्धा ते ऐकत नाहीत असे दिसल्यावर सर्व मंडळींनी त्यांना बजावले की, " तुम्ही जर ऐकत नाही तर आम्हीसुद्धा कोणी जेवत तर नाहीच, पण पाण्याचा थेंबही तोंडात घेणार नाही. " त्या वेळी मात्र कंपनीतील मंडळीचे आपल्यावरील प्रेम पाहून त्यांना गहिवरून आले. त्यांचा दरारा व वचक जितका मंडळींवर होता तितकेच प्रेमही होते.

कंपनीतील गाण्याची साथ करणारे तबलजी श्री. तिरखवांखांसाहेब, ऑर्गनची साथ करणारे श्री. हरीभाऊ देशपांडे, व ज्यांना मी चचाजी म्हणत असे ते थोर कलावंत श्री. कादरबक्ष सारंगिये,– या सर्वांवर नानांचा जितका दाब होता तितकेच प्रेमही होते. जास्त जबाबदारी ऑर्गनच्या साथीदाराची असे. सूर देण्यात थोडी जरी कसूर झाली तरी त्याची धडगत नसायची. श्री. हरीभाऊ देशपांडे यांनी त्यांच्या हातचा वेताच्या छडीने मार खाल्ला आहे ! पण नंतर नाना म्हणत असत, " फार लागलं का रे हरी ? " हरीभाऊंसाठी नानांनी डोळ्यांतून

पाणीही काढले आहे, व 'हरीशिवाय नाटक होणार नाही' असेही उद्गार त्यांनी वेळोवेळी काढले आहेत.

'देवा, आज आवाजच लागला नाही!'

नानांच्या हिशेबी एकही नाटक त्यांच्या मनासारखे झाले असे होत नसे. ज्या दिवशी प्रेक्षकांनी नाटकाची वाहवा आणि गाण्याची तरफदारी करावी, आणि आत येऊन "तुम्ही आज किती चांगले गायलात!" अशी प्रशंसा करावी, तर त्यांचे ठराविक उत्तर असे की, "देवा, आज आवाजच बरोबर लागला नाही हो!" अशी गोष्ट किती तरी वेळा होत असे. कोल्हापुरास मुक्काम असताना अशीच एक गोष्ट म्हणजे, 'एकच प्याला' नाटक होते व नानांना त्या वेळी दम्याचा त्रास होत होता. वयाने तर साठी गाठली होती. इतके असूनही नाटक इतके रंगले की, नाटक पहावयास आलेले सुप्रसिद्ध नट श्री. पृथ्वीराज कपूर यांनी अंक संपल्यावर आत येऊन स्टेजवर नानांना मिठीच मारली, व "वाहवा! क्या काम है, बहोत खुषी हुई!" इत्यादी उद्गार काढले. हा देखावा डोळ्यांनी पाहिलेला आहे.—असे एकेक प्रसंग!

सौ. हिराबाईंचा भक्तिभाव

ती. नानांच्याबद्दल अत्यंत प्रेम, आदर व भक्ती या गोष्टी श्री. सौ. हिराबाई बडोदेकर यांच्याजवळ मला आढळून आल्या. नानासुद्धा सौ. हिराबाईंना अतिशय मानीत असत. "हिराताई फार समजून गाते हं!" असे ते म्हणत. एकदा सौ. हिराबाईंचे 'सौभद्र' नाटक होते, तेव्हा त्यांना गाणी म्हणताना उभे राहण्याचा त्रास झालेला दिसला; तेव्हा नाना म्हणाले, "हिराताई! तुला खुर्चीवर बसून गाणी म्हणायला काही हरकत नाही." या सांगण्याचा अर्थ एवढाच घ्यायचा की, खऱ्या कलावंताला व गुणी व्यक्तींना असले बारीकसारीक दोष माफ असतात. नाना हे तर नटसम्राटच होते, व त्यांच्या अशा किती तरी गोष्टींबद्दल

प्रेक्षक सहानुभूती दाखवीत होते. त्यांना त्या क्षम्य होत्या. रंगभूमींचे ते सत्ताधारी सम्राट म्हणूनच वावरले.

सर्वच अचाट, असामान्य, आणि अजब !

नानांना अंग-मालिश करून घेण्याची सवय होती. लागोपाठ जर दोनतीन नाट्य-प्रयोग झाले तर त्यानंतरच्या सकाळी हा अंगमालिशचा कार्यक्रम तैलमर्दनासह एकदोन तास तरी चालायचा. कंपनीच्या स्टेज-कडील पैलवानी पेशाच्या एखाद्या गड्याकडे हे काम असायचे. मालिशचे हे काम चालू असताना त्या इसमाच्या अंगातून घामाच्या धारा निथळत असत; पण नाना हू की चू न करता तास दोन तास निमूटपणे अंगमर्दन करून घेत. त्यानंतर मग स्नानाची सिद्धता ! हे स्नान म्हणजे कंपनीतील पाण्याच्या कामासाठी असलेल्या इसमाने एका मोठ्या पातेल्याने अगर बालडीने त्यांच्या अंगावर पाणी ओतीत राहाणे ! त्याकरता साठ सत्तर घागरींपेक्षा मोठे हौदासारखे लाकडी पीप सर्वांच्या उपयोगाकरता असायचे,– तेच त्यांच्या स्नानाकरता भरून राखून ठेवीत असत. मुंबई-सारख्या ठिकाणी उन्हाळ्याच्या दिवसांत नळाचे पाणीदेखील तापलेले असायचे. अशा वेळी स्नानाकरता बर्फाचा उपयोग करण्यात येई. दिवसातून सकाळ–संध्याकाळ असे दोन वेळ स्नान व्हायचेच; नाटक असले तर त्यानंतर व्हायचे ते तिसरे स्नान ! त्यांच्या बाबतीत सर्वच असामान्य आणि अघटित होते. बर्फाने गार केलेल्या पाण्याशिवाय ते कधीही पाणी पीत नसत. गार पाण्याचे थर्मास घरी व थिएटरमध्ये भरून ठेवलेले असायचे.

पुण्यातील संस्थानी लग्नसोहळा

१९३० साली माझी थोरली बहीण सरोजिनी (आता सौ. नलिनीबाई वाबळे) हिचे लग्न पुण्यात झाले त्या वेळी मी लहान होते, पण चार घोड्यांच्या गाडीत बसल्याचे मला चांगले आठवते. असा लग्न-समारंभ

पुण्यात पूर्वी झाला नाही असे लोक बोलत असत. बहिणीच्या लग्नाचा थाट इतका अपूर्व होता की, संस्थानिकांनाही तसा जमणे शक्य झाले नसते. लग्नाला नानांची जेवढी मित्रमंडळी होती तेवढ्या सर्वांना पटका, काळी शेरवानी, सुरवार असा एकाच पद्धतीचा पोषाख नानांनी केला होता. वरातीच्या वेळी नाटकांतीलच पदे वाजवली पाहिजेत असा तेथील सुप्रसिद्ध सनईवादनकार श्री. ग्यानबा यांना दंडक घातला होता. आणि त्यांचाही नानांची पदे वाजवण्याबद्दल हातखंडा व प्रभुत्व होते. वरातीत चार घोड्यांची फुलांनी सजवलेली बगी आणि मागे भरजरी शालू-शेले लपेटलेल्या स्त्रियांची मालिका, व नंतर एकाच पोशाखातील नानांची असंख्य मित्रमंडळी,- असा हा अपूर्व थाट व सोहळा पाहण्यास सर्व पुणेकर मंडळी रात्रभर तटस्थ होती. तो काळही वेगळा होता.

नाट्यप्रेमी, रसिकश्रेष्ठ श्रीमान लोहियाशेठजी, कोल्हापूर

अगदी अलीकडचीच गोष्ट म्हणजे, कोल्हापूर येथील शुगर मिल्सचे जनरल मॅनेजर श्रीमान शेठ लोहियासाहेब यांनी १९६७ च्या गणेश उत्सवात स्वयंवर नाटक बसवण्याचे ठरवून त्या दृष्टीने त्यांनी स्वत: इतके कष्ट घेतले की, खऱ्या मार्मिक रसिकाशिवाय व खऱ्या कलासक्त व्यक्तीशिवाय ही गोष्ट कोणालाही साध्य अगर शक्य झाली नसती. त्या नाटकाला साजेसा उत्तम सरंजाम त्यांनी जमवून आणला. गंधर्व कंपनी-प्रमाणे तो झाला पाहिजे अशी दृष्टी ठेवली. नानांच्याबद्दल त्यांच्या मनात अत्यंत प्रेमादर आहे. नानांच्याबद्दल जेव्हा जेव्हा गोष्टी निघतात तेव्हा तेव्हा ते गहिवरून येतात व आपल्याला त्यांची नाटके ऐन अमदानीत पाहण्याचे भाग्य लाभले नाही म्हणून दु:खी होतात. 'स्वयंवर' नाटक त्यांनी स्वत: अतोनात श्रम घेऊन आणि स्वत:चा अमूल्य वेळ खर्च करून इतके सुंदर प्रदर्शित केले की दृष्टच लागावी. त्याकरता त्यांनी खर्चाकडेही पाहिले नाही. त्यांच्या कलासक्त मनाप्रमाणे

साजशृंगार करून, नाटकाला भव्य स्वरूप आणले. ते नाटक पाहण्याचा मला योग आला आणि त्या वेळी नानांची फार आठवण झाली. नानांचा ' स्वयंवर ' नाटकातील " दादा, ते आले ना ! " म्हणत असतानाचा प्रवेश, म्हणजे नुसत्या पायांच्या चवड्यांवर अधीरपणाने चालणे, निरखून पुन्हा पुन्हा पाहणे, व मध्येच (शिशुपालाकडे पाहून) स्वाभाविक लाजणे, या गोष्टी खरोखरच सोळा वर्षांच्या मुलींनाही लाजवतील अशाच होत्या.

बादशाही थाट आणि रंग-सुगंध

आम्ही लहानपणी नाटकाला जाऊन पहिल्या खुर्चीवर बसत असू ! अत्तराचा वास आला की, आता नाना स्टेजवर येणार असे ओळखायचे. ठराविक वासाचे ते अत्तर असायचे. अत्तरांची खरेदी बैठकीला हजारांनी होत असे, आणि जेवढे उत्कृष्ट आणि भारी तेवढ्याचीच खरेदी व्हायची. त्यांच्या कपडे बदलण्याच्या खोलीत ज्या त्या खेळांची त्या दिवसाच्या नाटकाची पातळे (शालू वगैरे) मांडून ठेवलेली असत. नाटकाच्या पूर्वी अमुक सेट काढून ठेवण्याबद्दल ते त्यांची वेषभूषा करणाऱ्या श्री. जामदार यांना सांगत असत. अंगाला व शालू-पातळांना अत्तरे फासलेली असायची.-असा हा षोक.

कै. गोविंदरावजी टेंबे यांचे उद्गार !

नानांच्या त्या नाटकांचे नुसते स्मरण झाले तरी त्या आठवणीने आपण कोठे तरी स्वर्गात, गंधर्वनगरीत वास करीत होतो असे वाटते. नाटकात काम करताना ते भूमिकेशी इतके तद्रूप होऊन जात असत की, आपण कोणी पुरुष आहोत हेही ते विसरून जात. असे म्हणतात की, कै. गोविंदरावजी टेंबे यांनी असे उद्गार काढले आहेत : ' नारायणराव ! तुम्ही देवयानी आणि आपण कच (' विद्याहरण ' नाटकात) असताना मी सर्वस्व विसरून जाऊन तुमच्यावर मोहित होतो,-मग माझे स्टेजवरील सर्व काम फिक्के पडते. ' काय हा दैवी प्रभाव !

अहो, मी पुरुष आहे !

याच्या उलट एक प्रसंग असा की, एकदा चारपाच कॉलेजकन्यका नानांना भेटण्याकरिता आल्या होत्या. बोलता बोलता त्या सहज म्हणाल्या की, “ मला बाई लाज वाटते हे वाक्य साभिनय म्हणून दाखवा ! ” तेव्हा नाना म्हणाले, “ मी स्त्री-भूमिका करतो तेव्हा स्त्री असतो ! आता पुरुष आहे. आता मला तसं म्हणायला जमायचं नाही.” असे अर्धनारीनटेश्वर आमचे नाना होते. तितकेच भोळे, तसेच तापट; खरोखर शंकराचा अवतार होते. ते रागावले म्हणजे आम्ही त्यांना दिसत नसू. आम्ही त्यांना फार भीत होतो. आपला शब्द खरा केल्याशिवाय ते कधी रहात नसत.

कोणत्याही नाटकात नाना इतके समरस व्हायचे की त्यांना नाटक चालू आहे हे भानच नसायचे. ‘ एकच प्याला ’ नाटकातील शेवटच्या प्रसंगात सुधाकर दारूच्या धुंदीत मुलाला मारतो व सिंधूही मरते. तेव्हा सिंधू म्हणते, “ ऐकलं का ! मला मांडी द्यायची होती.” हा प्रसंग अजूनही डोळ्यांसमोर उभा राहतो. कुलवंत घराण्यातील आर्य पतिव्रतेचे खरेखुरे चित्र त्या वेळी पहावयास मिळत असे. अशी नाटके आणि असे अंतःकरणाला भिडणारे प्रसंग पुन्हा पहायला आता मिळणार नाहीत.

मायबापांनो ! माझ्या काय पाया पडता !

कंपनी पंढरपुरास असतानाची सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे कोणती तरी एकादशी होती, आणि ‘ कान्होपात्रा ’ नाटक लागले होते. थिएटर अगदी भरगच्च भरलेले. नाटक पहात असताना प्रेक्षकांची पापणीही हाललेली दिसत नव्हती. शेवटी पांडुरंगाच्या पायांवर डोके ठेवून कान्होपात्रा जेव्हा मरते, तेव्हा नाटक संपून पडदा पडतो. नाटक संपले, पण लोकांना त्याचे भान न राहता त्यांनी स्टेजवर चढून एकच कल्लोळ केला

की, आम्हांला कान्होपात्रेचे दर्शन पाहिजे. स्टेज-मॅनेजरला काय करावे याचा विचार पडला ! एवढ्यात कसला गलबला झाला म्हणून नाना तसेच मेकअप (रंगभूषा) न उतरवताच बाहेर आले.– तेव्हा काय विचारावे ! लोकांनी त्यांच्या पायांवर आपल्या डोई ठेवल्या ! आणि नाना, ‘ अरे देवा ! हे काय करता आहात ? ’ असे म्हणत असतानाच, ‘ झाले आमचे काम ! ’ असे म्हणून लोक चालू लागले.

पंढरपूर येथील पूजा–महोत्सव

त्याच पंढरपुरातील गोष्ट. नानांच्या मनातून पांडुरंगाला महापूजा व अभिषेक करण्याची इच्छा झाली. पंचामृत स्नानाकरता लगेच तयारी सुरू झाली. कोऱ्या दुधाच्या घागरींनी दूध आणले गेले व विरजण लावून पंचामृत स्नानाची सिद्धता झाली. श्री. विठ्ठलाला भरजरी पोशाखही तयार केला गेला. पहाटे पाच वाजता चंद्रभागेत स्नान करून पंचामृतस्नान व पूजा सुरू झाली. आतील गाभारा पंचामृताने भरून गेला. हा सोहळा पहायला सर्व पंढरपूर लोटले होते. नानांनी सर्वांना आपल्या हाताने पंचामृताचा तीर्थप्रसाद वाटला. ही खरी भक्ती !

असा षोक, अशी उदारता !

नानांना नीटनेटकेपणा आणि कपड्यांचा अतिशय षोक ! रंगभूमीवर काय अगर इतर वेळी काय, कपडे ठाकठीक व व्यवस्थित असले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष होता. रंगभूमीवर त्यांना पाहिलेल्या सर्वांना याची प्रचीती आली आहेच, पण ज्यांनी त्यांचे घरगुती पुरुष-वेषातील व स्त्री-वेषातील असंख्य फोटो पाहिले असतील त्यांना जास्त काही सांगायला नको. कंपनीच्या जागेतील त्यांच्या खोलीत नेहमी वापरण्याच्या कपड्यांच्या तीन–चार भल्या मोठ्या ट्रंका असायच्या. दर आठ दिवसांतून एकदा तरी सर्व ट्रंका पुसून, स्वच्छ करून, कपड्यांच्या घड्या

नीट घालण्याचा व व्यवस्थित ठेवण्याचा कार्यक्रम असे. अशा वेळी एखादा कंपनीतील नोकर जाता-येताना दिसला तर "अरे, इकडे ये जरा" म्हणून बोलावून "हा कोट अंगाला येतो का पहा" असे त्यांनी म्हटले म्हणजे, त्या माणसाला स्वर्ग दोन बोटे उरल्याचा आनंद होई. तो कोट अंगात घालून दुसऱ्या दिवशी मिरवताना त्याला धन्यता वाटायची, आणि मालकांचे आपल्यावर किती प्रेम आहे हे कळायचे!

स्वतःचे कपडे स्वतः आवरणे, आपल्या खोलीचा केर काढणे, आपल्या मनाप्रमाणे अंथरूण घालणे व काढणे वगैरे गोष्टी नाना स्वतःच करीत असत. एखाद्या नोकराने म्हणावे, 'नाना! हे तुम्ही का करतां? मग आम्ही कशाला आहोत?' तेव्हा ते म्हणायचे, 'अरे बाप्पा! माझ्या मनासारखं तुम्हांला नाही जमायचं! माझं मला करू दे.' त्यांचे काम करण्यास सर्वजण अगदी उत्सुक असत, पण नाना कोणालाच स्वतःचे काम सांगत नसत. नाटकाच्या वेळी काम करताना एखाद्याने कसूर केली अगर नीटनेटकेपणाकडे दुर्लक्ष केले तर मात्र त्याची धडगत नसे. त्या वेळी मात्र कडक कायदा! "अन्न खाता की शेण खाता?" अशी संभावना होई. अशा वेळी ते कोणाही नटाची अगर साथीदाराची गय करीत नसत. तात्पर्य, त्यांना अव्यवस्थितपणा आजिबात खपत नसे.

विविध वेष आणि पोशाखाचा थाट

एखाद्या मोठ्या ठिकाणी किंवा संस्थानिकाकडे भेटीस जायचे असले म्हणजे तास-तासभर त्यांचे पोषाखाचे काम चालायचे. काळी लांब शेरवाणी, सुरवार, कोल्हापुरी फेटा– असा त्यांचा आवडीचा पोषाख असे. फेटा व्यवस्थित बांधला गेला की नाही हे पुन्हा पुन्हा आरशात पाहून, तो मनासारखा येईपर्यंत पोषाखाचे कार्य पूर्ण होत नसे. आणि अशा वेळी बहुतेक त्यांच्याकरता आलेली गाडी खाली वाट पहात थांबलेली असायची, असे बहुतेक होत असे. पण पुढे हा कपड्यांचा षोक वयपरत्वे कमी कमी होत जाऊन, फक्त अर्धी चड्डी व हाफ् शर्ट याच वेषात ते वावरू लागले.

प्रेक्षकांसाठी पाणीवाले

बालगंधर्वांनी गंधर्व मंडळीचा थाट काही काही बाबतीत किर्लोस्कर मंडळीच्या सवाईने ठेवला असे दिसून येते. नाटकाच्या दिवशी नटांना दूध, चहा, कॉफी, सोडा, लेमन, कंपनीच्या खर्चाने मिळे. दररोजचे जेवण सरदारी थाटाचे असून जेवणानंतर सर्व मंडळीस पान, सुपारी, तंबाखू इत्यादी वस्तू कंपनीच्या खर्चानेच मिळत. प्रवासाचा थाट औरच! बालगंधर्व फॅमिली फर्स्ट क्लासमध्ये, तर पन्नास रुपये पगारावरील सर्व नोकर सेकंड क्लासमध्ये. बाकी सर्व थर्ड क्लासमध्ये. प्रवासाच्या वेळी फराळ म्हणजे जणू दिवाळीच! सुमारे १०० छोटी ताटे, वाट्या व फुलपात्री प्रवासाच्या वेळी स्पेशल. सर्व नोकरमंडळींच्या सोयीसाठी मुंबई ते गोवा अशी स्पेशल बोट बालगंधर्व मंडळीने गंधर्व मंडळीकरिता केली होती. ही १९३२ सालची गोष्ट. अलीकडे कित्येक वर्षे दरमहा श्रीसत्यनारायणाच्या पूजेचा थाट व पक्कान्नाचे जेवण– प्रत्येक गावचे गंधर्वांचे इष्टमित्रसुद्धा सांगू शकतील! यवतमाळहून भाज्या खरेदीस उमरावतीस नेहमी बाजार मास्तर जायचा. नाटकाच्या दिवशी शेकडोशे लोक चहा पिऊन तृप्त व्हावयाचे! उन्हाळ्यात हजारो प्रेक्षकांकरिता अनेक माठ ठेवून थंड पाणी, त्यासाठी गुजराथी पाणीवाले स्पेशल ठेवणे वगैरे सर्वच थाट सवाई खरा! किर्लोस्कर मंडळीतदेखील दररोजचे जेवण गड्यापासून मालकापर्यंत गंधर्व मंडळीप्रमाणेच होते!

माझे थोरले काका दादासाहेब हे बहुतेक घरी पुण्यासच असत. ते म्हणत की, 'आम्हां सर्वांकरता नारायणाला फार कष्ट पडतात. त्याच्या एकट्याच्या जीवावर आणि श्रमावर आम्ही सर्वांनी खायचे आणि चैन करायची हे बरे नव्हे.' आपल्याही अंगी काही प्रमाणात नाट्यगुण आहेत अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती, आणि त्या दृष्टीने आपणही नानांच्या कष्टांत सहभागी व्हावे व भार हलका करावा म्हणून नानांना म्हणत की, "आपल्याला नेहमी जमायचं नाही, पण जेव्हा जेव्हा आपण कंपनीबरोबर असू, किंवा कंपनी पुण्यास येईल तेव्हा तरी आपल्याला नाटकात काही तरी भूमिका दे! म्हणजे तेवढाच आपण हातभार लावल्यासारखं होईल." त्यांच्या त्या भूमिका ठरल्यासारख्या झालेल्या होत्या. 'एकच प्याला' नाटकातील तिसऱ्या अंकात सिंधूचे वडील, बाबासाहेब (फक्त पगडी, उपरणे, लांब कोट घालून उभे राहणे), आणि चवथ्या अंकात तळीरामाची प्रकृती पाहण्याकरता आलेल्या वैद्याची भूमिका! त्याचप्रमाणे 'स्वयंवर' नाटकात स्वयंवराच्या मंडपात बसलेल्या राजांमध्ये जरासंध ही बिनबोलकी भूमिका, आणि 'द्रौपदी' नाटकात शेवटी धृतराष्ट्राची डोळे बंद ठेवून दोनचार वाक्ये!–अशी कामे असत. त्यांना काम असले म्हणजे नाटकाच्या सुरुवातीपासूनच मोठ्या उत्साहाने रंगभूषा करायला लागत असत.

दोन माहेरघरं!

'गंधर्व नाटक मंडळी' भर उत्कर्षाच्या शिखरावर होती त्या काळी कंपनी पुणे, मुंबई व कधी बडोदा, नागपूर, सोलापूर या मोठ्या शहरां-शिवाय इतरत्र फारशी मुक्काम करीत नसे. पुणे, मुंबई ही तर माहेरघरेच होती. शाळा-कॉलेजांना मे महिन्याची सुट्टी असायची, व लग्नाचा हंगामही पुण्यात जोमात असायचा. अशा वेळी कंपनीचा मुक्काम ठरल्याप्रमाणे पुण्यास असायचाच. लग्न-घरातील वऱ्हाडी व पाहुणेमंडळी लग्नाच्या

थाटातच गंधर्वांचे नाटक पाहिल्याशिवाय लग्नसोहळा साजरा झाला असे समजत नसत, असा काही काळ होता. त्यानंतरचा पावसाळा व दिपवाळी होईपर्यंत मुंबईस कंपनीचा डेरा पडलेला असे. कंपनी इतर गावी मध्यंतरी गेली तरी परत नाताळच्या सुमारास मुंबईस दाखल होत असे. मुंबईचे प्रेक्षक आणि गंधर्व कंपनीची नाटके यांचा कायमचाच ऋणानुबंध जडलेला होता, असे म्हणावे लागेल.

गंधर्व रंगभूमीवर पंढरीचा पांडुरंग

गंधर्व नाटक मंडळीच्या अलीकडील नाटकांपैकी 'संत कान्होपात्रा' नाटकावर नानांचा अतिशय लोभ होता. त्यातील भूमिकेत ते अंतर्बाह्य रंगत असत. कान्होपात्रा नाटक जेव्हा प्रथम रंगभूमीवर आले तेव्हा त्यातील शेवटचा पंढरपूरच्या पंढरीनाथाच्या देवालयातील प्रवेश म्हणजे श्रीविठ्ठलाची सावळी मूर्ती आणि त्यालगतचे गर्भगृह,– हे फक्त पडद्यावर दाखवीत असत. मूर्तीवरील मेघडंबरी व गाभारा हा हुबेहूब पंढरीच्या मंदिरासारखा दिसायला पाहिजे अशा निग्रहाने, कंपनीचे श्री. थिटे पेंटर आणि कंपनीच्या स्टेजकडील मंडळींना नानांनी मुद्दाम पंढरपुरास पाठवून पाहिजे असलेल्या देखाव्याची छायाचित्रे आणवली व लागलीच मंदिराचे काम चालू झाले. सावंतवाडीकडील भावजी या नावाचा एक कसबी कलाकार त्याच वेळी त्या कामगिरीवर देखरेख करण्याकरता ठेवला होता. कंपनीतील रंगभूमी खात्याकडील आणि इतर सुतार मंडळींनी हे मंदिराचे काम हाताशी घेतले होते, आणि त्या नवीन कलाकाराने विठ्ठलाच्या मूर्तीचे कसबी काम मनावर घेऊन इतक्या तल्लीनतेने केले की, त्या सुबक मूर्तीकडे तासन् तास पहातच रहावे! त्याकरता लागणारे शिरसाचे लाकूड मुद्दाम निवडक असे त्याच भागातून पैदा केले होते. मंदिराचे आणि मूर्तीचे हे काम अव्याहत जवळ जवळ दोन वर्षेपर्यंत चालू राहिले. त्या मूर्तीचे कलाकुसरीचे काम त्या इसमाने त्यात इतका जीव घालून

हिराच हिऱ्याला मारक झाला !

या दोनही नाट्यप्रयोगांनंतर कै. केशवरावजी मोठ्या उमेदीने नानांना म्हणाले होते की, “नारायणराव ! तुम्ही आपल्याला असलेल्या कर्जाची का फिकीर करता ? आपण दोघे मिळून गावोगावी असे प्रयोग करू तर पैशांचा पाऊस पडेल !” ही गोष्ट त्या काळी अशक्य नव्हती. पण हा पणच तेव्हाही घातक ठरला. या दोन संयुक्त प्रयोगांनंतर केशवरावजींनी मोठ्या हौसेने एक मौल्यवान हिरा पैदा करून त्याची अंगठी घाई-गडबडीने तयार करवून आणली होती. त्यानंतरच्या त्यांच्या ‘शाकुंतल’ नाटकातील दुष्यंताच्या भूमिकेतही ती प्रेक्षकांना दिसून आली होती. पुढे काही दिवसांनी थोड्याशा आजाराचे निमित्त होऊन ते मृत्युमुखी पडले. हा प्राणघातक परिणाम त्या जाज्वल्य हिऱ्याचाच होता असे तज्ज्ञांचे बहुमत पडले. त्यांना तो लाभला नाहीच, पण प्राणहरण करून मात्र गेला !

नानाशंकरशेठ शिवमंदिर

माझे जन्मस्थान म्हणजे मुंबईतील ग्रँटरोड, नाना चौकातील नाना-शंकरशेठ यांचे शिवमंदिर. त्या मंदिराच्या डाव्या हाताकडील भव्य इमारतीत कंपनीचा मुक्काम असायचा. तेथेच माझा जन्म झाला (ता. ३० जानेवारी १९२५). ते मंदिर आणि त्या जागेचा थाट संस्थानी पद्धतीचा असाच होता. कंपनीतील साठ–सत्तर लोकांना आरामशीर व हवेशीर अशी योग्य वास्तू अखिल मुंबईतही इतरत्र शोधून सापडली नसती. त्या जागेतील माडीवरील दिवाणखाना हंड्या-झुंबरांनी सुशोभित केला होता. मोठमोठ्या तसबिरी व आरसे लावून शोभा आणलेली होती. त्याच दिवाणखान्यात गंधर्व कंपनीचे नाट्य-दैवत कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे शिवपंचायतन असलेली भव्य तसबीर ठेवलेली असे. रोज रात्री आरती होऊन पंचपदी म्हणण्याचा प्रघात होता. हे नित्य

कार्य बहुधा कंपनीतील मुलांकडेच आलेले होते. त्याच हॉलमध्ये नाटकाच्या तालमी होत. दिपवाळीसारख्या मंगल प्रसंगी दिवाणखान्यातील हंडया-झुंबरें, मेणबत्त्या वगैरे लावून, उजळून शोभा आणीत असत. या सर्व गोष्टींचे मला अजून स्मरण होते व गेलेल्या दिवसांचे चित्र पुढे उभे राहते.

मुंबईतील या जागेच्या स्मृती माझ्या जीवनाशी निगडित आहेत, आणि त्या मंदिरासंबंधी माझ्या आठवणींचे मला कधीही विस्मरण होणार नाही. भर उन्हाळ्याच्या दिवसातही ती जागा अत्यंत हवेशीर व ऐसपैस होती. तेथील सर्व वातावरणच भाविक आणि पवित्र वाटायचे. पहाटे पाच वाजता सनई-चौघडा चालू होई व त्यानेच प्रथम जाग येई. अंथरुणातून उठताक्षणी पारिजातकाच्या फुलांचा सुगंध नाकात भरायचा, आणि खाली जाऊन पहावे तर फुलांचा हा सडा पडलेला असायचा. त्यांच्या सुगंधित वातावरणात आणि आजूबाजूची फुले गोळा करीपर्यंत तासभर सहज जायचा. सकाळपासून संध्याकाळपर्यंत भाविक लोकांची देवदर्शनाकरता रीघ लागत असे. देवाची सकाळची काकड-आरती, नंतर अभिषेक, पूजा वगैरे सर्व वाद्यगजरात चालू असे. सायं-काळी पुन्हा चौघडा, आरती वगैरे नित्य नियमाप्रमाणे चालायची. देवळाच्या कठड्यावर बसून राहिले तर दिवसच्या दिवस कसा गेला हे समजत नसे. जमवलेली फुले माळ करून कंपनीच्या देवघरात श्री. कृष्णाप्पा (देवाप्पा- आम्ही त्यांना देवघर आप्पा म्हणत असू) यांच्या-कडे नेऊन दिल्या म्हणजे त्याची शाबासकी व काही प्रसाद मिळे. नानांना मात्र अंघोळ वगैरे आटपून देवघरात देवाला बेल वाहण्यास दुपारचे दोनतीनही वाजायचे.

गंधर्व कंपनीचा पेशवाई थाट

कंपनीतील रोजच्या जेवणाचा थाट अपूर्व असाच असायचा.-दोन भाज्या, चटणी, कोशिंबीर, तूप-पोळी, साखर, वरण, दही वगैरे ठरलेला

असायचा. कंपनीतील सर्वांच्या तब्रियती मस्त असल्या पाहिजेत असे नाना म्हणायचे. आपलं घर सोडून नोकरीला आलेल्या कलावंतांची आबाळ होता कामा नये अशी त्यांची भावना होती. एखादा इसम पाहुणा म्हणून कंपनीत आला तर पौष्टिक व सकस अन्न व मधुर संगीताची नाटके पाहून त्याचा आत्मा तृप्त होऊन, स्वर्गसुखाचा त्याला आनंद वाटे. त्याच्या प्रकृतीतही इष्ट फरक पडलेला दिसून यायचा.

स्वतःला विसरून मित्रमंडळींशी गप्पा

रात्रीचे नाटक असले म्हणजे नानांना झोपून उठायला कधी कधी दुपारचे बाराही वाजत. तेथून पुढे मित्रमंडळींशी गप्पा व मग आईने सारखी आंघोळीची आठवण दिल्यावर मग आंघोळ! एवढ्या कार्यक्रमाला दुपारचे दोन, तीन वाजायचे. नानांना जेवायला उशीर होत असे, पण पंगत बारा वाजताच बसली पाहिजे अशी नानांची ताकीद असे. पंगत चाललेली असली म्हणजे एकदा सर्वत्र फिरून सर्वांचे नीट चालले आहे की नाही हे पाहून मग आंघोळीला जात. स्नानाची तयारी म्हणजे, अंगावर फक्त लंगोट असे. अंगाची कातडी चरचरीत होते म्हणून त्यांनी अंगाला कसलाही साबण असा लागू दिला नाही. लांब केस होते तेव्हा मात्र पिअर्स सोपच्या गोटीने ते धूत असत. पंगतीभेद म्हणून नसला तरी पंगतीची शिस्त म्हणून, ब्राह्मण, मराठे व मुसलमान अशा क्रमाने पंगतीची मांडणी होत असे. पंगतीतून जाताना मुसलमान साथीदार मंडळींची विचारपूस अगत्याने केलेली दिसून येई. बाकी ती मंडळी नेहमी पंगतीला असतच असे नव्हते. त्यांचा ओढा साथीदार म्हणून त्यांच्याकडे जास्त असावा. तेही सर्व नानांना 'महाराज' या नावाने संबोधित असत.

तुमची रंगदेवता भ्रष्ट झाली आहे!

माझी आई नानांना नेहमी म्हणायची, 'तुम्हांला मुसलमान लोकच आवडायचे!' आई फार धर्मनिष्ठ होती. आम्ही तिला नेहमी म्हणत



बालगंधर्व – कु. पद्मा ऊर्फ बेबी – कु. सरोजिनी (सौ. नलिनी वाबळे)
लक्ष्मीबाई राजहंस



बालगंधर्व व विनायकराव पटवर्धन

असू की, किती सोवळे करतेस ! तेव्हा ती म्हणायची, ‘ आपला देह नेहमी पवित्र असावा. आणि पावित्र्य राखायचे तर आपल्या धर्माचेच आचरण केले पाहिजे. ’ मुसलमानांविषयी तिला तिटकारा होता, पण तिचे दुर्दैव की, नानांच्या गळयात एक मुसलमानी धर्माचीच बया पडली. तिने त्यांना पूर्णपणे कब्जात घेऊन सर्व कंपनीत आपला अंमल बसवला. या अशाच कारणांनी आईच्या मनाला धक्का बसून त्यातच तिचा ता. २१ नोव्हेंबर १९४० रोजी अंत झाला. आई त्यांना नेहमी म्हणे, “ इतकी वर्षे माझ्याबरोबर संसार केलात ! मी जर एक दिवस नाटकाला आले नाही तर उत्पन्न कमी होतं अशी तुमची समजूत होती ! आणि माझी लक्ष्मी म्हणून मला शिखरावर चढवलं,– आणि आता तेथून ढकलून देऊन तुम्ही काय मिळवलं ? तुमची आता रंगदेवता भ्रष्ट झाली आहे, म्हणून तुम्हांला कर्ज होतं आहे. ” कारण त्या वेळी नानांच्यावर सावकाराची पुण्याच्या घरी डिक्री आली होती. पुढे ते इन्सॉल्व्हंट झाले. या सर्व आपत्ती त्या बाईमुळेच आल्या अशी आईची दृढ समजूत झाली होती. ती म्हणायची, ‘ माझ्या नवऱ्याचा अपमान मला सहन होत नाही. आता मी जगू तरी कशाला ? ’ असल्या या पोखरणाऱ्या विचारांनीच तिचा शारीरिक ऱ्हास होऊन ती मृत्यू पावली.

माझ्या विवाहातील विघ्ने

माझ्या विवाहाच्या बाबतीत अशीच गोष्ट झाली होती. श्री. दुर्गा-रामजी हे कंपनीत राहिल्यापासून आमच्या सर्व कुटुंबात आपलेपणाने वागवले जात होते. नानांचाही त्यांच्यावर पहिल्यापासून लोभ जडला होता. माझी आई होती तेव्हापासून माझ्या व त्यांच्या विवाहाच्या गोष्टी चाललेल्या होत्या, पण नानांचे पुण्यास घराकडे येणे बहुतेक बंदच झाले होते. गंधर्व कंपनीबरोबर गोहरबाईंना घेऊन त्यांचे दौरे चालले

होते व ते गोहरबाईच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालत असत. एकट्या आईकडून या विवाहाच्या बाबतीत काहीच हालचाल होणे शक्य नव्हते. तिच्या मृत्यूनंतर तर मी आणि माझ्या मावशी ती. येसुताई देशमुख अशा एकाकी, दुसऱ्या एका जागेत बिऱ्हाड करून रहात होतो. माझे शिक्षण तर बंदच झाले होते. कंपनी असेल त्या गावी जावे तर तेथे मुसलमानी राज्य !

माझा विवाहयोग आणि नाना !

त्यातूनही १९४२ मध्ये कंपनी निपाणी व तेथून कोल्हापुरास गेली. तेव्हा मी आणि मावशी निपाणीस कंपनीबरोबर कोल्हापुरास गेलो. त्या वेळी पुण्यास कसली तरी साथ चालू होती म्हणूनच आम्हांस कंपनीकडे जायला मिळाले. कंपनीच्या जागेतच आमचे वास्तव्य होते. कोल्हापुरास असताना विवाहाच्या गोष्टीस पुन्हा उठाव मिळाला व श्री. दुर्गारामजी यांचे पाचसहा मित्र व हितचिंतक यांनी नानांना सर्व गोष्टी खुलासेवार सांगून, विवाहाचा मुहूर्त निश्चित करण्याबद्दल विचारले. तेव्हां नानांनी ‘कसं योग्य वाटेल तसं करा ! मी लग्नास हजर राहीन’ असे सांगितले. पण नंतर विचार बदलून म्हणाले की, ‘गोहरबाबाला विचारून काय ते करा !’ आम्हां दोघांची व गोहरबाईची भेट झाली त्या वेळी बाई म्हणाल्या की, ‘तुम्ही कंपनीत राहा ! काही दिवसांनी आपण हे लग्न मोठ्या थाटानं करू.’ या असल्या शब्दांवर आम्हां दोघांचाही विश्वास बसणे शक्यच नव्हते. तिच्या ताब्यात जाऊन पडणे आणि ती वागवील तसे वागणे आम्हां दोघांसही पसंत नव्हते. त्यामुळे इतर आप्तइष्ट मंडळींचा विचार घेऊन ता. २७ मे १९४२ च्या मुहूर्तावर श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे आमचा विवाह पार पडला. नानांचा मुक्काम कोल्हापुरास, इतक्या जवळ असूनही गोहरबाईची परवानगी नसल्याने ते येऊ शकले नाहीत. लग्नसमारंभास पंधरा वीस इतर स्नेही मंडळी

हजर होती. रीतीप्रमाणे नंतर आम्ही भेटून नानांच्या पाया पडून वगैरे आलो हे सांगणे नकोच.

जुनी सहकारी मंडळी कंपनीतून बाहेर

गोहरबाईच्या सान्निध्यात असताना नाना जितके तिच्या आधीन असल्यासारखे वागत त्यापेक्षा ते एकटे व तिच्यापासून दूर असताना, पूर्वीप्रमाणेच सर्वांशी चांगल्या रीतीने आपलेपणाने वागत असत. नात्यातील घरच्या मंडळींशी नानांनी शक्य तो संबंध आणू नये, कारण तसे झाले तर त्यांचे मन पालटून आपल्याकडे ते वळणार नाहीत, अशा समजुतीने घरच्या मंडळींशी सलगी न वाढेल याबद्दल ती जपत असे. गोहरबाईच्या तंत्राने व विचारानेच कंपनीची सर्व सूत्रे चालत राहिल्याने, कंपनी काही दिवस चालू तर काही दिवस बंद अशी स्थिती होती. कंपनीतील बहुतेक जुनी मंडळी एकंदर परिस्थितीस कंटाळून व जेथे 'फुले वेचली तेथे गोवऱ्या वेचण्या'ची दुःस्थिती येणार हे समजून त्यापूर्वीच बाहेर पडून आपआपल्या मार्गास लागली होती.

राजवाड्यातून झोपडपट्टीकडे

गंधर्व कंपनीचे पूर्वीचे वैभव, संस्थानी कारभार आणि एकंदर रुबाब या गोष्टींचा मागमूसही आता राहिलेला दिसत नव्हता. गोहरबाई-सारख्या अजाण आणि उपऱ्या बाईला त्या गतकालीन मानमरातबाची काय मातब्बरी! नानांना या गोष्टी समजत अगर दिसत नव्हत्या असे नव्हे. कंपनीच्या जेवणाच्या पंगतीतून एखादे वेळी जात असताना खाण्या-जेवण्याची ती दुरवस्था पाहून, आपल्या हाती काही नाही अशा सत्ताहीन दृष्टीने कपाळाला हात लावून पुढे जात. जुनी चाकोरी सोडूनच एकंदर कारभार चालला होता. नानांचे पूर्वायुष्य जितके प्रभावी व देदीप्यमान अशा घटनांनी भरलेले, तितकीच आता अधोगती झालेली दिसत होती. ही दुःस्थिती नानांच्या हट्टी आणि हेकेखोर

स्वभावामुळे प्राप्त झाली की गोहरबाईच्या मोहिनीने ते भारले गेले होते त्यामुळे झाली हे काही समजत नाही. तसे म्हणावे तर नानांच्या ऐन उमेदीच्या काळात, पुण्या-मुंबईस मुक्काम असताना थोरामोठ्यांच्या स्त्रिया व मुली भेटीच्या अपेक्षेने आणि ओळख व्हावी म्हणून नाटकाच्या वेळी रंगभूमीवर येऊन विंगमध्ये वाट पहात असत. बोलण्याची संधी मिळाली नाही तरी ते जवळून गेलेले पहावेत म्हणून तिष्ठत राहात असत. बोलायला मिळाले तर पर्वणीच! पण नाना आपल्याच भूमिकेत मग्न असल्यासारखे सर्वांना चुकवून आपल्या वेषभूषेच्या खोलीकडे जात येत असत. अशा कित्येक स्त्रियांकडून त्यांना आलेली प्रेमपत्रे न पाहताच त्यांची वेषभूषा करणाऱ्या जामदारास फाडून टाकण्यास सांगितली होती. असा मनोधर्म असताना गोहरबाईचा प्रभाव त्यांच्या आयुष्यात पडेल हे शक्य नव्हते!

नानांना ज्यात सुख, तेच आमचेही!

गोहरबाईच्या अमदानीतील नानांची लाजिरवाणी परिस्थिती पाहून माझ्या कै. आईला मनःस्ताप व दुःख होणे साहजिकच होते, पण तिच्या मृत्यूनंतरही नानांच्या आचार-विचारात कसलाच फरक झालेला नव्हता. प्रसंगविशेषी ते बोलून मात्र दाखवीत की, आपल्या बायकोला आपण फार कष्ट दिले! ते शाप आपल्याला भोगलेच पाहिजेत. त्या वेळच्या एकंदर परिस्थितीत काहीच पालट पडत नसलेला पाहून, नानांच्या मनाला तरी का दुखवावे? ज्यात त्यांना सौख्य वाटते त्यात कसलाच अडथळा आणू नये अगर विरोध दर्शवू नये अशीच आम्ही सर्वांनी भूमिका घेतली होती.

गोहरबाबा करील ती पूर्व!

गंधर्व कंपनी चालू ठेवण्याचा व त्यात स्वतः नानांच्या प्रमुख भूमिका करण्याचा गोहरबाईचा अट्टाहास होता. त्याकरता नानांनीही,

केवळ विरुद्ध जाता येत नाही म्हणून तशी संमती दिली असावी. कारण ते तिच्यापुढे गोगलगाईप्रमाणे वर्तत असत, व तिच्या हातातील बाहुल्या-प्रमाणे त्यांची राहाणी झाली होती. तिची मूळची कानडी, कर्नाटकी भाषा व मुसलमानी धर्म, या कारणामुळे मराठी भाषेचे अधिष्ठान असलेल्या गंधर्व कंपनीच्या नाटकातील वाग्विलास तिच्यासारख्या अडाणी व अज्ञ स्त्रीस समजणे शक्य तरी होते काय? ती कामे आपणास पेलतील किंवा नाही, आणि गंधर्व कंपनीच्या प्रेक्षकांचा कसा काय अभिप्राय पडेल याबद्दलच्या साशंकतेमुळे तिने नानांनाही आपल्याबरोबर हीरोची कामे करावयास भाग पाडले. तशा स्वरूपातील काही नाट्यप्रयोग म्हणजे मानापमान, मृच्छकटिक, सौभद्र वगैरे मुंबईस बालीवाला नाट्यगृहात सादर केले गेले. नानांच्या पुरुष भूमिकेमध्ये कसलेच न्यून नव्हते व गाण्याच्या दृष्टीने त्या भूमिका वैशिष्ट्यपूर्ण जरी होत्या तरी त्यांच्या अजरामर झालेल्या स्त्री-भूमिका पाहण्याची सवय झालेल्या रसिक प्रेक्षकांना त्यांचा तो पुरुष वेषातील अभिनिवेश मान्य नव्हता असे दिसून आले. गंधर्वांच्या इतक्या सान्निध्यात असूनही गाणे अगर नाटकातील अर्थपूर्ण संवाद आणि उच्चार वगैरे बाबतीत गोहरबाईंचा कसलाच प्रभाव पडू शकला नाही.

कंपनीबद्दल कै. डॉ. दादासाहेब भडकमकर यांची तळमळ

त्यानंतर इतर काही गावी हा उपक्रम केला गेला, पण कोठेही पडावा तसा प्रभाव न पडल्याने, उत्पन्नाच्या बाबतीत कंपनीस बरेच नुकसान झाले आणि कंपनीचे सामानसुमान गहाण पडण्यापर्यंत वेळ आली. काही तरी नवीन उपक्रम आणि आकर्षण असावे म्हणून महाराष्ट्र-कोकिळ श्री. शंकरराव सरनाईक यांच्या सहकार्याने काही नाट्यप्रयोग सांगली, कोल्हापूर येथे झाले. पण ही घटना थोडा काळही टिकली नाही. झालेले नुकसान व कर्ज निवारण्याकरता पुण्याचे सुप्रसिद्ध धन्वंतरी कै. डॉ. दादा-

साहेब भडकमकर यांनी कर्जाची फेड करून गोहरबाईंच्या अधिकारात चाललेल्या कंपनीची शिल्लक असलेली मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली. बालगंधर्वांवरील अकृत्रिम प्रेम व सहानुभूती यामुळे, नानांची आणि कंपनीची ती दुरवस्था पाहून कै. डॉक्टरसाहेबांना स्वस्थ राहवले नाही तर त्यात काय नवल! मध्यंतरी काही काळ डॉक्टरसाहेबांच्या अनुमतीने आणि सल्ल्याने, कंपनीतील जुन्या-नव्या नटांनी, म्हणजे श्री. नेवरेकर, श्री. चोणकर, कै. भांडारकर आदी मंडळींनी कंपनीचा कारभार चालवला. पण त्यातही पुढे घोटाळे निर्माण होऊन कंपनी बंद पडली.

गंधर्व कंपनी पुन्हा नव्या स्वरूपात

गंधर्व नाटक मंडळी काही झाले तरी बंद ठेवायची नाही असे नानांच्याप्रमाणेच गोहरबाईही बोलून दाखवीत असे व तसे तिचे प्रयत्न चालू असत. नवीन सामानाची जुळवाजुळव करून पुन्हा कंपनीची उभारणी करण्यात आली. या वेळी आपला मगदूर ओळखून स्वतः भूमिका करण्याचा हेका न धरता नानांनाच त्यांच्या भूमिका करावयास ती लावीत असे. मुंबईचे पूर्वीचे हंगामी मॅनेजर म्हणून काम करणारे कै. अनंतराव ओळकर यांनाच कंपनीचे व्यवस्थापक म्हणून नेमल्यामुळे त्यांना कंपनीबरोबर राहावे लागे. अशा व्यवस्थेखाली कंपनीचा कारभार काही काळ चालला होता. १९५० मध्ये कोल्हापूर, निपाणी, संकेश्वर, बेळगाव, कऱ्हाड, मिरज वगैरे ठिकाणी बरेच नाट्यप्रयोग धावता मुक्काम घेऊन केले गेले. गोहरबाई त्या वेळी स्वतःच्या प्रकृति–अस्वास्थ्याच्या कारणाने कंपनीबरोबर न राहता मुंबईस राहात असे.

प्रसंगीही कर्तव्याची भूमिका सोडू नये हेच ध्येय

१९५० मध्ये ज्या वेळी नव्या स्वरूपातील गंधर्व नाटक मंडळीचा दौरा कोल्हापूर, कऱ्हाड वगैरे गावी चालला होता त्या वेळी माझ्या ती. स्व. सासूबाई संधिवाताच्या दुखण्याने अत्यवस्थ स्थितीत

अंथरुणास खिळून होत्या. तशाही अवस्थेत त्यांना सोडून, कंपनीतील अडचणीमुळे नानांनी अत्यंत आग्रहाने बोलावल्यावरून नाइलाजाने श्री. दुर्गारामजी यांस त्या त्या गावी प्रयोगापुरते हजर राहून भूमिका कराव्या लागत असत. ता. ३० जून रोजी सासूबाई स्वर्गवासी झाल्या तरी नानांनी स्वतः येऊन आमच्या मनाची समजूत घातली व त्या दिवसांतही नाटकात कामे करावयास भाग पाडले. 'होणारे होऊन जाते, पण आपली कर्तव्याची भूमिका आपण केव्हाही सोडू नये' अशी त्यांची मनोभूमिका होती; आणि त्याच दृष्टीने त्यांनी आम्हांस उपदेश केला. त्यांच्या आयुष्यातील उदाहरणे अशीच आहेत.

गोहरबाईंचे मुंबईस निधन ! नाना पुण्यात !

१९६४ मध्ये नानांचा मुक्काम पुण्यास वसंताच्या (पुतण्या) घरी आपल्या मंडळीत आनंदात चालला असता, मुंबईहून गोहरबाईंच्या निधनाची अनपेक्षित वार्ता समजली, आणि नानांना सत्वर मुंबईस पोचवावे लागले. गोहरबाई कित्येक दिवसांपासून हार्टस्टोन या कसल्याशा आजाराने आजारी होत्या, पण तो आजार इतक्या विकोपाला जाऊन तडकाफडकी त्यांचे निधन होईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. नानांच्या या विकलावस्थेत एक वज्राघात झाल्यासारखी ही गोष्ट होती. त्यानंतर मात्र नाना माहीम सोडून मुंबईहून कोठेच फारसे जाऊ शकले नाहीत. मृत्यूपूर्वी नानांची एकदोन वर्षे फारच हालअपेष्टांत गेली. गोहरबाई गेलेल्या, आणि अशा स्थितीत त्यांच्याकडे तितक्या आत्मीयतेने पाहणारे असे कोणीही नव्हते. पूर्वीपासून गोहरबाईंच्याच घरी 'आशामा' या बाई होत्या. त्यांच्याकडेच पर्यायाने नानांची व्यवस्था पाहण्याचे काम आले. पण त्यांच्याकडून घ्यावी तितकी जबाबदारी घेतली गेली नाही असे दिसून येत होते. नाना मात्र तिला आपली मानलेली मुलगीच असे समजत व तसे बोलूनही दाखवीत. तिला सोडून न राहण्याचे आपण वचन दिले असल्याचे ते सर्वांना सांगत.

आप्तजनांच्या सहवासातील आनंदोत्साह

व्यथा तर वाढतच होती व नानांना चालताही येत नव्हते. त्यांची परिचर्या व्हावी त्या पद्धतीने होत नव्हती हे दिसून येई. पुढे पुढे प्रकृतीत नेहमी चढउतार होत असे, आणि असा काही अतिरेक झाला म्हणजे आशामाबाईंचे त्यांना भेटून जाण्याबद्दल पत्र येई. अशा वेळी आम्ही उभयता म्हणजे मी आणि दुर्गारामजी एकदोनदा त्यांच्या भेटीस मुंबई येथे गेल्यावेळी, आपले शारीरिक दुःख विसरून, त्यांनी पूर्वीच्या अनेक आठवणींची ओळख दिली. त्यांच्या बोलण्यात संगीत कसे असावे ? तान कशी पाहिजे ? हल्लीचे नट ! वगैरे गोष्टी उत्कटतेने येत असत. अत्यंत अलीकडील काळात त्यांना आपली जवळची नातेवाईक माणसे भेटली म्हणजे फार आनंद व समाधान वाटत असे. दुसऱ्या एका खेपेला असेच पत्र आल्यावरून आम्ही उभयता मुंबईस गेल्यावेळी मात्र नानांची अवस्था करुणाजनक व काळजी वाटण्यासारखी दिसली. त्यांना बुद्धिभ्रंश झाल्यासारखे व बोलताना उच्चारही नीट होत नसल्याचे दिसून आले. दिवसेदिवस प्रकृती विकोपाला जात असल्याची चिन्हे दिसून आली.

माझ्या विवाहित मुलींच्या भेटीतील आनंद

माझ्या दोनही मोठ्या विवाहित मुली, सौ. शशिकला चांफाडकर (गोवा) व सौ. शोभना स्मार्त (मुरगूळ) या आपल्या पतीसमवेत वेगवेगळ्या वेळी नानांच्या समाचारास मुंबईस जाऊन आल्या होत्या. त्यांच्या सांगण्यात आले की नानांनी त्यांना आपल्याजवळ बसवून घेतले. धाकट्या मुलीच्या हातून दूधही प्याले. त्या वेळी त्यांना प्रसन्न वाटल्याचे व चेहरा आनंदित झाल्याबद्दल त्यांनी आम्हांस सांगितले. या माणसाला स्वतःच्या शारीरिक अवस्थेबद्दल कसलेच दुःख असल्याचे दिसून आले नाही असेही त्या म्हणाल्या. त्यांना सोडून येताना मात्र आपणास व नानांनाही फार दुःख झाले असे मुलींच्या सांगण्यात आले.

अभिनयाचा विक्रम

बालगंधर्वांनी सुमारे तीस वर्षे महाराष्ट्र रंगभूमीची सेवा केली. आठवड्यातून तीन नाटके असे जरी ढोबळ प्रमाण धरले तरी एक वर्षात सुमारे १५० नाटके होतात. तीस वर्षांत १८०० नाटके होतात. कॉंग्रेस, प्रदर्शन किंवा ज्या ज्या संस्थानांमध्ये गंधर्व मंडळी जाते, त्या त्या संस्थानांत सरकारी नाटके बहुधा अधिक करण्याची वहिवाट लक्षात घेतली तर एकंदर सर्व भूमिका बालगंधर्वांच्या ३० वर्षांत सुमारे ५००० झाल्या असे अनुमान निघते. इतक्या वेळा भूमिका पाहत असता बालगंधर्व महाराष्ट्र रंगभूमीवर आजतागायत पहिलेच राहिले ही गोष्ट खरोखरीच अपूर्व खरी.

या जड देहाला आता कशाला अत्तर ! आता फक्त मुक्ती पाहिजे !

व्याधीने जर्जर झालेल्या अशा अवस्थेत दोन वर्षांपूर्वी ते पुण्यास वसंत राजहंस यांजकडे शुक्रवार पेठेतील त्यांच्या घरी होते. नानांना आपले असे म्हणायला आता तेच एक घर होते. ते पुण्यास आले म्हणजे तेथेच राहात असत, व वसंताही (बाबा) त्यांना अत्यादराने आणि पितृवत् प्रेमाने घरी मुद्दाम आणून त्यांची सेवा करण्याची संधी घेत असे. एकदा नानांना संकष्टी चतुर्थीचे आमंत्रण असल्याने, मनातून कसब्याच्या गणपतीला जायचे होते. आपल्या हाताने त्यांना काहीच करता येत नसल्याने, बाबाने (वसंताने) त्यांच्या अंगावर कपडे चढवले व सहज पूर्वीची आठवण येऊन त्याने त्यांच्या कपड्यांवर अत्तराचा फाया फिरविला ! तेव्हा ते म्हणाले, " मला आता अत्तर कशाला लावता ? कुठं रुक्मिणी ! कुठं द्रौपदी ! कुठं सुभद्रा आणि कुठं हा आताचा जड देह ! या देहाला आता एकच गोष्ट म्हणजे मुक्ती पाहिजे आहे. " या त्यांच्या उद्गारांनी आमची सर्वांची अंतःकरणे इतकी गहिवरून आली की,– काही सुचेनासे झाले.

दर्शन गणपतीचे की गंधर्वांचे !

तशा त्या परिस्थितीत आम्ही त्यांना उचलून मोटरीत बसवले व गणपतीला गेलो. तेथे गेल्यावर आश्चर्य म्हणजे, तेथे जमलेले सर्व स्त्रिया-पुरुष वगैरे लोक देवदर्शन सोडून नानांच्या पायांवर माथा ठेवू लागले. त्यांना बसवले होते तेही अगदी गणपतीसमोरच ! त्या वेळी त्यांच्या चेहऱ्या-वर खरोखरच इतके तेज दिसत होते की, भक्तिभावाने लोकांनी त्यांना वंदन केले त्यात काही नवल नाही. लोकांची त्यांच्यावरील श्रद्धा अपार होती, आणि त्यांची ती पराधीन स्थिती पाहून ह्या दैवदुर्विलासाबद्दल कीव येत होती. त्यानंतर तेथील प्रसाद ग्रहण करून आम्ही घरी परतलो.

नानांची योगनिद्रा !

पुढे काही दिवस असेच गेले, पण अचानक मुंबईहून वसंताचे एक्स्प्रेस पत्र आले की, नानांचा आजार बळावला असून, ते शुद्धीवर नाहीत. त्यांना माहीम येथून हालवून माटुंग्याच्या कॉलनीतील नर्सिंग होममध्ये ठेवले. हे पत्र आम्हांस गुढीपाडव्याच्या दिवशीच मिळाले, व दुसऱ्या दिवशी पहाटेस आम्ही कोल्हापुराहून निघून ता. ११ एप्रिल १९६७ रोजी सायंकाळी मुंबईस पोचलो. माझी बहीण व तिचे यजमान डॉ. बाबळे हे जवळ होतेच. प्रामुख्याने सर्व शुश्रूषा नर्सिंग होमच्या डॉक्टरांनी आणि परिचारिकांनी फारच प्रेमळपणाने चालवली होती. वसंता तर नानांना सोडून एक क्षणभरही हालत नसे. कित्येक तज्ज्ञ अशा धन्वंतरींच्या मार्गदर्शनाप्रमाणे, ऑक्सिजन, रक्तदान, इंजेक्शन्स वगैरे प्रयोग एकसारखे चालू होते. त्यामुळे वाटायचे की, त्यांच्या प्रकृतीत फरक पडून ते सर्वांना पाहतील आणि बोलतील! पण व्यर्थ! दहाबारा दिवसांनंतर आम्ही परत फिरलो. थोड्याच दिवसांनी त्यांना पुण्यास आणून डॉ. माईणकर यांच्या जिमखान्यावरील बंगल्यात व पुढे जहांगीर नर्सिंग होममध्ये उपचार चालू केले, पण प्रकृतीत कसलाही फरक पडू शकला नाही.

अखंड निद्रेतून चिर-समाधी !

शेवटच्या आजाराच्या सुरुवातीपासून, म्हणजे ता. ८ एप्रिल १९६७ पासून त्यांना जी बेशुद्धावस्था आली होती ती हरतऱ्हेचे उपचार आणि दैवी उपाय करूनही नाहीशी झाली नाही. शुद्धीवर नसल्याकारणाने त्यांना जर काही आन्तरिक व्यथा होत असली तरी समजण्यास मार्ग नव्हता. मुंबईहून आम्ही परत कोल्हापुरास आलो, तरी त्यांचे प्रकृतिमान वरचेवर आम्हांस समजत होते. वयाच्या मानाने आणि इतक्या दीर्घ मुदतीच्या आजारातून उठून ते पाहिल्यासारखे

होतील ही आशा नव्हतीच, पण इतक्या दुर्मिळ आणि अमूल्य अशा औषधोपचाराने निदान ते काही काळ तरी शुद्धीवर येऊन आप्तस्वकीयांस पाहू शकले असते आणि एखादा शब्द जरी उच्चारू शकले असते तरी तो ब्रह्मानंद वाटला असता ! पण नाही,– तसे व्हायचे नव्हते.

त्यांची शंभर दिवसांची बेशुद्धावस्था ही एक योगनिद्रा किंवा समाधीस्थितीच समजावी लागेल. आतापर्यंत लुटलेल्या आणि इतरांना लुटू दिलेल्या गंधर्व संगीताची आणि नाट्यबहाराची स्मृतिचित्रे ते पाहात होते, की इंद्र-दरबारातील आगामी दृश्ये त्यांच्या अंतश्चक्षूंसमोर तरळत होती हे कळण्यास मार्ग नव्हता. पण या शंभर दिवसांच्या समाधीस्थितीत असताना प्रकृतीत काहीच चढउतार न होता ता. १५ जुलै १९६७ रोजी त्यांची प्राणज्योती इहलोकातून बाहेर पडून अंतरिक्षात विलीन झाली ! त्यांची ही शंभर दिवसांची समाधीस्थिती हा एक असामान्य योगायोग समजावा लागेल.

सर्वच अपूर्व ! मृत्युलोकावरील त्यांनी निर्माण केलेले गंधर्वसंगीत आणि स्वर्गीय नाट्य यांचे साम्राज्य संपले, आणि तो सम्राटही अंतर्धान पावला ! तो नादब्रह्म परब्रह्मात मिसळून गेला. आता राहिल्या त्या फक्त त्यांच्या अखंड स्मृती ! !

कै. गंधर्वांचे जावई श्री. दुर्गाराम खेडेकर यांनी वाहिलेली स्मृति-कुसुमे

‘ नमन नटवरा विस्मयकारा ’

इ. सन १९२९ साली मी गंधर्वांच्या कंपनीत काही काम मिळाले तर बघावे म्हणून गेलो. त्या वेळी १२ ते १ चा सुमार होता. सर्व मंडळींची जेवणे आटपून जो तो पानसुपारीच्या गडबडीत होता व बालगंधर्व स्नान करीत होते. तरी त्यांची आणि माझी त्याच ठिकाणी भेट झाली. माझी हकीकत ऐकल्यावर त्यांनी मला सांगितले की “माझ्या-जवळ कामापेक्षा दुप्पट माणसे आहेत, तरी माझा नाइलाज आहे.” तदनंतर माझी निदान एक महिना जेवणाची सोय लावाल तर बरे होईल अशी मी त्यांना विनंती केली व ती त्यांनी आनंदाने कबूल केली. प्रथम उत्तर देत असताना करुणाजनक व नाइलाजाची मुद्रा आणि दुसऱ्या वेळची हसरी मुद्रा पाहून मला फार समाधान वाटले. आजपर्यंत नोकरी मागण्यास गेलो असता इतक्या सरळ रीतीने कोणीही बोलले नाही. असो. मी त्यांच्याकडे रीतसर सर्टिफिकेट दाखवून जेवावयास जाऊ लागलो. गंधर्व नाटक मंडळीचे आद्यदैवत असलेल्या श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या ‘शाकुंतल’ नाटकातील नटीच्या भूमिकेने रंगभूमीवरील माझ्या कामाचा मुहूर्त व्हावा अशी नानांची (बालगंधर्वांची) इच्छा ! गंधर्व नाटक मंडळीत मिरज मुक्कामी (१९३२) दिपवाळीपूर्वी माझा प्रवेश झाला व नंतर कंपनीला दिपवाळीची एक महिन्याची सुट्टी झाली. त्या वेळी कंपनी मिरजेस बुधगावकर यांच्या वाड्यात रहात होती. पुढे सोलापूर येथील मुक्काम करून कंपनी मुंबईस गेली तरी ‘शाकुंतल’ नाटकाचा प्रयोग होण्याचे जमले नाही व शेवटी मुंबईस ‘संगीत द्रौपदी’ नाटकातील नटीच्या भूमिकेने माझे रंगभूमीवर प्रथम पदार्पण झाले.

सावित्री आणि स्त्री-भूमिकेचा अनुभव

त्याच वेळी तालमीत असलेल्या ‘ सावित्री ’ नाटकातही लहानसेच पण स्त्री-भूमिकेचे काम मला दिले गेले. मला प्रथमपासून स्त्री-भूमिकाच देण्याचे ती. नानांच्या मनात असावेसे दिसले. त्यांचा कटाक्ष असे की, संगीत नटाला शक्य तो प्रोज काम द्यायचे नाही. नवीन सावित्री नाटकातही मला एक पद मुद्दाम घालण्यात आले. ती भूमिका म्हणजे कल्याणी ही होय. कै. काकासाहेब खाडिलकर यांच्या नाटकांच्या तालमी-बद्दल आणि कडक शिस्तीबद्दल मी पुष्कळ ऐकले होते, पण त्याचा खरा अनुभव त्या वेळी मिळाला. ते स्वतः घड्याळाप्रमाणे हजर राहून तालमी घेत असत.

भासे निशेची भूल मना

गंधर्व कंपनीत मिरजेस माझे पदार्पण झाल्यापासून रंगभूमीवरील माझ्या कामास सुरुवात होईपर्यंतच्या तीन–चार महिन्यांच्या कालावधीत माझे काम म्हणजे, नानांच्या गाण्यातील रसग्रहण करण्याकरता, रंगभूमीवर न चुकता हजर राहणे. हा माझा क्रम मला काम नसेल तेव्हा न चुकता पुढेदेखील पाळला. गंधर्वांच्या गाण्याबद्दल मला माझ्या लहानपणापासून प्रेम होते, आणि गाणे ते खरे की–‘ बालगंधर्व गातात ते ’, असा माझा ग्रह त्यांच्या रेकॉर्ड वगैरे ऐकून झाला होता. तो सार्थ नव्हता असे कोण म्हणेल ?

बालगंधर्वांच्या गाण्याबद्दल आणि त्यांच्या नाटकांबद्दलच्या आख्यायिका लहानपणापासून माझ्या कानावर येत असत. त्यांना न पाहताही माझ्या इतर विद्यार्थी मित्रांचा व माझा अनाठायी वाद चालत असे. कारण पुण्या–मुंबईस शिक्षणाकरता ते विद्यार्थी राहिले असता कै. बापूराव पेंढारकर (ललितकलादर्श नाटक मंडळी) यांची नाटके पाहून येत आणि त्यांच्या गाण्याची आणि नाटकांची तारीफ करीत. मी बालगंधर्वांचा

सर्वस्वी अभिमानी असल्याने मला डिवचण्याकरता तर ते मुद्दाम हा विषय काढून गंधर्वांच्या गाण्याचा कमीपणा दाखवण्याचा प्रयत्न करीत. शेवटी मला सांगावे लागे की, तुमचे काहीही म्हणणे असले तरी माझ्या मनावरील गंधर्वांच्या गाण्याची मोहिनी कधीही कमी होणार नाही.

गोव्यातील सावईवेरे...

माझे वडील व घराण्यातील सर्व वडीलधारी मंडळी वेदशास्त्रसंपन्न अशी होती. घरी लहानमोठ्या तीस–चाळीस माणसांचा राबता असे. घराभोवतालच्या आमच्या कोकणी बागायतीच्या ठिकाणास 'खेडे' असे संबोधले जात असे. गोव्यात आणि तेथील परिसरात खेडेकर याच नावाने प्रख्यात वैदिक घराणे म्हणून आम्हांस ओळखले जाई. माझ्या लहानपणी घराण्याची जी परिस्थिती होती ती पुढे राहिली नाही, व प्रत्येक जबाबदार व्यक्तीने चारितार्थाच्या व इतर कारणांनी घरातून बाहेर पाऊल टाकले. आज त्या ठिकाणी केवळ घराण्याचा जाज्वल्य अभिमान धरून एकच व्यक्ती घर संभाळण्याचा प्रयत्न करीत आहे!–ती व्यक्ती म्हणजे माझे चुलत चुलत बंधू श्री. वे. शा. सं. गोपाळ वासुदेव खेडेकर हेच होत.

काही पाश्चात्य शिक्षणावर भर देऊन आज माझे आप्त निरनिराळ्या क्षेत्रांत वावरत आहेत. असे असले तरी, परंपरेप्रमाणे वेदांचे प्राथमिक पाठान्तर आणि ब्रह्मकर्म सर्वांनाच अवगत आहे. विद्यार्थीदशेत सुटीच्या निमित्ताने माझे गोव्यात जाणे प्रतिवर्षी घडत असे; त्यानंतर मात्र कित्येक वर्षे ते शक्य झाले नाही. हल्लीच गेल्या दोन–तीन वर्षांपासून तिकडे वर्षातून एक वेळ तरी जाऊन येण्याचा मी परिपाठ ठेवला आहे. माझ्या घरापेक्षाही माझा ओढा माझ्या आजोळी, म्हणजे खेडपार येथील (ओपा) माझे मामा श्री. विनायक गणेश गावकर यांच्याकडे प्रथमपासून असल्याने, माझे गोव्यातील वास्तव्य तेथेच जास्त असते.

आई-वडिलांचा मी एकुलता एकटा असल्याने, त्यांच्या प्रेमळ छत्राखाली जवळ जवळ सगळे बालपण संपूनही वयाच्या वीस वर्षांपर्यंत मला त्यांनी आपणापासून जराही दूर जाऊ दिले नाही. कोल्हापुरास गंधर्व कंपनीचे येणे केव्हाच घडत नसे. त्यामुळे गंधर्वांची नाटके पाहण्याची माझी हौस व इच्छा बरीच वर्षे पूर्ण होऊ शकली नाही. केवळ त्याकरताच मी १९३१ मध्ये पुणे पाहण्याच्या निमित्ताने, आमच्या ओळखीचे पुण्याचे श्रीमंत सरदार नातू यांच्याकडे सात-आठ दिवस जाऊन येण्याची संधी साधली. तेवढ्या अवधीत मला तेथे दोनच नाट्यप्रयोग, म्हणजे रात्रीचे 'मानापमान' आणि दुसऱ्या दिवशी दुपारचे 'एकच प्याला' असे पहावयास मिळाले. त्या वेळी कै. नटवर्य गणपतराव बोडस यांच्या भूमिका पहावयास मिळाल्या. पाहिलेल्या 'एकच प्याला' नाटकाचा परिणाम माझ्यावर पुढे दोनतीन दिवस राहिल्याचे मला स्मरते. त्यानंतर कै. गणपतराव बोडस यांचे काम मला पुढे केव्हाही पहावयास मिळाले नाही.

गंधर्व नाटक मंडळीत जाण्यापूर्वी कंपनीची नाटके पाहण्याचा दुसरा योग म्हणजे, माझ्या वडिलांपासून कोल्हापूरचे वे. शा. सं. वासुदेवशास्त्री नारळीकर यांच्या घराण्याशी माझा आप्तसंबंध जमून आलेला होता. त्यांचे चिरंजीव श्री. विष्णुपंत हे नुकतेच (१९३२) शिक्षण संपवून इंग्लंडहून रँग्लर होऊन स्वगृही आलेले असल्याने, त्यांच्याच सहवासात माझा सर्व वेळ जात असे; बरेच वेगवेगळे कार्यक्रमही ठरवले जात आणि आमंत्रणे येत. रँग्लरसाहेबांचे परिचित श्री. गंगाधरपंत लोंढे हे गंधर्व कंपनीत नुकतेच हीरोची कामे करू लागले असल्याने, त्यांनी रँग्लरसाहेबांना मिरजेस मुद्दाम नाटके पाहण्यास येण्याचे आमंत्रण देऊन तेथे आमची राहण्याची व नाटके पहाण्याची उत्कृष्ट व्यवस्था

केली. त्या वेळी 'द्रौपदी' व 'स्वयंवर' असे दोन प्रयोग पाहण्याचा योग आला. केवळ ते नाट्यप्रयोग पाहूनच मला कंपनीत राहण्याची जास्त उत्सुकता उत्पन्न झाली असे म्हणणे गैर होणार नाही. ज्या वेळी बालगंधर्वांची आणि रॅंग्लरसाहेबांची भेट झाली त्या वेळी नानांनी त्यांचा आदराने पाहुणचार केला. त्या वेळी डॉ. भास्करराव बाबळे (गंधर्वांचे थोरले जामात) पुढील कोर्सकरता इंग्लंडला जाणार असल्याने, त्या दृष्टीने गंधर्वांनी तिकडील सर्व हकीकत व माहिती विचारून घेतली.

कै. बाबूरावजी रुईकर, कोल्हापूर, यांच्यामुळे गंधर्वयोग

बालगंधर्वांच्या गाण्याचे अत्यंत षोकी, अभिमानी आणि त्यांचे परमस्नेही कोल्हापूरचे श्रीमंत सावकार कै. बाबूराव रुईकर हे माझ्या वडिलांपासून आमचे हितसंबंधी असल्याने त्यांच्याच इच्छेने मला गंधर्व कंपनीत प्रवेश करावा लागला व मिळाला. नानांनीही माझ्या आवाजाची व गाण्याची साधारण तयारी पाहून व चाचणी घेऊन लागलीच मला कंपनीत ठेवून घेतले. मी कंपनीत हजर झालो तो मात्र गंधर्व कंपनी दिपवाळीच्या सुट्टीनंतर सोलापुरास गेली तेव्हा! श्री. रुईकर यांना आम्ही पहिल्यापासून 'दादा' असे संबोधित असू. त्यांनी माझ्या अंगच्या गुणांचे काही तरी चीज व्हावे या आन्तरिक इच्छेने मला 'गंधर्व नाटक मंडळी'त राहण्याचा आग्रह केला, आणि मी राहिलोही. गाण्याबरोबरच माझी यान्त्रिक बाजूकडे काम करण्याची दृष्टी आणि काही कलाकृती पाहून त्यांनी मला 'मुंबईस व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये शिकतोस की गंधर्व कंपनीत राहण्याची इच्छा आहे?' असा सवाल केला असताना, माझ्या गाण्याच्या छंदाचाच विजय झाला आणि मला बालगंधर्वांचा सहवास आणि त्यांचे स्वर्गीय संगीत मनमुराद ऐकण्याचा लाभ झाला.

'गंधर्व नाटक मंडळीं'त प्रवेश करण्यापूर्वी, कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांच्याजवळ माझे वास्तव्य होते. कोल्हापुरातील कोणी गाणारा मुलगा असल्यास त्यांना त्या वेळी हवा असल्याने, महा-राजांच्या सांगण्यावरून श्री. रामराव नागेशकर या वाड्यावर नोकरीस असलेल्या आणि आमच्या घरच्या परिचयाच्या गृहस्थांनी मला मुद्दाम नेऊन श्रीमंत महाराजांची भेट करवली आणि तेथे नोकरी दिली. माझे वडील व मातोश्री माझ्या लहानपणापासून कोल्हापुरास स्थायिक झालेले असले तरी आमचे मूळ सुप्रसिद्ध भिक्षुक घराणे गोव्यातील सावईवेरे येथील होय. त्यामुळे नागेशकर वगैरे गोव्यातील मंडळींचा व आमचा परिचय होता. त्या वेळी माझे इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालेले होते. पण तिकडे फारसे लक्ष नव्हते. नंतर कोल्हापूरचे त्या वेळचे दरबार गवई पै. म. बुरजीखांसाहेब यांच्याकडे माझी गाण्याची तालीम सुरू झाली.

नव्या 'किर्लोस्कर मंडळी'ची कोल्हापुरात फाटाफूट

त्या वेळी 'किर्लोस्कर नाटक मंडळी' (नवीन) कोल्हापुरास येऊन बंद झाली होती. त्यातील प्रमुख नट श्री. चाफेकर व श्री. माधवराव जोशी हे त्या वेळी दरबारात राहिले होते. मला वाटते, श्री. आक्कासाहेब महाराजांच्या मनातून त्या वेळी एखादी नाटक कंपनी सुरू करण्याचे असावे. नाटक कंपनीला लागणारे सर्व साहित्य, बंद झालेल्या कंपनीचे तयार होतेच, त्यास अनुसरून 'संशयकल्लोळ', 'मानापमान' वगैरे प्रयोग जवळचाच नटसंच जमवून कारणपरत्वे रंगभूमीवर केले गेले.

पुढे बराच काळ विशेष हालचालीशिवाय तसाच जात चालला व श्रीमंत स्वारीबरोबर राहणे, शिकारीनिमित्त पन्हाळा, रायबाग वगैरे ठिकाणी सरकारी कॅंप जाईल तेथे बरोबर असणे, रेसच्या निमित्ताने पुणे, मुंबई वगैरे ठिकाणी बरोबर जाणे वगैरे गोष्टी माझ्या कलासक्त अंतः-करणाला मानवणाऱ्या नव्हत्या. गाण्याचे शिक्षण व तालमीही त्यामुळे

व्यवस्थित चालत नसत. तशातून मागे उल्लेखिल्याप्रमाणे येथील श्रीमंत सावकार बाबूराव रुईकर यांना मी वाड्यावर सरकार दरबारात राहावे हे पहिल्यापासून पटत नसल्याने, मला गंधर्व नाटक मंडळीत ठेवण्याबद्दल त्यांनी माझ्या वडील-मातोश्रींना बरेच वेळा व हरएक प्रकारे समजावून सांगून पाहिले, व शेवटी त्यांच्याच इच्छेप्रमाणे मी मिरज मुक्कामी गंधर्व मंडळीत प्रविष्ट झालो. वडील-मातोश्रींना मी एकुलता एकच असल्याने मला आपल्यापासून दूर जाऊ देण्यास त्यांचा विरोध होताच.

कोल्हापूर सोडून नाटक कंपनीत गुपचुप प्रवेश

माझे कोल्हापुरातून बहिर्गमन आणि नाटक कंपनीत राहणे या गोष्टी सरकारस्वारी आणि श्रीमंत आक्कासाहेब महाराज यांना न कळवता आल्याने त्यांचा रोष होईल की काय या धास्तीने मी कित्येक दिवस कोल्हापुरास येण्याचे टाळीत असे. एकदा कंपनीचा मुक्काम मुंबईस असताना रॉयल ऑपेरा हाउसमध्ये नाट्यप्रयोग चालू होते. कोल्हापूरचा सरकारी कॅंप रेसच्या निमित्ताने मुंबईस असता एका नाट्य-प्रयोगास श्रीमंत आक्कासाहेब महाराज व सरकारस्वारी इतर काही दरबारी मंडळीसह उपस्थित होती. त्या वेळी त्यांनी मला मुद्दाम बोलावून घेऊन विचारले व चौकशी केली की न कळवता कंपनीत जाण्याचे काय कारण होते? आपल्याला सांगितले असते तर आम्हीही तुझ्या मनाप्रमाणे नाटक कंपनीत प्रवेश मिळवून दिला असता. असो.

त्याच वेळी नानांची आणि श्रीमंत स्वारींची भेट होऊन त्यांनी नानांना विचारले की, आपण कोल्हापुरास का येत नाही? यापुढे मनात काहीही न आणता जरूर कोल्हापुरास यावे वगैरे गोष्टी सांगून, कोल्हापुरास येण्याचे जवळ जवळ आमंत्रणच दिले; आणि त्यानंतर कंपनी कोल्हापुरास मुक्काम करू लागली. मध्यंतरी कित्येक वर्षे कंपनी

कोल्हापुरास येण्याचे काही कारणाने टाळत असे, पण त्यानंतर (१९३४) गंधर्व कंपनी जेव्हा कोल्हापुरास आली तेव्हा श्रीमंत सरकारांकडून कंपनीचा यथोचित गौरव झाला आणि लोकाश्रयही चांगला मिळाला.

मन माझे मोहुनि गेले

'गंधर्व नाटक मंडळी 'तील माझा प्रवेश म्हणजे एका संस्थानातील राजदरबारातून दुसऱ्या संस्थानातील रंगभूमीच्या दरबारातील प्रवेश होय. या दरबारात मात्र माझे मन सुखावले, आणि जे मागितले ते मिळाले असा वरच मिळाल्याचा ब्रह्मानंद मला झाला. रंगभूमीची ती सजावट आणि पुराणकालीन स्वर्गीय देखावे पहात असता, देवलोकीच्या कौरव-पांडवकालीन वर्णनाप्रमाणे रंगभूमीवर दृश्य दिसत असे,–आणि मन त्याच काळात वावरत राही.

बालगंधर्वांनी स्वतःच्या जीवनाचा, आयुष्याचा आणि स्वार्थाचा विचारही न करता रंगभूमी हेच आपल्या पराक्रमाचे क्षेत्र अशा दृढ भक्तीने आणि तनमनधनाने आपली रंगभूमी सजवली, पोसली, आणि त्यातच आपल्या आयुष्याचे सुखसमाधान मानले. कर्जाचे डोंगर उभे केले, पण रंगभूमीला ऐश्वर्य प्राप्त करून देण्याच्या कारणाकरताच ! त्यांच्या दृष्टीला एक सृष्टी म्हणजे आपली रंगभूमीच दिसत असे. "तपश्चर्येचे फळ सर्वेश्वर दिल्यावाचून राहात नाही" या उक्तीप्रमाणे गंधर्व रंगभूमीवर कोणत्याही प्रकारची कमतरता अगर उणीव दिसून येत नसे. स्वर्गीय संगीत, अव्वल दर्जाचे साथीदार, कुशल नटवर्ग, यथायोग्य वेषभूषा, आणि रंगभूमीचा तो अपूर्व थाट– हा सर्व गुणसमुच्चय गंधर्व कंपनीशिवाय इतरत्र कोठेही पहावयास मिळत नसे.

मोहिले कंठ मधु बले

बालगंधर्वांच्या अलौकिक आणि दैवी नाट्यगुणांबद्दल मी काय लिहावे ! त्या स्वर्गीय, सुमधुर आणि सुश्राव्य गायनाबद्दल रुक्ष गद्यात

काही तरी लिहिले तर त्या सुर– सुगंधाची अवहेलना होणार नाही ना अशी शंका येते. त्याच्या जोडीने भूमिका करताना त्यांच्या मुखातून ज्या स्वरपंक्ती बाहेर पडत त्या वेळी त्यांच्याकडे पाहून असे वाटे की, आत केवढा स्वरसागर उचंबळत असेल ! आणि मुखावाटे बाहेर पडण्या-साठी त्याची धडपड होत असेल ! त्यांच्या मुखातून धनुष्यावरून सोडलेल्या बाणाप्रमाणे एखादी तान जोराने फेकली जात असे तेव्हा ओठांना स्फुरण येऊन ते थरथरत असत आणि काही तरी अगम्य असे ऐकावयास मिळणार असे दिसून येई. स्टेजवर ‘ वाहवा ’ म्हणण्याची संधी नसूनही आतल्या आत मन सुखावून अंतःकरण भरून येत असे. त्यांचा षड्जच असा काही धीरगंभीर आणि सुरात मिसळून लागे की, त्याची झार आणि धार जवळच्या दुसऱ्या पात्रास सकंपित करीत असे. त्यांच्या समवेत ‘ एकच प्याला ’मध्ये शरद, ‘ स्वयंवर ’मध्ये महाराणी, ‘ अमृत-सिद्धी ’मध्ये गुलाब, ‘ द्रौपदी ’मध्ये भानुमती वगैरे त्यांच्या जोडीला भूमिका करताना मला हाच अनुभव येत असे.

श्री. हरीभाऊ देशपांडे ऑर्गनची साथ करीत असत. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास, ते सांगत असत की, नाना गात असताना कित्येक वेळा त्यांच्या चेहऱ्याभोवती तेजोवलय निर्माण झाल्याचा साक्षात्कार होत असे. हा प्रभाव त्यांच्या दैवी संगीताचाच नव्हे तर कसला म्हणायचा ! काही काही पदे चालू असताना, सर्व जातींच्या, सर्व पंथांच्या, ज्ञानी-अज्ञानी, लहानथोर प्रेक्षकांकडे पाहिले असता ते मंत्र-मुग्ध झाल्यासारखे भारले जाऊन डोलत रहात असत असा अनुभव आहे.

नानांच्या गाण्यातील सुरांना आणि शब्दांना त्यांचे साथीदार, म्हणजे कै. कादरबक्ष खां (सारंगिये), तिरखवां खांसाहेब आणि श्री. हरीभाऊ वगैरे इतके जपत असत की, नानांच्या मुखातून केव्हा स्वर बाहेर पडतो आणि आपल्या सुरेल वाद्यांच्या सहाय्याने फुलासारखा

आपण केव्हा अलगद झेलतो असे त्यांना होत असे ! इतके ते सर्वजण एकाग्र होत असत. हे सर्व पाहिले म्हणजे दैवी आराधना कशा पद्धतीने व्हावी लागते आणि त्याशिवाय त्याचा प्रभाव कसा पडत नाही व प्रचीती येत नाही याचा दाखला मिळतो.

गंधर्वांचा ओसरता बहार

'गंधर्व नाटक मंडळी'च्या, म्हणजेच बालगंधर्वांच्या ऐन उमेदीचा व वैभवाचा उतरता काळ हाच माझा गंधर्व कंपनीत राहण्याचा योग होता की काय न कळे. भरभराटीच्या अत्युच्च शिखरावरून त्यांची आस्ते कदम अशी उतरती अवस्था चालू होती, तितकीच अनुभवाची विशालता आणि प्रत्येक भूमिकेमध्ये विचाराची धीरगंभीरता दिसून येत होती. त्यांच्या उतारवयात म्हणजे वयाची चाळिशी ओलांडल्यावर त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांच्या गाण्यात एक प्रकारचा समजूतदारपणा आला होता. ते म्हणत असत की, पूर्वी जी गाण्याची ताकद होती ती गाण्याच्या शब्दांकडे, त्यांच्या अर्थाकडे अगर प्रसंगाकडे विशेष लक्ष न देता, त्यांना मारण्याकडे असे. आता आपल्याला गाणे समजू लागले आहे, आणि खरोखरच तसे दिसून येई. गद्य संभाषणातून पदाला सुरुवात करताना त्या संभाषणाचा सूर आणि त्याच भाषणाची लय त्यांच्या अलीकडील पदात दिसून येते असे. पूर्वीच्या ख्याल गायकीची पदे त्यांनी भाषणाच्या ओघाप्रमाणे वेगळ्या लयीत म्हणण्याची प्रथा सुरू केली, त्यांचा त्या वेळी ओसरता बहार होता, तरी त्यातील बहारीचा अंश शिल्लक होताच.

गंधर्व-गायनाचा बहार लुटणारे प्रेक्षक

तिरखवां खांसाहेब गंधर्व कंपनीत राहिल्यापासून ते 'स्वयंवर', 'एकच प्याला' व कधी 'संगीत द्रौपदी' हीच नाटके वाजवीत असत. त्या नाटकातील पदे इतकी उठावदार होत असत की, पुण्या-मुंबईच्या

त्या नाटकांचे कधीच विस्मरण होणार नाही. त्यांच्या पदातील ओळींची सारखी पुनरावृत्ती होते असे जरी वाटत होते, तरी सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास त्यातील अलग अलग स्वरलालित्य दिसून येत असे. नाना पद म्हणत असताना त्यांना उठाव देऊन व रंगत आणून, ते नानांनी पुढे पुढे म्हणावे– व खांसाहेब वाजवत असतांना त्यांचा बेरंग होऊ नये म्हणून नानांनी सारखे म्हणत राहावे–असा सामना होत राही ! खांसाहेबांची बहारदार व लयबाज लग्गी संपून तिय्या येईपर्यंत लेहरा धरल्यासारखी ही पुनरावृत्ती होत राही, आणि समेवर तुटून पडल्याप्रमाणे दोघेही समेवर झेप घालून येत तेव्हा प्रेक्षकांतून 'अहाहा !' असे दबलेले उद्गार निघत. अशी कित्येक रंगलेली पदे व नाटके पुण्या–मुंबईच्या रंगभूमीवर पाहण्याचा योग मला आला आहे. त्यातल्या त्यात मुंबईच्या ऑपेरा हाउस या बादशाही नाट्यगृहात, वेगवेगळ्या जातीचा रंगीबेरंगी जनसमूह गाण्यावादनाच्या या मोहमयी वातावरणाने भारला जाऊन एकरूप झालेला पाहण्यांत आहे. अशा सुर-सुगंधाने भरलेली बहारदार नाटके पुन्हा या जन्मात तरी पहावयास मिळतील काय ! 'गेले ते दिवस!' असेच म्हणावे लागेल.

त्रिवेणी सुर-संगमातील आनिर्बंध संचार

गंधर्व कंपनीतील अव्वल दर्जाचे सारंगिये पै. कादरबक्ष खांसाहेब यांच्याबद्दल तरी काय सांगावे ! त्यांच्या मुलायम हातांतून पदाचे शब्दोच्चार आणि स्वरमिलाफ इतका उत्कृष्ट होत असे की, पदातील शब्द जसेच्या तसे प्रेक्षकांना ऐकू येत असत. तिरखवां खांसाहेबांसारखे पट्टीचे महान तबलानवाझ, कादरबक्ष खांसाहेबांसारखे सारंगिये, व आपला जीव पणाला लावून ऑर्गनची साथ करणारे हरीभाऊ देशपांडे– असा हा त्रिवेणी संगम ! त्या सुर-संगमात नानांना डुंबत राहण्यात सुखसर्वस्व वाटावे यात काय नवल ! त्याचप्रमाणे इतर

कलाकार म्हणजे श्री. राजण्णा रबकवी हे पूर्वीपासून कंपनीला लाभलेले एक उत्कृष्ट असे तबलजी होते. ते जरी रामदुर्ग या कर्नाटकी संस्थानातील होते तरी त्यांनी गंधर्व कंपनीच्या नाटकांतील पदे आपल्या ढंगदार आणि कुशल वादनाने रंगवलेली होती. तिरखवां खांसाहेबांच्या जोरकस आणि उत्तरेकडील नवा बाज व ढंग आणि तयारी यांमुळे खांसाहेबांचा प्रभाव पडत असे. श्री. दत्तोबा जंगम हे ऑर्गनची साथ इतकी उत्तम करीत असत की, त्यांच्या हातून एकही शब्द अगर सूर निसटून जाऊ शकत नसे.

ऑर्गनची उत्तम साथ करणाऱ्यांपैकी केशवरावजी कांबळे हे गंधर्व कंपनीच्या ऐन उत्कर्षाच्या वेळी कंपनीत होते. पण त्या वेळी माझे वास्तव्य कंपनीत नसल्याने त्यांच्या सहवासाचा योग त्या वेळी जरी मला आला नाही तरी ते भाग्य मला नंतर लाभले. पदांच्या लहानसहान नाजुक जागा, मुरक्या आणि हरकती त्यांच्या मुलायम हातांतून सहज निघून जात, आणि गायकाला पुढे नवीन सुचवल्याही जात असत. गाण्यातील व आवाजातील चढउताराप्रमाणे सुरांची व्यापकता राखून त्या प्रमाणात त्यांची साथ होत असे. असे सांगतात की, गंधर्व कंपनीत पूर्वी त्यांच्याच साथीवर सर्व नाटकांची मदार होती. ते आपले काम आपल्या अंगच्या कुशलतेने उत्कृष्ट करीत असत. तरी पण गंधर्वांची त्यांच्याबद्दलची भावना सकारण अथवा अकारण अशी झाली होती की, –तो आढ्यताखोर आहे! गात असताना डोळे वटारून तो आपल्याकडे पहात राहतो! हा त्यांचा ग्रह एखाद्यास हास्यास्पद वाटण्यासारखाच होता. केशवराव यांचा स्वभाव आणि नैसर्गिक दृष्टी यांचा गंधर्वांना अंदाज लागला नसावा असे वाटते.

गाणे शिकवणे,–म्हणजे आपणच सर्व गाऊन दाखवणे

नानांनी कोणालाच गण्याचे शिक्षण असे आपण स्वतः होऊन दिले नाही. ते जेव्हा रंगभूमीवर नाटकाच्या वेळी स्वयंस्फूर्तीने रंगून गात

असत, तेव्हा जे रसग्रहण करता येत असे तेच शिक्षण ! माझ्या बाबतीत तरी असे झाले होते. कंपनीच्या बिऱ्हाडी एखादे वेळी नानांच्या अपरोक्ष, कोणा तरी साथीदारासह गात असावे आणि त्यांनी अचानक येऊन 'असे नव्हे, असे' म्हणून गाऊन दाखवावे इतकीच मजल जात असे. मुंबईच्या मुक्कामी एक वेळ, नाना नाहीत असे पाहून मी 'एकच प्याला' नाटकातील 'शंकाहि नाहि कालिज्या' हे मांडखमाज रागातील पद म्हणत असता ते असेच तेथे आले. ताल व पदाचे शब्द यांची जुळाई बरोबर होत नसल्याचे पाहून, त्यांनी पुढे येऊन मूळ चीजेपासून (मैं तोसे नहीं बोलो रे) सुरुवात केली व किती वेळपर्यंत वेगवेगळ्या हरकती व सुरावट सांगत राहिले. आणखी एका अशाच प्रसंगी 'सौभद्र' नाटकातील 'पुष्पपराग सुगंधित' हे पद असेच म्हणत असता, अशाच प्रकारे त्यांनी तास–दीड तास ते म्हणून दाखवले. शिक्षण म्हणून एवढेच त्यांच्या तोंडून मला मिळाले असे म्हणता येईल.नाना मला दुर्गेश किंवा दुर्गेशा याच नावाने संबोधीत असत.

त्यांच्या वेगवेगळ्या नाटकांतील विविध भूमिका आणि त्यांतील अलग वैचित्र्य व त्या त्या भूमिकेशी तादात्म्य होणे वगैरे गोष्टी ध्यानात आणल्या म्हणजे ते अविस्मरणीय प्रसंग आजही डोळ्यांसमोर उभे राहतात. 'द्रौपदी' नाटकातील पहिल्या अंकात, मयसभेतील द्रौपदी-स्वयंवराच्या चित्राकडे, आणि त्याच वेळी प्रवेश केलेल्या द्रौपदीकडे पाहून दुर्योधन म्हणतो की, 'मला हे चित्र पाहवत नाही; हेही नाही आणि तेही नाही.' त्या वेळचे बालगंधर्वांचे दिमाखदार भाषण; आणि पुढे धर्मराजाला दुर्योधन दर्पोक्तीने बजावतो की, 'माझी अग्रपूजा आत्ताच्या आत्ता तू केली पाहिजेस, तरच पांचालीच्या हसण्याचे शल्य या हृदयातून निघणार आहे, नाही तर...' त्या वेळचे द्रौपदीच्या भूमिकेतील "मी हसले ! कोण नाही हसणार ?' वगैरे तडफदार भाषण, म्हणजे पुराण-

कालीन खरी द्रौपदी कशी असू शकेल याचे मूर्तिमंत चित्र डोळ्यांपुढे उभे राहात असे. काय तो दिमाख, आणि सम्राज्ञीपणाचा रुबाब,–आणि डौल !

‘ मी दासी नाही, स्वतंत्र आहे ! ’

गुरुवर्य काकासाहेब खाडिलकर यांची लेखनशैली आणि विद्वत्ता आदि भाग यांच्या जोडीला बालगंधर्वांनी त्यांच्या लिखाणाला योग्य साथ आणि उठाव देऊन कै. खाडिलकर यांची नाटके गाजवली. द्रौपदी दासी वेषात प्रवेश करते त्या वेळी काळजाला भिडणारे, आपल्या सम्राज्ञीपणाला कमीपणा आणणाऱ्या स्थितीबद्दलचे करुणोद्गार आणि श्रीकृष्णाबद्दलचा भक्तिभाव, त्याचप्रमाणे “ तूं कौरवांची दासी झाली आहेस ! ” असे दुःशासनाने उच्चारताच, चवताळलेल्या नागिणीप्रमाणे द्रौपदीने काढलेले “ मी दासी नाही,– स्वतंत्र आहे. ” वगैरे उद्गार व तो आवेश हे सर्व पाहण्याचा योग आता पुन्हा कसा येणार ? वरील सर्व प्रसंग चिरस्मरणीय व कोरीव असेच राहातील.

‘ स्वयंवर ’ नाटक म्हणजे, अथपासून इतिपर्यंत उत्साही वातावरण निर्माण होत असे. नाना त्यात रंगलेले असायचे. या नाटकाचा प्रयोग केव्हाही कंटाळवाणा असा झालेला पाहण्यात नाही. त्यातील एक एक प्रसंग आणि प्रवेश नानांनी अजरामर करून ठेवलेले आहेत. रुक्मिणीच्या “ दादा,– ते आले ना ! ” या वाक्यापासूनच प्रेक्षक रंगून जात आणि नानासुद्धा प्रेक्षकांच्या आनंदाशी समरस होऊन, वाढत्या खुलावटीने आपल्याबरोबर प्रेक्षकांनाही एकरूप व्हावयास लावत. स्नेहलतेशी (दासी) संवादात: “ मी सर्वांच्या आधी त्यांना पाहिलं ” म्हणताना त्यांचा आणि स्नेहलतेचा जो मूकाभिनय होत असे तो प्रेक्षकांना पुरे वेडे करीत असे. स्नेहलतेची भूमिका प्रथम कै. सदाशिवराव रानडे व नंतर श्री. शंकरराव कुलकर्णी फारच उठावदार रीतीने करीत असत.

शिशुपालालाच वरण्याबद्दल रुक्मी (भाऊ) रुक्मिणीला आर्जवाने आणि धाक दाखवून, स्वयंवराचा मंडप उद्ध्वस्त करण्याची भाषा बोलतो, आणि त्या वेळी दुंदुभी वाजत असतात त्या वेळी भीष्मकाच्या (रुक्मिणीचा बाप) तोंडून "या दुंदुभी यादवसेनेच्या आहेत!" असे उद्गार निघताच, त्यांचा पूर्वीचा सर्व नूर क्षणार्धात पालटून "महालक्ष्मी नवसाला पावली हो!" या वाक्याच्या मध्यंतरी जो त्यांचा स्वाभाविक अभिनय होत असे,– तो ज्यांनी पाहिला असेल त्यांनाच त्यातील मौज समजणार! चवथ्या अंकातील गवळीवाड्याजवळ, यमुना तीरावरील त्यांचे भाषण आणि "खडा मारायचा झाला तर–" आणि "खड्याने घागर फुटून मी ओलीचिंब झालेली मला नाही आवडायचं...." वगैरे प्रसंगी त्यांचा अल्लड कुमारिकेलाच शोभणारा आणि कृष्णमय झालेल्या रुक्मिणीचा अभिनय यथायोग्य नव्हता असे कोण म्हणेल?

बहुरूपा ती जनवाणी

काही काही सोवळ्या वृत्तीच्या व्यक्तींचा असा आक्षेप दिसून येई की, रुक्मिणीसारख्या सोज्वळ राजकन्येला असला थिल्लर अभिनय शोभून दिसत नाही. पण कोणतीही तरुणी एकांतात यापेक्षा कितीतरी प्रमाणात निर्लज्ज होऊ शकेल आणि चाळे करील यात संशय नाही. बालगंधर्वांचा अभिनय या दृष्टीने केव्हाही सोज्वळ स्वरूपाचाच होता असे म्हणावे लागेल. त्यातून कोणत्याही पुरुष नटाला स्त्री-भूमिकेचा योग्य आविष्कार दाखवावयाचा तर, थोडा अतिरेक केल्याशिवाय स्त्री-भूमिकेचे उठावदार दर्शन देता येणार नाही हा अनुभव आहे.

कै. ना. वि. कुलकर्णी कृत 'संत कान्होपात्रा' हे नाटक (१९३१) अखेर रंगभूमीवर आले. तेव्हापासून नानांच्या नाट्य-जीवनात एका नव्याच अशा भक्तिप्रवाहाचा उगम झाला. कान्होपात्रा नाटकातील अभंग ते इतक्या भक्तिभावाने आणि तन्मयतेने म्हणत की, त्यांचे ते

सर्पराजाहि मुग्ध झाला!

निपाणीची हकीकत. गंधर्व कंपनीचा मुक्काम तेथे होता. दुपारी 'सावित्री' नाटकाचा प्रयोग चालू होता. सावित्री (बालगंधर्व) नारदाला (हरिभाऊ देशपांडे) सत्यवानाशी लग्न करण्याचा निर्धार सांगत होती. गंधर्वांचे गाणे रंगात आले होते. दत्तोबा जंगम ऑर्गनवर होते. इतक्यात एक प्रचंड सर्पराज ऑर्गनजवळून रंगभूमीवर चढला. निपाणीस ताप पुष्कळ, वेळ दुपारची. त्यामुळे तो सावलीसाठी आला असावा. ऑर्गनमुळे प्रेक्षकांना सर्पराज दिसत नव्हता. बालगंधर्व गाण्यांत रंगले होते. त्यांना भानच नव्हते. नारदाच्या अंगाला घाम सुटला. त्याची वाचा जणू काही बंद पडली. सर्पराज नारायणरावांच्या पायाजवळ आला. क्षण दोन क्षण त्यानें सावित्रीकडे पाहिले. त्याला काय वाटले कोणास माहीत. तो सरळ निघून गेला. आणि तेव्हांच प्रेक्षकांना त्याचे दर्शन घडले.

अभंग एकण्यासाठीच ‘ कान्होपात्रा ’ नाटक पहावे अशी लोकांची दृष्टी झाली होती. अभंग गायनाचा यथायोग्य उठाव आणि रंगत जमण्याच्या दृष्टीने त्यांनी श्री. पांडोबा बोंद्रे या ख्यातनाम अशा पखवाजींना आपल्या पदरी ठेवून घेतले होते. त्यांच्याच प्रोत्साहनाने, अभंग म्हणण्याचा आणि भजनाचा सराव होण्याच्या दृष्टीने गंधर्व कंपनीत पुढे भजनाची प्रथा सुरू झाली.

पाहे प्रसादाची वाट

दर गुरुवारी हा भजनाचा कार्यक्रम कंपनीतील भांडारकर आदि मंडळींकडून सुरू झाला, पण त्यानंतर त्यांत श्री. बालगंधर्वही सामील होऊ लागले. मोठमोठ्या शहरी कंपनीचा मुक्काम असताना, भजनाचा हा एक प्रकारचा सोहळाच होत असे, आणि श्रोतृसमुदायही कल्पनातीत गोळा होत असे. भजनाच्या अवीट गोडीनंतर खिरापत म्हणून प्रभूचा प्रसाद मिळत असे तो वेगळाच. भजनातील त्यांचा शेवटचा अभंग बहुशः “ पाहे प्रसादाची वाट ” (भैरवी) हा असायचा. बैठकीवर बसून भजन करणे त्यांना नापसंत असे. प्रभूचा दास किंवा भक्त या पायरीवर उभे राहूनच त्याचे नाम-संकीर्तन झाले पाहिजे आणि त्याचे थोड़े श्रमही झाले पाहिजेत अशी नानांची मनोभूमिका होती. नाटयापेक्षा या भजनाच्या कार्यक्रमानेच लोकांचे मन वेधून घेतले होते. नानाही भजनानंदात डुंबत असल्यासारखे रंगून जात आणि राजहंसाप्रमाणे सूरसागरात डोलत राहात. भजनातील समाधीसुख अनुभवीत असताना ते श्रोत्यांनाही तेच सुख देत असत. भजनाचे हे दृश्य पाहून कंपनीच्या चालकांच्या (व्यवस्थापक) मनात असे येई की, या भजनानेच जर लोकांचे समाधान होऊ लागले तर नाटकगृहाकडे यापुढे प्रेक्षकवर्ग कसा वळणार ! पण तसे घडले नाही. ही त्या पांडुरंगाचीच कृपा.

‘ कान्होपात्रा ’ नाटकातील कान्होपात्रा शेवटी पंढरपुरास पांडुरंगाच्या मंदिरात प्रवेश करते तेव्हा बडवे लोकांकडून अडवणूक होते; त्या वेळी

म्हटलेले अभंग आणि श्री. विठ्ठलाच्या नावाने फोडलेला टाहो अजूनही अंत:करण गहिवरून सोडतो. त्यांच्या गायनाच्या बैठकीत सुद्धा अभंग म्हणण्याचीच लोकांकडून विनवणी होत असे. त्यांच्या नाट्यविषयक आठवणीच नुसत्या सांगायच्या म्हटले तर त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

काश्मिरी ओव्हर कोटातील सिंधू

एकदा सातारा मुक्कामी कंपनी असताना डिसेंबर महिन्यातील थंडीचा कडाका पडला होता. आजूबाजूस जवळ डोंगर असल्याने, संध्याकाळ-पासूनच थंडी पडून गारठा उत्पन्न होई. नाटकाच्या वेळी दोनही बाजूंच्या विंगात आत निखारे फुललेल्या शेगड्या ठेवलेल्या असतच, पण एकदा 'एकच प्याला' नाटकाच्या वेळी रात्री जसजशी थंडी वाढत गेली तेव्हा तिसऱ्या अंकानंतर रंगभूमीवर जाऊन गाणे अगर बोलणेही कठीण वाटू लागले, तेव्हा नानांनी तथाकथित सिंधूच्या भूमिकेतील फाटक्या अवस्थेतही आपल्याबरोबरचा काश्मिरी ओव्हर कोट वापरून सिंधूची भूमिका अखेरपर्यंत केली. व मलाही (शरद्) पुरुष नटांच्या कपड्यातील डबलब्रेस्ट कोट घालण्यास सांगितले. याच मुक्कामातील दुसरी मजेदार गोष्ट म्हणजे 'मृच्छकटिक' नाटक होते. पावसाच्या देखाव्याच्या वेळी थंडगार पाणी अंगावर घेणे अशक्य वाटल्याने, रंगभूमीवरील माळ्यावर पाणी तापविण्याची सोय करून गरम पाण्याचा पाऊस पाडण्याची योजना झाली; पण ऐन पावसाच्या वेळी जलधारा दिसण्याऐवजी, रंगभूमीवर पाण्याची वाफच जास्त प्रमाणात दिसून, धुके पसरल्याचा भास उत्पन्न झाला.

नानांचा मित्रपरिवारही फार मोठा होता. त्यातील जीवाभावाचे आणि पुण्यातच वास्तव्य करणारे असे मित्र नेहमीच त्यांच्या बैठकीत असत, आणि कंपनी जेव्हा मोठ्या मुक्कामाला जाईल तेथे तेथे आपले-

पणाने, मजा म्हणून ते जमत असत. नाटक असो वा नसो, नानांची दिनचर्या सावकाश पद्धतीने व मित्रमंडळींशी गप्पा मारत चालत असे. कंपनीतील मंडळींची पंगत जेवून उठली तरी नानांचे स्नान सुद्धा झालेले नसायचे. आणि या स्थितीतून त्यांना वरचेवर जागे करण्याचे काम ती. स्व. आजीबाई (गंधर्वांच्या मातोश्री) वेळ प्रसंगी दरडावूनही करीत. भोजनाची पंगत दुपारी बाराच्या सुमारास होत असे. भोजनाची व्यवस्था व पदार्थ सर्वोत्कृष्ट असत हे सांगणे नकोच. सणवार असेल तेव्हा नाना पंगतीबरोबर बसण्याचा प्रयत्न करीत व कंपनीतील मंडळींचाही तसा आग्रह असायचा. पण नेहमी मात्र नानांच्या मित्र-मंडळींची पंगत नानांच्या समवेत, म्हणजे त्यांचे तीसचाळीस घागरींचे अघळपघळ स्नान व त्यानंतर कंपनीच्या देवघरातील देवदर्शन वगैरे यथासांग झाल्यावर नंतर होत असे.

दुपारच्या नाटकानंतरचा श्रमपरिहार आणि सामिष भोजन

शनिवारी रात्री व रविवारी दोन प्रहरी असे नाट्यप्रयोग असले, म्हणजे नाना शनिवारी दोन प्रहरी एकदा जेवत असत ते त्यानंतर रविवारी नाटकानंतर रात्रीचे भोजन करीत. मध्यंतरी जरूर तेव्हा केशरी दुधावर भागवीत असत. नानांच्या करता रविवारी रात्री खास सामीष जेवणाची व्यवस्था केलेली असे. त्या व्यतिरिक्त आठवड्यातील मंगळवार, शुक्रवार अशा दोन रात्री तसल्या भोजनाकरता ठरलेल्या होत्या. बरोबरच्या मित्रमंडळींची उपस्थिती अशा वेळी असेच. पुण्या–मुंबईसारख्या ठिकाणी अशा मित्रमंडळींची संख्या तर अठरावीस-पर्यंतही जात असे. या पंगतीची लज्जत राखण्याच्या निमित्ताने काही मंडळी ‘ पूर्वरंगात ’ सामील होत असत. पण हे सर्व काम गुपचूप इतर ठिकाणी होत असे. ती. नाना त्यांना उपदेश करून सांगत असत की, जीवनाचा आनंद घेता येईल इतक्या प्रमाणातच ‘ पूर्वरंग ’ असावा ! पण कित्येकदा या गोष्टीस मर्यादा राहात नसे.

काही प्रसंगी नानांनी मित्रांच्या मेळाव्यात बसून स्वतःच्या हातांनी चषक भरून देण्याचे काम केलेले पहाण्यात आलेले आहे. त्यांचे सांगणे एकच की, करीत असलेल्या कार्यातून मजा घ्या ! त्रास होईल असा अतिरेक नको ! पूर्वकाळी नानांनीसुद्धा मदिरेचा आस्वाद घेतला होता, पण काही उपद्रवी घटनेपासून त्यांनी शपथपूर्वक त्या वस्तूला स्पर्शसुद्धा केला नाही. इतकेच नव्हे तर लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ त्यांनी चहा पिणे सोडले. आणि पुढे पुढे त्यांनी एका साध्या घरगुती प्रसंगावरून सुपारी, तंबाखूही खाण्याचे सोडून दिले. इतके ते निग्रही होते. एकदा एखादी गोष्ट त्याज्य असा मनाचा ग्रह झाला की, ते त्यापासून सर्वथा अलिप्त रहात असत. असा मनोनिग्रह कोठेही पाहिलेला नाही. या मोठ्यांच्या गोष्टी अशाच विलक्षण असतात यात संशय नाही.

बालगंधर्व आणि श्री. वसंत शांताराम देसाई यांचा ऋणानुबंध

नानांच्या अनेक स्नेही मंडळीत सुप्रसिद्ध नाटककार श्री. वसंत शांताराम देसाई हे बहुमानाने वागवले जात असत. त्यांची संगीत ‘विधिलिखित’ आणि अलीकडील नाटक ‘अमृतसिद्धि,’ ही दोन्हीही नाटके ‘गंधर्व नाटक मंडळी’ करीत असे. ‘अमृतसिद्धि’ हेच कंपनीचे नवीन नाटक अत्यंत लोकप्रिय असे ठरले गेले होते. पूर्वी ते सिव्हिल जज्ज म्हणून गॅझेटेड ऑफिसर असल्याने, त्यांना कोर्टाची सुट्टी असेल तेव्हांच शक्य असल्यास कंपनीत त्यांचे आगमन व्हायचे. ते कंपनीत असत तोपर्यंत एक प्रकारचे उत्साही वातावरण निर्माण होत असे. त्यांचे विनोदी पण गर्भित अर्थांचे भाषण आणि बोलण्याचा आविर्भाव पाहून, एक प्रकारचा उच्च दर्जाचा विनोद उत्पन्न होई व त्यांच्या विद्वत्तेबद्दल आदर निर्माण होत असे. नानांचा आणि त्यांचा तसाच आंतरिक ऋणानुबंध होता व त्या दृष्टीने बालगंधर्वांच्या कलाकृतींचा परामर्श वेळोवेळी त्यांनी आपल्या

लिखाणातून घेतला आहे. नानांच्याबद्दलची प्रेम, भक्ती, एवढेच नव्हे तर केवळ बालगंधर्व आणि त्यांची नाट्यसृष्टी आणि त्यांचे गुणगान एवढ्याचकरता त्यांनी आपली लेखणी चालवली असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

बालगंधर्व-प्रभात

सन १९३४ मध्ये कोल्हापूरच्या मुक्कामात श्री. बाबूराव रुईकर सावकार यांनी गंधर्व कंपनीला त्या वेळी असलेल्या थोड्या फार कर्जातून मुक्त करण्याकरता आणि नानांच्या पुढील आयुष्यातील सुख-स्वास्थ्याच्या दृष्टीने एक योजना आखली. सुप्रसिद्ध प्रभात फिल्म कंपनीचे श्री. व्ही. शांताराम आणि श्री. बालगंधर्व यांच्याशी वाटाघाटी करून "बालगंधर्व-प्रभात" या नावाने वेगळीच शाखा निर्माण करून त्यामध्ये गंधर्वांनी दोन चित्रपटात भूमिका कराव्यात असे ठरवले. श्री. व्ही. शांताराम यांनी त्यानंतर कंपनीतील लोकांचे पगार वगैरे भागवून दिपवाळीच्या सुमारास कंपनी कोल्हापुरास बंद ठेवली गेली.

महात्मा की धर्मात्मा ?

पुण्यास प्रभातमध्ये ती. नाना काम करीत असताना एकनाथ महाराजांच्या भूमिकेत ते कसे दिसतील आणि स्त्री-भूमिकेशिवाय रंग-भूमीवर त्यांना न पाहिलेल्या रसिकांस ते चित्रपटांत कसे वावरतील या गोष्टीचे महत्त्व राखण्याकरिता, त्याचे एकही छायाचित्र "बालगंधर्व-प्रभात कन्सर्न" ने चित्रपट पुरा होऊन पडद्यावर येईपर्यंत प्रसिद्ध केले नाही. त्या चित्रपटास 'महात्मा' हे नामाभिधान करण्याचे ठरले होते, पण त्या गोष्टीला सेन्सॉर व सरकारकडून मनाई झाल्याने पुढे तो चित्रपट 'धर्मात्मा' या नावाने प्रदर्शित झाला. बोलपटात काम करण्याचे नानांनी मनात ठरवून तशी संमती दिल्यावर त्यांनी एकनाथाच्या भूमिकेसाठी अपार कष्ट घेतले. आपला सुखासीन देह कमी

व्हावा म्हणून, चालण्याची व पळण्याची मेहनत दररोज न चुकता एक दोन तास याप्रमाणे कायम चालू ठेवली होती. आहारामध्येही समतोलपणा राखून योजलेल्या भूमिकेस आपण योग्य दिसावे म्हणून कित्येक पौंड वजन कमी केले.

ती. नानांशिवाय गंधर्व कंपनी

'गंधर्व नाटक मंडळी' तशीच बंद ठेवून स्वस्थ बसण्यापेक्षा ती. नानांच्या गैरहजेरीत का होईना, पण इतर नटांच्या सहकार्याने तशीच पुढे चालू ठेवण्याचा विचार झाला. ती. स्व. बापूराव राजहंस, श्री. लोंढे, श्री. वालावलकर, श्री. हरीभाऊ देशपांडे व इतर नट मंडळी पुण्यासच असल्याने, मलाही तेथे बोलावून घेण्यात आले. 'बालगंधर्व–प्रभात' मध्ये नानांचे काम चालू असताना त्यांच्या बरोबरचे साथीदार म्हणून श्री. पांडोबा बोंद्रे पखवाजाकरता व ऑर्गनकरता श्री. हरीभाऊ देशपांडे व श्री. दत्तोबा जंगम हे कामापुरते प्रभातमध्ये जात असत.

प्रभातचे पाच, त्यात आणखी एक बालगंधर्व !

श्री. शांतारामबापूंनी ती. नानांची बडदास्त तशी योग्य प्रकारे ठेवली होती. प्रभात कंपनीचे जसे इतर चार भागीदार होते व त्यांचा दर्जा जसा राखला जात असे, त्याच दर्जाने व इतमामाने बालगंधर्वांची राहाणी व रुबाब असावा म्हणून प्रभात कंपनीत जाण्या–येण्यास सोईचा असा जिमखान्यावरील एक बंगला भाड्याने घेतला होता. त्यांच्या दर्जाला शोभेल अशी नवीन मोटारही घेण्यास त्यांना भाग पाडले. अर्थात् हा सगळा व्यय बालगंधर्व प्रभात कन्सर्नच्या ठरलेल्या अर्ध भागीच्या व्यवहारातूनच चालला होता. नानांचा मासिक तनखा आणि त्यांच्या साथीदारांचे पगार वगैरे याच हिशेबातून चालत. नाना जिमखान्यावर राहात असताना, मलाही सहलीची सवय व आवड असल्याने, सकाळी लवकर बंगल्यावर जाऊन, त्यांच्या बरोबर चालत व पळत फर्ग्युसन टेकडी-

वरून पुढे वेतालेश्वराच्या डोंगरापर्यंत आम्ही जाऊन येत असू. कधी कधी पर्वतीवर भ्रमण होई. सकाळच्या सहलीच्या वेळी अंगावर सूर्यकिरण पडले पाहिजेत असे त्यांचे म्हणणे असे. असा क्रम कित्येक दिवस चालला होता.

इकडे गंधर्व कंपनीची पुनर्घटना करण्याच्या दृष्टीने पुण्यास फुलवाल्याची धर्मशाळा, राहण्याकरता मुक्रर केली होती. गंधर्व कंपनीच्या बहुतेक सर्वच नाटकांच्या तालमी चालू केल्या होत्या. श्री. बापूराव राजहंस यांनी संगीत 'सावित्री' आणि संगीत 'द्रौपदी' या नाटकातील प्रमुख भूमिकांचा वाटा उचलला होता व इतर सर्व नाटकातील प्रमुख स्त्रीभूमिका मला कराव्या लागत. प्रथम ' मानापमान, संशयकल्लोळ, मृच्छकटिक, सौभद्र, आशा-निराशा, कान्होपात्रा ' इत्यादि नाटकांची तयारी होऊन पुनर्घटित कंपनीच्या कार्यक्रमास ता. २८ ऑक्टोबर १९३९ रोजी मा. कृष्णराव यांनी ' स्वयंवर ' नाटकात रुक्मिणीच्या भूमिकेने सुरुवात करून मुहूर्त केला.

नको ! ते सिनेमातील रुक्ष काम नको

नाना जरी ' बालगंधर्व-प्रभात 'मध्ये काम करीत होते, तरी त्यांना तेथील तापदायक वातावरण पसंत नसायचे. ते जेव्हा आपल्या मातोश्रीकडे रामेश्वर चौकातील घरी येत तेव्हा, तेथे होत असलेल्या त्रासाबद्दल बोलताना आढळत. पुढे पुढे, तेथील लाईटचा त्रास असह्य झाल्याच्या वगैरे तक्रारी त्यांच्या मुखातून येऊ लागल्या. अर्धा पाऊण तास गाण्याची व त्यात रंगून जाण्याची त्यांची वृत्ती ! त्यांना तेथील तीनचार मिनिटांच्या बंदिस्त गाण्याची सवय व तयारी करताना त्रासाचे होऊ लागले. तेथील रुक्ष कामापासून आणि सर्वस्वी यंत्राशी येणाऱ्या संबंधामुळे, शिस्तीमुळे त्यांचा जीव तेथे रमेनासा झाल्यास नवल नाही. पुढे पुढे तर चित्रपटाचे काम जसजसे जोरात चालू झाले तेव्हा डायरेक्टराच्या सांगण्याप्रमाणे पण मनाविरुद्ध काम करताना बेबनावाचे प्रसंग

आल्याचे कळले. ठरलेल्या दुसऱ्या चित्रपटात आपण काम करणार नसल्याचे ते बोलू लागले.

बालगंधर्वांशिवाय 'गंधर्व नाटक मंडळी' ने आपला नाट्य-संसार सुरू केल्यानंतर पुण्यास जवळ जवळ एक महिना काढून त्या अवधीत 'अमृतसिद्धि' नाटक प्रयोगावस्थेत आणले आणि ते कल्पनेपेक्षाही यशस्वी झाले. पुण्याहून पहिला मुक्काम साताऱ्यास झाला असताना, 'अमृतसिद्धि, कान्होपात्रा' आदि नाटकांनीच कंपनीला यशाचा मार्ग दाखवला. सातारा येथील यशस्वी कार्यक्रम संपवून कंपनी १९३५ अखेर एकदम रत्नागिरी-सारख्या, गंधर्व कंपनीस अपरिचित अशा ठिकाणी मुक्कामास गेली. त्या वेळी तालमीत असलेल्या 'एकच प्याला' नाटकाच्या प्रयोगाला तेथूनच सुरुवात झाली. रत्नागिरी हे त्या वेळी फारसे सुधारलेले गाव (बंदर) नव्हते. अशा स्थितीत, मुंबईहून मुद्दाम व्यवस्था करून आणलेल्या एंजि-नाच्या सहाय्याने, विद्युत्प्रकाशांत आपले नाट्यप्रयोग सुरू केले. गावात विजेचे दिवे नसल्याने, कंपनीने बिजलीचे दिवे आणले हे एक कुतुहल आणि नावीन्य लोकांमध्ये झाले होते.

बालगंधर्व रंगभूमीवर पुन्हा काम करणार नाहीत !

रत्नागिरी मुक्कामाच्या वाटचालीनंतर परत कंपनीचा दौरा कोल्हापूर-निपाणी या बाजूस वळला. निपाणीस कंपनी असताना, कोल्हापूर व इचलकरंजी येथेही काही प्रयोग करण्यात आले. पुण्याहून नानांच्या आणि 'बालगंधर्व-प्रभात कन्सर्न'च्या दरम्यान चालू असलेल्या मतभेदाच्या गोष्टी कानावर येत होत्याच. निपाणीस लोकांनी कंपनीस उदार आश्रय दिलाच आणि मानसन्मानही केला. गंधर्व कंपनीबद्दलची सहानुभूती; आणि जनतेची समजूत अशी की, यापुढे श्री. बालगंधर्वांचे काम रंगभूमीवर दिसणार नाही. या सर्व गोष्टींमुळे नानांच्या गैरहजेरीतही कंपनीला कसलीच अडचण अगर नुकसान असे सोसावे लागले नाही.

गंधर्व कंपनीच्या नाटकातून भूमिका करण्याची संधी मिळणे हे भाग्याचे, त्यातूनहि बालगंधर्वांच्याच सुप्रसिद्ध भूमिका करण्यास मिळणे हे महद्‌भाग्याचे लक्षण असे जरी मनास आणि इतरांस वाटत असले, तरी त्या जागी उभे राहून त्यांच्या भूमिका वठवणे म्हणजे एक प्रकारची धास्ती व जबाबदारी वाटत होती यात संशय नाही. आपल्या दैवी नाट्यगुणांनी आणि स्वर्गीय संगीताने जी नाटके बालगंधर्वांनी इतकी नटवली, सजवली आणि गाजवली, त्या ठिकाणी माझ्यासारख्या, त्यांचा अंशात्मकही गुण नसलेल्याने ते धाडस करणे हे विपरीत असेच होते. तरी पण आलेल्या संधीचा फायदा त्यांच्याच कृपाशीर्वादाने घ्यायचा असे ठरवले आणि त्यांच्याच सदिच्छेने कटिबद्ध झालो. त्याकरता मला मेहनत घेणे जरूर होते आणि ती मी मोठ्या उत्साहाने आणि उमेदीने घेत होतो. मला माझ्या जबाबदारीची जाणीव होतीच आणि नानांनीही मला कधी निरुत्साह न दाखवता उलट उत्तेजन दिले. या बाबतीत तरी त्यांचा पूर्ण आशीर्वाद होता हे खरे. नानांचा माझ्यावर एक प्रकारचा दबाव असला तरी माझ्याबद्दल त्यांच्या अंतःकरणात आपुलकीचा भाव होता व त्याच भावनेने मीही तितक्याच घरोब्याने सर्व कुटुंबियांशी वागत होतो. घरच्या सर्वांनी मी एक नोकर आहे, असे कधीही न भासवता आपल्या बरोबरीने वागणूक दिली. मी जरी गंधर्वांच्या भूमिका करू लागलो तरी मला जाणीव होती की, मी कितीही कोशीस केली तरी त्या सम्राटाच्या सिंहासनाच्या पायरीलाही स्पर्श करणे मला शक्य होणार नाही. केवळ त्यांच्याच कृपादृष्टीने मी या दिव्यातून पार पडलो यात संशय नाही.

बोलपटातून सुटून परत आपल्या रंगभूमीवर

निपाणीच्या मुक्कामानंतर बेळगाव येथे कंपनीचे प्रयाण झाले, पण तोपर्यंत पुण्यास ती. नानांचे प्रभातबरोबरचे बे-बनाव पराकोटीला

जाऊन त्यांनी आपले संबंध तोडून टाकले आणि ठरलेले कॉन्ट्रॅक्ट रद्द करून, चालू असलेल्या गंधर्व नाटक मंडळीत येऊन आपल्या भूमिका करण्याचे ठरवले; आणि त्याप्रमाणे बेळगावचा मुक्काम चालू असतानाच पुण्याहून येऊन त्यांनी आपल्या लोकप्रिय भूमिका करण्यास आरंभ केला. 'बालगंधर्व-प्रभात' मध्ये ती. नानांनी कॉन्ट्रॅक्ट न मोडता, जो थोडा फार मानसिक किंवा शारीरिक त्रास होईल तो सोसण्याचे ठरवले असते, तर व्यवहाराबाबत ठरलेल्या करारानुसार त्यांना लक्षावधी रुपयांचा फायदा झाला असता. पण ते त्यांच्या लेखी नव्हते. एखाद्या व्यवहारचतुर व्यक्तीने अशी संधी हातची जाऊ दिली नसती; पण गंधर्वांसारख्या जन्मजात आणि खऱ्या कलावंताला त्याची काय कदर! त्यांनी आपली कला आणि नाट्यगुण रंगभूमीलाच सर्वस्वी अर्पण केले होते. तिला सजवण्यात व रंगवण्यात आणि स्वतः रंगण्यातच त्यांनी जन्माचे सार्थक मानले. रंगभूमीचे सम्राट म्हणून उगाच नाही ते गणले गेले!

बालगंधर्व-स्मारकाची एक नवी योजना

बेळगावाहून कंपनी यथाक्रम हुबळी व पुढे मुंबई वगैरे ठिकाणी गेली. मुंबईच्या मुक्कामी १९३७ च्या सुरुवातीस श्री. बालगंधर्वांचे काही तरी योग्य स्मारक म्हणून राहावे या उद्देशाने, पूर्वी निर्देश केलेले बालगंधर्वांचे प्रेमी व अभिमानी कोल्हापूचे श्री. बाबूराव रुईकर यांनी, गंधर्व कंपनीच्या एखाद्या नाटकाचे बोलपटात रूपांतर करण्याची योजना आखून त्या दृष्टीने तीन चार महिन्यांच्या अवधीत ते काम आटोपण्याचे ठरवले. त्याकरता पुण्यास 'सरस्वती सिनेटोन' मध्ये बालगंधर्वांचे 'स्वयंवर' नाटकांतील गाण्याच्या प्रवेशाचे "नमुना चित्र" म्हणून एक दोन नमुने (टेस्ट पीसेस) घेण्यात आले. पुढे बऱ्याच वाटाघाटी होऊन, विशेष खर्चाशिवाय तयार होणारा नाट्य-चित्रपट म्हणून 'अमृतसिद्धि' या नाटकाची निवड झाली. कोल्हापूरचे चित्रपट महर्षी

सुप्रसिद्ध श्री. बाबूराव पेंटर यांच्या सल्ल्याने व सहाय्याने 'अमृतसिद्धि' नाटकाचा बोलपट घेण्याचे काम चालू झाले. त्यापूर्वी 'अलमआरा' या उर्दू नाटकाचा असाच बोलपट घेण्यात आला होता. तेच उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून, ज्याप्रमाणे रंगभूमीवर नाट्य-प्रयोग दाखवला जातो त्याचेच दृश्य दाखवायचे अशा स्वरूपांत (स्टेजटॉकी) तो चित्रपट तयार झाला. कंपनीतील नटांना कंपनीकडून मिळत असलेल्या पगाराच्या दुप्पट पगार देऊन त्यांचाच उपयोग चित्रपटात केला होता.

संगीत 'अमृतसिद्धी' चे बोलपटात रूपांतर

हे स्टेज टॉकीचे काम मुंबईस ताडदेव येथील फिल्मसिटी या स्टुडिओमध्ये पुरे झाले. श्री. बाबूराव रुईकर यांनी केवळ बालगंधर्वांवरील उत्कट प्रेमाकरता हजारो रुपये खर्च करून आणि कष्ट घेऊन आपली मनोभावना व्यक्त केली. बालगंधर्वांचे स्मारक म्हणून जरी ते कार्य स्तुत्य समजले गेले असले, तरी लोकाश्रयाच्या दृष्टीने ते फायद्याचे ठरले नाही. ती. नानांची मीराबाईच्या स्वरूपातील वैराग्यवृत्तीची भूमिका आणि क्लोजअप्स् वगैरे गोष्टी पडद्यावर पहाताना जनतेस पसंत पडण्यासारख्या नव्हत्या. पडद्यावरील चित्रपटात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच केल्या-शिवाय त्या उठावदार अगर शोभून दिसणार नाहीत हेच खरे. त्यातूनही बालगंधर्वांच्या स्त्रीभूमिकेचेच स्मारक म्हणून करावयाचे तर त्याकरता शृंगार व अलंकारयुक्त अशा रुक्मिणी, द्रौपदी वगैरेसारख्या स्त्री-भूमिकेचीच निवड व्हावयास पाहिजे होती.

नानांना सोडून नटमंडळी बाहेर पडली

मुंबईहून कंपनीचा मोर्चा पुढे अहमदनगर व नंतर येवले वगैरे बाजू-कडे वळला. नानांचा आवाज वयाच्या मानाने आणि हवामानानुसार बसण्याचे प्रसंग येत गेल्याने, त्याकरता डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे नानांना विश्रांती घ्यावी लागत असे. दम्याचाही उपद्रव होत होताच.

या गोष्टींचा परिणाम कंपनीच्या उत्पन्नावर झाल्याशिवाय राहिला नाही. त्यामुळे कित्येक वेळा नानांच्या मनात कंपनीमध्ये स्त्रियांच्या भूमिका करण्याकरता स्त्रियाच पाहिजेत असे विचार घोळू लागले. यापूर्वीही हे विचार त्यांनी कित्येक वेळा इतरांजवळ बोलून दाखवले होते. अशा या अस्थिर स्थितीमुळे व पगार थकल्याने आणि इतर काही कारणांनी कंपनीतून श्री. गंगाधरपंत लोंढे, श्री. वालावलकर, भांडारकर, हरीभाऊ देशपांडे वगैरे मंडळी नगरच्या मुक्कामापासून सेवानिवृत्त झाली.

कंपनीची केविलवाणी अवस्था

पुढे नगरहून येवल्यास कंपनी गेल्यावर, श्री. लोंढे हे कंपनीतून निघून गेलेले असल्याने त्या जागी प्रमुख पुरुष-भूमिका करण्यासाठी बरीच पहाणी होऊन, मुंबईहून श्री. कृष्णराव चोणकर यांस बोलावून त्यांची चाचणी झाली व निवड होऊन यथावकाश ते आपल्या भूमिका आत्मसात् करू लागले. वेळप्रसंगी येवल्याच्या मुक्कामात मला 'स्वयंवर' नाटकात कृष्णाचे काम करण्याची वेळ आली आणि पुढे धुळे मुक्कामी 'सौभद्र' नाटकातील कृष्णाचे काम करावे लागले. ही नाटके परिचयाची व नेहमीच्या पहाण्यातील असल्याने, त्या भूमिका पार पाडणे कठीण वाटले नाही इतकेच. त्यापूर्वी मी कंपनीत स्त्री-भूमिकेशिवाय इतर भूमिका केली नव्हती.

कर्ज ! कर्ज !! पुन्हा कर्ज !!

येवल्यास कंपनी असताना एक नवीनच घटना घडून आली, नानांच्या आवाजाने बरेच दिवस दगा दिल्यामुळे, आणि कंपनीतील बरेच नट पूर्वीच निघून गेल्याने, उत्पन्नाच्या बाबतीत कंपनीस बराच मार बसला. कंपनीला पैशांची अडचण निर्माण झाल्याने, ती. नानांच्या विम्याच्या पैशातून ती निवारण करण्याचे ठरले. त्याकरता मुंबईस हिंदुस्थान इन्शुअरन्स कंपनीकडे जाऊन येणे आवश्यक होते. नानांच्या

सहीशिवाय ते काम पूर्ण होणारे नसल्याने, नाना आणि मी असे दोघेच सायंकाळच्या गाडीने, तिसऱ्या वर्गाने येवल्याहून निघून मुंबईस संध्याकाळी सात-आठ वाजता पोचणार होतो. नानांचे पुण्याचे परमस्नेही श्री. सातपुते बंधूंपैकी डॉ. सातपुते हे त्या वेळी गिरगावात दोन हत्तीसमोर रहात होते. त्यांच्याकडे आम्ही येणार असल्याची तार पूर्वीच केली होती.

गोहरबाईचा आणि ती. नानांचा प्रथम परिचय होण्यापूर्वी तिने त्याकरता बऱ्याच खटपटी लटपटी केल्या होत्या. पुण्याचेच पण तिच्या ओळखीचे आणि गंधर्व मंडळीशी परिचित असलेले श्री. मामा मिटकर (आम्ही मामा म्हणत असू) यांच्याकडे संधान बांधून तिने गंधर्वांच्या मातोश्रींकडे जाऊन ओळख करून घेतली व गाऊनही दाखवले. अशा दोनतीन खेपांमध्येच तिने आजीबाईंच्या मनावर बरीच छाप पाडली. या सर्व गोष्टी नानांच्या अपरोक्षच झालेल्या होत्या तरी ती. आजीबाईंनी मात्र नानांच्या जवळ तिच्या गाण्याविषयी आणि स्वभाव-गुणाबद्दल बरीच तारीफ केली. तिचा नाटकात उपयोग करून घेण्याबद्दलही अजाणतेपणाने नानांना सुचविले. त्या वेळी नानांनी त्या गोष्टीचा विचारही केला नाही आणि त्यांना तशी आवश्यकताही वाटली नाही. आजीबाईंच्या घरी चालत असलेल्या या गोष्टी तिकडे नानांच्या कुटुंबाच्या घरी समजण्यास वेळ लागत नसे. गोहरबाईच्या पूर्वायुष्याबद्दलची सर्व इत्थंभूत हकीकत त्यांच्या कानावर आलेली असल्याने, त्यांनी नानांना निक्षून सांगितले की, काहीही झाले तरी या बाईचा संबंध नको! कोणीही सांगितले तरी या बाईची भेट अगर बोलणे तुम्ही टाळा! त्या बाईशी बोलण्याचे अगर तिला भेटण्याचे तुम्हाला काय कारण! नानांनी आपल्या पायरीने राहावे हाच याच्या मुळाशी हेतु होता.

यावरूनच तिच्या घरी नानांनी चहापाण्याच्या निमित्ताने जावे या गोष्टीस घरच्या मंडळींचा विरोध होता.

गोहर कर्नाटकीचे भोजनाचे आमंत्रण

मुंबईत गंधर्व कंपनीचा मुक्काम असे तेव्हा श्री. अनंत गणेश ओळकर म्हणून कंपनीचे हंगामी व्यवस्थापक (सीझन मॅनेजर) म्हणून काम पहात असत. त्यांनाही आम्ही अमुक कामगिरीकरता येणार हे आगाऊ कळवले होतेच, आणि त्यांच्याच माहितीने आणि मदतीने विमा कंपनीचे काम उरकण्याचे ठरले होते. आम्ही संध्याकाळी मुंबईस पोचताच श्री. ओळकर भेटले आणि आमची सर्व व्यवस्था वगैरे पाहून, दुसऱ्या दिवशी सकाळी विम्याच्या कामासाठी जाण्याचे त्यांनी ठरवले. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी नाना व ओळकर यांनी ती कामगिरी दोन प्रहरपर्यंत पार पाडली. दोन प्रहरनंतर श्री. ओळकर पुन्हा आले व त्यांनी आम्हास श्रीमती गोहरबाई कर्नाटकी यांच्याकडे सायंकाळी जेवणास बोलावले असल्याचे सांगितले. आमच्या मनात कसलाही किंतु येणे त्या वेळी शक्यच नव्हते.

पूर्वी तिला दुर्लभ झालेले नानांचे दर्शन

'गंधर्व नाटक मंडळी' चे मुंबईस प्रयोग चालू असताना गोहरबाई विशेषत: 'कान्होपात्रा' नाटक पहाण्यास येत असत. त्यातील अभंगांनी त्यांना वेड लावले होते. ते म्हणण्याची परवानगी अगर कसे म्हणावेत याचे मार्गदर्शन त्यांना पाहिजे होते. बाईंनी त्याकरता कंपनीचे मॅनेजर श्री. बापूराव राजहंस यांच्याकडे ती. नानांना भेटण्याची संधी देण्याबद्दल बरेच वेळा विनवले होते. एकदा तरी गंधर्वांचे तिच्याकडे चहापाण्याच्या निमित्ताने आगमन व्हावे अशी तिची तीव्र अपेक्षा होती, पण तिच्या विनंतीला श्री. बापूरावांनी केव्हाही रुकार दिला नाही अगर भेट घेऊ दिली नाही. घरातील इतर मंडळींचाही तिच्या घरी नानांनी जावे या गोष्टीस विरोध होता. त्या गोष्टीस काय कारणे होती ते सांगणे अप्रस्तुत होईल.

नाट्य-संगीत आणि भोजनाचा थाटमाट

ठरलेल्या बेताप्रमाणे सायंकाळी श्री. ओळकर एक लहानशीच मोटार घेऊन आले. बहुतेक ऑस्टीन अगर ओपेल असावी. आम्ही तिघेही त्या गाडीने परळ येथील बाईंच्या निवासस्थानी गेलो. तेथील तो जेवणाचा अपूर्व थाट आणि व्यवस्था पाहून मी तर थक्कच झालो. भोजनापूर्वी बराच वेळपर्यंत बाईंनी हार्मोनियम काढून वेगवेगळे अभंग म्हणून दाखवले व कोठे काय चुकते वगैरे गोष्टी, आणि त्यानंतर नानांनी गाऊन दाखवणे अशा प्रकारात बराच वेळ गेला. त्यानंतर पंधरा-वीस प्रकारच्या जेवणाच्या पदार्थांची चव घेता घेता तास दीड तास गेला. बाईंच्या शेजारच्या पारशी कुटुंबाकडून खास करवल्या गेलेल्या भोजनाच्या पदार्थांचीही चव चाखावयास मिळाली.

नानांच्या आयुष्यातील अकल्पित प्रकार

तेथून सुमारे साडेदहा-अकराच्या सुमारास त्याच गाडीने परत निघण्याकरता नाना, ओळकर आणि मी असे माडीवरून खाली येऊन गाडीत बसलो; तोच कांहीतरी निमित्त काढून बाईंनी नानांना परत बोलावून घेतले, आणि दहा-पंधरा मिनिटांच्या कालावधीतच ते परत गाडीत येऊन बसले. नंतर आम्ही परत डॉ. सातपुते यांच्या घरी आलो. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे सकाळच्या गाडीने नाना आणि मी, उभयता परत येवल्यास आलो. त्याच दिवशी रात्रीच्या नाट्यप्रयोगानंतर नाना म्हणाले की, आपणाला मुंबईला जायला पाहिजे ! कारण काय ? तर गोहरबाईंनी बोलावले आहे, आणि काहीही विशेष असे न बोलता पहाटेच्या गाडीने ते एकटेच मुंबईस गेले.

‘ जीव कसा वश झाला ! ’

त्यापूर्वी त्यांना एकट्याने प्रवास करण्याचे कधीच माहिती नव्हते अगर तसा प्रसंग आला नव्हता. तेव्हापासून मात्र ज्या ज्या वेळी नाटक

व्यवहारी नारायणराव

नव्या नाटकाची तयारी म्हणून नारायणरावांनी ३०,००० रुपयांचे गालिचे आणले. एका स्नेह्याने त्याबद्दल विचारता नारायणराव म्हणाले—'' असं पहा, असल्या कामात कलाकुसरीचे महत्त्व अधिक असते. हे गालिचे भरजरीचे आहेत, १०-१५ हजार रुपयांचा फारतर कच्चा माल असेल; पण कलाकारांचा खर्चच. रु. २०,००० असणार ! मी कलाकार आहे आणि कलेचे चीज मला केलेच पाहिजे. जर खरी आहे. खोटी जर असती तर अल्पावधीत काळी पडली असती. नाटक हे आनंददायी असले पाहिजे. गंधर्वकंपनीची प्रतिष्ठा आणि वैभव हे माझ्या प्रेक्षकांना दिसले पाहिजे. ज्या रसिकांना असे गालिचे स्वप्नातसुद्धा पहायला मिळणार नाहीत, त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटले पाहिजे. अहो तुम्हांला माहीत आहे मी किती दुःखी आहे. प्रत्येक नाटकाच्या वेळी शोककारक घटना घडत आली आहे. माझी दहा मुले गेली. ते दुःख, ते दारिद्र्य का मी प्रेक्षकांना दाखवू ?'' अन् हसून ते म्हणाले—'' आणि असे देखावे पाहून प्रेक्षक त्यांचा बोलबाला करतील, आणि त्यामुळे लाखो प्रेक्षक मला मिळतील ना ! ''

असेल तेव्हा ते कंपनीत येऊन, नाटक झाले की, परत मुंबईस जाऊ येऊ लागले. असेच पुढे चाळीसगाव, धुळे वगैरे मुक्कामापर्यंत चालले होते. काही दिवस गेल्यानंतर पुढे ते गोहरबाईंना प्रमुख स्त्री-भूमिकेसाठी कंपनीत ठेवून घेण्याच्या गोष्टी बोलू लागले. जोपर्यंत गोहरबाई कंपनीत आली नव्हती तोपर्यंत स्वतः नाना मुंबईस जात येत असत. धुळे मुक्कामी गोहरबाई कंपनीत येऊन काही दिवस राहून गेली. पुढे कंपनी जेव्हा नाशिक येथे गेली तेव्हा गोहरबाईंनी कंपनीत येऊन राहाण्याचे ठरवले व त्याप्रमाणे बाई कंपनीत येऊन दाखल झाल्या. कंपनीच्या राहात्या जागेपासून लांब अशा गावाबाहेरील जागेत, आग्रा रोडवर नाना व गोहरबाई स्वतंत्र राहात होते.

‘कुमुद मोहे पंकांत रुतला’

स्त्री-भूमिकेसाठी गोहरबाईंची निवड आणि ती. नानांच्या जागी ! आणि त्याकरता नानांनी घेतलेले इतके प्रयास वगैरे गोष्टी आम्हां कंपनीतील कोणाही व्यक्तीस पटण्यासारख्या नव्हत्या. कारण बालगंधर्वांच्या जागी स्त्री-भूमिकेकरता त्या कर्नाटकीबाईंचा कितपत उपयोग होईल व तिच्या गाण्याचा किती प्रभाव पडेल, आणि मगदूर असेल हे सर्वजण जाणून होते. त्यातून स्त्री-भूमिकेकरता एकाच बाईचा काय उपयोग होता ? इतर स्त्री-भूमिकांच्या जागी सुद्धा स्त्रियाच पाहिजे होत्या, पण त्याबद्दल मात्र कसलीच वाटाघाट झाली नव्हती. गंधर्व कंपनीत बालगंधर्वांच्या जागी भूमिका करण्यास जर स्त्रियाच पाहिजे असत्या, तर कितीतरी सुसंस्कृत आणि कलावान् अशा उच्च घराण्यातील स्त्रियाही मिळण्यास पंचाईत पडली नसती. गंधर्वांनी अशी नुसती इच्छा दर्शविली असती तर कित्येक स्त्रिया कंपनीत भूमिका करण्यास मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने तयार झाल्या असत्या.

पु मुंबईतील गोहरबाईंच्या प्रथम भेटीनंतर ती. नानांच्या चाललेल्या हालचाली पाहून, माझेही मन कंपनीत राहाण्याविषयी प्रतिकूल बनू कोलागले, आणि लवकरच कंपनीतून निवृत्त होण्याचा मी निश्चय केला.

काही दिवसांच्या रजेनंतर मी जेव्हा नाशिक मुक्कामी परत गेलो. तेव्हा माझा हा विचार बोलून दाखवण्याऐवजी, स्त्री-भूमिकेकरता वाढविलेला माझा केशसंभार कापूनच हजर झाल्याचे पाहून ती. नानांना फार वाईट वाटल्याचे दिसले. मी कंपनीत राहाणार नसल्याचे कसे तरी सांगून, तेथूनच माझे सामानसुमान कोल्हापुरास घरी पाठवून दिले, आणि काही दिवस मुंबईत काढून घरी परत आलो. कंपनीतून इतक्या वर्षांच्या वास्तव्यानंतर आणि नानांच्या प्रेमळ छत्राखालून बाहेर पडताना मनाला यातना होत होत्या; पण प्रतिकूल परिस्थितीमुळे मला हा निर्णय नाईलाजाने घ्यावाच लागला.

श्री. लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीची स्थापना

गंधर्व कंपनीतून बाहेर पडून नाशिकहून कोल्हापुरास परत आल्यावर काही दिवस जातात न जातात तोच पुण्याहून नटवर्य श्री. गंगाधरपंत लोंढे यांच्याकडून पत्र आले की, नवीन नाटक कंपनीची सुरुवात करावयाची असून ताबडतोब पुण्यास निघून यावे. त्या वेळी लोंढे हे दादासाहेब तोरणे यांच्या ' सरस्वती सिनेटोन 'मध्ये चित्रपटात भूमिका करीत होते. सिनेमात जरी त्यांना काम असले तरी नाटकाकडेच त्यांचा एकंदर ओढा होता. त्याच दृष्टीने नवीन नाटक कंपनी सुरू करण्याचे वेड त्यांच्या मनात उद्भवले असल्यास नवल नाही. गंधर्व कंपनी सोडल्यापासून जवळ जवळ वर्षभराच्या अवधीतच नवीन " राजाराम संगीत मंडळी "ची ता. २० जुलै १९३९ रोजी स्थापना झाली. या मुहूर्ताचा समारंभ पुण्याचे श्रीमंत पापासाहेब चिपळूणकर यांच्या स्टेशन रोडवरील बंगल्यात मोठ्या थाटानें झाला. पुण्यातील ग्लोब टॉकीजसमोर असलेल्या कुलवंतवाने वाण्याच्या धर्मशाळेत कंपनीचा हा संसार चालू होऊन, ' मृच्छकटिक, शाकुंतल, सौभद्र, संशयकल्लोळ, मानापमान ' इत्यादि जुन्या नाटकांच्या तालमी किर्लोस्कर नाटक मंडळीतील जुने व मुरलेले नटश्रेष्ठ श्री. चिंतोपंत दिवेकर

यांच्या देखरेखीखाली चालू झाल्या. रंगभूमीच्या सजावटीचे आणि देखाव्यांचे वगैरे काम पुण्याचे सुप्रसिद्ध आर्टिस्ट श्री. काळे पेंटर यांच्या हाती सुपूर्त केले होते.

राजाराम संगीत मंडळीस गुणी जनांचे सहकार्य

'गंधर्व नाटक मंडळीं'तील गोहरबाईच्या वास्तव्यामुळे विटलेले श्री. बापूराव राजहंस यांची कंपनीशी फारकत होऊन ते घरी परतले होते. राजाराम सं. मंडळीला व्यवस्थापक आणि सल्लागार म्हणून त्यांचाही लाभ झाला होता. त्याचप्रमाणे नटवर्य श्री. चिंतामणराव कोल्हटकर हे तालीम मास्तर आणि प्रसंगविशेषी भूमिका करण्याकरिता मिळाले होते. ऑर्गनकरता गंधर्व कंपनीतील जुने जाणते श्री. केशवराव कांबळे यांची योजना झाली होती. त्याशिवाय श्री. महादेवराव अभ्यंकर वगैरे गंधर्व कंपनीतील नट व इतर रिकामी मंडळी या संस्थेत सामील झाली होती. किंवा उलट पक्षी, गंधर्व कंपनीतील या रिकाम्या असलेल्या मंडळींच्या प्रोत्साहनानेच श्री. लोंढे यांना नवीन कंपनी स्थापन करण्याची स्फूर्ती झाली, असे म्हणणे योग्य होईल. हल्ली सिनेमा-सृष्टीत प्रसिद्धीस पावलेले श्री. जयराम शिलेदार, श्री. वसंत शिंदे, श्री. राणे वगैरे नटमंडळी सुरुवातीपासून या नव्या कंपनीस मिळाली होती. जुन्या संगीत नाटकांबरोबरच कै. गडकरीकृत 'प्रेमसंन्यास' या गद्य नाटकाचे संक्षिप्त पण संगीत रूपांतर सुप्रसिद्ध नाटककार श्री. वसंत शांताराम देसाई यांच्याकडून करून घेऊन, त्याच्याही तालमी श्री. चिंतामणरावजी कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली यथावकाश चालू ठेवल्या होत्या. त्यातील पदांच्या चाली संगीत कलानिधी श्री. मास्तर कृष्णराव यांनी दिलेल्या असून, त्या आत्मसात् करण्याच्या दृष्टीने आम्ही पुण्यास त्यांच्याकडे जात असू.

ह्या कंपनीच्या स्थापनेनंतर पुढे कंपनी सातारा, वाई, महाड, कऱ्हाड व कोल्हापूर वगैरे ठिकाणी गेली. 'प्रेमसंन्यास' नाटकाचा प्रथम संगीत प्रयोग

कऱ्हाड मुक्कामात मोठ्या थाटात झाला. त्यातील विहलन कमलाकराची भूमिका कधी महादेवराव अभ्यंकर तर कधी श्री. नटवर्य चिंतामणराव हे करीत असत. राजाराम संगीत मंडळीचा सर्व भार व कारभार श्री. लोंढे यांच्याकडेच होता, व त्यांच्याच हातून सर्व सूत्रे चालत. हे सर्व जरी खरे असले तरी पूर्वी गंधर्व कंपनीत आम्ही उभयता असल्यापासूनच माझा आणि श्री. लोंढे यांचा काही बाबतींत मतभेद होता. केवळ एक नाट्य-संस्था उभी राहून पन्नास-साठ माणसांचे कलाजीवन सार्थकी लागत आहे, हा दृष्टिकोण ठेवून आम्ही एकमेकांतील बेबनाव वाढवत नव्हतो इतकेच ! तरी पुढे याच कारणाने आणि काही आर्थिक व्यवहारामुळे मी सातआठ महिन्यांच्या मुदतीतच त्यांना तशी जाणीव देऊन कंपनीतून मुक्त झालो.

गंधर्व कंपनी आणि ती. नानांच्याबद्दलची ओढ

राजाराम कंपनीबरोबर फिरत असतानाही मला गंधर्व कंपनीतील हालचालींची वार्ता श्री. अनंतराव लिमये (ऑर्गन मास्टर) वगैरे तिकडील मंडळीकडून पत्राने समजत असे. गंधर्व कंपनीत मी असतानाच श्री. अनंतराव लिमये यांनी लहानपणीच नाटक कंपनीत पाऊल टाकले; आणि एकंदर वातावरण पाहून, आपल्याला साधेल अशी ऑर्गन-वादनाची कला त्यांनी मेहनत घेऊन आत्मसात केली. आता ते मोठे झाले आहेत, पण आमचे पूर्वापार संबंध लक्षात घेऊन त्यांना 'अनंता !' अशी हाक मारल्याशिवाय मला राहवत नाही. मी गंधर्व कंपनीत जरी नव्हतो तरी त्या संस्थेवरील माझे प्रेम आणि नानांच्याबद्दलचा भक्तिभाव केव्हाही कमी होणे शक्य नव्हते.

गंधर्व कंपनीत परत नानांनी बोलावले

पुढे बराच काळ कायम स्वरूपाचा असा काहीच व्यवसाय नसल्याने कित्येक स्थानिक नाट्य-संस्थांतून आणि कोकणातील हंगामी नाट्य-

संस्थांतून प्रमुख पुरुष भूमिका करू लागलो. त्यापूर्वी स्त्री-भूमिकांशिवाय मी कोठेही कामे केली नव्हती. त्यामुळे पुरुष भूमिकांचा सराव करणे प्राप्त झाले. १९५० मध्ये जून महिन्यात गंधर्व नाटक मंडळीचा संचार कोल्हापूर वगैरे भागात झाला. त्या वेळी नानांनी मुद्दाम पाचारण केल्याने, माझ्या पूज्य मातोश्री शेवटच्या आजारातील अखेरचे दिवस मोजीत असताही, कामापुरता कंपनीशी संबंध ठेवून मी कोल्हापुरास परतत असे. गोहरबाई त्या वेळी कंपनीबरोबर नव्हती हीच एक समाधानाची बाब होती. तसे नसते तर नानांनीही मला तितक्या आग्रहाने बोलावले नसते. त्या मुदतीत मला पुन्हा स्त्री-भूमिका करण्याचा प्रसंग आला. ता. ३० जून रोजी माझ्या पूज्य मातोश्री स्वर्गवासी झाल्या असताही त्या दिवसांत कर्तव्य म्हणून ठरलेल्या भूमिका मला पार पाडाव्या लागल्या. गोहरबाईच्या अपरोक्ष नानांची आनंदी वृत्ती आणि मनमोकळेपणा पाहून, त्यांच्यात काही बदल झाला आहे याचा मागमूसही दिसत नसे. गोहर-बाईच्या पहाऱ्यात मात्र ते बिथरल्यासारखे व वचकून वागत असत.

मुंबईचा शतसांवत्सरिक उत्सव

नाट्यकलेचा शतसांवत्सरिक समारंभ प्रथम सांगली येथे होऊन, नंतर इतर मोठमोठ्या शहरी साजरा झाला. मुंबईस जेव्हा या उत्सवाची नाटके झाली त्या वेळी गंधर्व नाटक मंडळीच्या 'स्वयंवर' मध्ये महाराणीची भूमिका करण्याचा योग आला. ते दोन प्रयोग मरीन लाइन्स– मुंबई, व दुसऱ्या दिवशी दादर येथे झाले. नानांच्याबद्दलची भक्ती आणि गंधर्व नाटक मंडळीविषयीची आपुलकी कोणत्याही प्रसंगी मला त्यांच्या-पासून दूर जाऊ देत नव्हती. इतकेच नव्हे तर गोहरबाई आणि नाना रहात असलेल्या मुंबईच्या माहीम येथील जागेत माझे कित्येक वेळा जाणे येणे होत असे. गंधर्व कंपनीची नवीन सुरुवात करताना गोहर-बाईंनी नानांच्या सांगण्यावरून मला काही नट मंडळींची जमवाजमव

करण्यास सांगितले होते. केवळ नानांची इच्छा म्हणून त्यासंबंधात मला भाग घ्यावा लागला. १९५० च्या मेमध्ये गोहरबाईंनी नव्या स्वरूपातील ही 'गंधर्व नाटक मंडळी' सुरू केली.

परमेश्वराची अतर्क्य लीला

या सर्व गोष्टी घडल्याप्रमाणे कथन केल्या असल्या तरी ही अघटित घटना कशी काय घडून आली,—व नानांच्या आयुष्यात असल्या सामान्य स्त्रीचा प्रभाव पडावा! आणि तिच्या अर्ध्या वचनात असल्याप्रमाणे तिच्या अंमलाखाली वागावे, हे त्यांच्या सहवासात पूर्वीपासून असलेल्या कोणाही निकटवर्तीयांस पटणारी गोष्ट नव्हती. या बाबतीत जवळच्या आणि घरच्या सर्व मंडळींचा असा ग्रह झाला होता की, नानांच्यावर तसाच काही गूढ विद्येचा प्रयोग झाला असावा!—व त्यायोगाने ते भारले गेले असावेत. हीच गोष्ट त्यांच्यावर तसा परिणाम होण्याच्या दृष्टीने विश्वसनीय दिसत होती.

गुण त्यांचे का न बघावे !

आपल्या उभ्या आयुष्यात, नटाचा पेशा पत्करूनही, चारित्र्यसंपन्न आणि सत्त्वशील म्हणून ज्यांचा लौकिक! जवळ जवळ संतमालिकेत बसण्याची पात्रता ज्यांनी आपल्या आयुष्यात सद्धर्माने वागून मिळवली तो त्यांचा लौकिक अशा रीतीने मातीमोल होण्याचे दुसरे-तिसरे काही कारण नसून, त्यांच्यावर झालेल्या गूढ विद्येचा प्रयोग होय यात संशय नाही! आजकालच्या सुधारलेल्या जगात, समाजात या असल्या गोष्टींवर विश्वास बसणे अशक्य दिसत असले तरी घडून आलेल्या एकंदर स्थित्यंतरावरून दुसरी शक्यता दिसत नाही.

'कसास लावुनि अंत पाहिला'

गोहरबाईंच्या प्रथम भेटीच्या प्रसंगी मीच समक्ष होतो. तेथील भोजन वगैरे आटोपून परत निघण्याच्या वेळी, नानास बाईंनी परत

बोलावले होते. तेवढ्या दहा-पंधरा मिनिटांच्या अवधीत जर त्यांच्यावर मोहिनी प्रयोगाची तजवीज केली असल्यास न कळे! सन १९३९–४० पासून गंधर्व कंपनीत गोहरबाईचा अंमल सुरू झाला; आणि नाना तर तिच्याच आधीन असल्यासारखे वागू लागले. नाना आपल्याच स्वाधीन आहेत हे दाखवण्याकरता आणि पडताळून पाहण्याकरता, वेगवेगळ्या प्रकारांनी नानांना ती सतावत असे. त्या वेळी गंधर्व कंपनीत असलेल्या लोकांकडून हे ऐकावयास मिळत असे. नानांना या सर्व गोष्टींमुळे जरी त्रास सोसावा लागे तरी त्यांच्यावर झालेल्या प्रयोगामुळे त्यांचे त्यांना भान राहात नसावे.

असा हा थोर कलावंत– आणि रंगभूमीचा सम्राट, अशा खातेऱ्यात वावरत असलेला पाहून आम्हांलाच काय, पण सर्व गंधर्वप्रेमी जनतेस कष्ट होत असलेले दिसत होते! पूर्वीचे त्यांचे दिवसातून दोन तीन वेळ होणारे चाळीस पन्नास घागरींचे घसघशीत स्नान, देवघरातील देवांचे दर्शन, आणि कधी कधी गीता–ज्ञानेश्वरीचे वाचन वगैरे सात्त्विक भाव पाहिला, तर ही नंतरची आचारभ्रष्टता किळसवाणी वाटत होती. त्यांच्या राहणीतही गलिच्छपणा दिसून येई;– आणि त्यांचे तेजच हिरावून घेतल्यासारखी करणी झालेली दिसत होती.

‘ चंद्रा लागला कलंक ’

हा सर्व दोष त्या थोर व्यक्तीचा नसून, दुष्ट प्रवृत्तीमुळे त्यांच्यावर बाईकडून केल्या गेलेल्या मंत्रसामर्थ्याचा अगर करणीचा प्रभाव असावा, अशी माझी ठाम समजूत आहे. सरळ मार्गाने त्यांच्यावर असा अधिकार गाजवणे कोणासही शक्य झाले नसते. कारण ते तसेच निग्रही आणि आपल्याच लहरी मार्गाने जाणारे होते. त्यांच्यासारख्या, रंगभूमीवर अपूर्व कर्तृत्व गाजवलेल्या आणि जवळ जवळ साडेचार– पाच तपे असंख्य रसिकांची हृदये आपल्या दैवी नाट्यगुणांनी दिपविणाऱ्या आणि रिझवणाऱ्या अलौकिक व्यक्तीस केवळ दृष्ट लागावी म्हणूनच कलंक लागला की काय असे वाटू लागते. काही बाबतींत कलंकसुद्धा शोभादायक

ठरतो. पण या बाबतीत तो शाप ठरला. आपल्या व्यक्तित्वाचीही जाणीव उरली नाही, इतके ते परस्वाधीन झाले. काय म्हणावे या स्थितीला ?

नानांना पुढे आवाज बसण्याचा आणि दम्याचा वारंवार त्रास होऊ लागला. अशाच एका प्रसंगी बैठकीच्या वेळी त्यांना ' आ ' करता येईना की आवाज निघेना. दम्याचा जोरही वाढलेला होता. त्या वेळी तात्पुरता उपाय म्हणून एका प्रख्यात व तज्ज्ञ डॉक्टरांच्याकडून एक इंजेक्शन दिले गेले, आणि त्यामुळे आराम वाटून जेव्हा गाण्याची बैठक सुव्यवस्थितपणे पार पडल्याचे त्यांच्या अनुभवास आले तेव्हापासून हाच प्रयोग त्यांनी अनेक बैठकींच्या वेळी आणि कधी कधी नाटकाच्या वेळीही सुरू केला. हा सर्व प्रकार १९५४–५५ नंतरचा आहे. माझ्या मताने, त्यांना जो पुढे पुढे अपंगपणा प्राप्त होत गेला तो अर्धांगवाताचा वगैरे प्रकार नसून, त्यांच्याकडून कारणपरत्वे जी इंजेक्शने घेतली गेली त्यांचाच अतिरेक झाला; आणि प्रथमच त्याचा परिणाम पावलास मुंग्या येण्यापासून सुरू होऊन, दिवसेदिवस त्याचा प्रसार पिंढरीपर्यंत व पुढे गुढघ्यापर्यंत होऊन, सर्व पायावर परिणाम झाला. दुसरा पाय साधारण बरा होता तोपर्यंत त्यांना आधाराने उभे राहता येत होते, पण दुसऱ्या पायावरही तसाच परिणाम झाल्याने त्यांना आधार घेऊनही उभे राहणे कठीण होऊ लागले. आधाराने उभे राहता येत होते तोपर्यंत तशा स्थितीतही रंगभूमीवर त्यांनी आपल्या भूमिका केल्या. अशा कष्टप्रद स्थितीतही त्यांना रंगभूमी सोडून बाजूस राहणे प्रशस्त वाटत नव्हते.

' आपदा भोगि नाना '

१९५४ मध्ये दामोदर हॉल परळ येथे नानांनी ' एकच प्याला ' नाटकात काम केलेले पाहण्याचा योग आला. रंगभूमीवरून आत येताच हताशपणे खुर्चीवर ते बसून राहात व मुंग्या येऊन पाय बधिर झाल्यासारखे होतात असे म्हणत, आणि पाय चोळण्यास सांगत असत. काही

कालावधीनंतर मात्र हा पायांचा आजार विकोपाला जाऊन पायही हालवणे कठीण होऊन बसले. पायांस इतकी व्यथा होत असतानासुद्धा रंगभूमीपासून निवृत्त व्हायची मनीषा नव्हती. रंगभूमीची सेवा करण्याचे त्यांच्यासारखे असे कौतुकास्पद धाडस इतर कोणाही सामान्य नटात दिसून येणार नाही.

'थोरपणा होत ना उणा'

जनतेची बालगंधर्वावरील भक्ती व प्रेम अशा अपंग स्थितीतही कमी न होता, त्यांच्या दयनीय स्थितीबद्दल अनुकंपा व सहानुभूतीच जनतेच्या मनात वास करीत होती. त्यांना पायावर उभे राहणे शक्य होत नव्हते, अशा वेळी बडोद्याचे सुप्रसिद्ध डॉ. कीर्तने, त्याचप्रमाणे पुण्याचे काही स्पेशॅलिस्ट डॉक्टर आदी कित्येक धन्वंतरींनी या परावलंबी व दुःखद स्थितीतून त्यांना बरे वाटावे म्हणून उपचार करण्याचे ठरवून, बडोद्यास व पुढे पुण्यास मुद्दाम ठेवून घेण्याची पराकाष्ठा केली. पण औषधोपचाराचा कितपत गुण येतो हे पाहण्यापूर्वीच गोहरबाईंचा निरोप अगर तसा पत्रव्यवहार झाला की ते निघण्याची गडबड करून परत मुंबईस माहीम येथे येत असत.

गोहरबाईंनी त्यांच्या हालअपेष्टांकडे मुद्दामच दुर्लक्ष केले असे अतिशय दुःखाने म्हणावे लागते. नानांच्या सुखदुःखापेक्षा स्वतःचा स्वार्थ साधण्यापलीकडे तिचा दुसरा उद्देश नव्हता असे म्हणावे लागते. पंख कापलेल्या पोपटाप्रमाणे त्यांना पिंजऱ्यात अडकवून ठेवण्यानेच तिचा हा उद्देश साध्य होण्यासारखा होता, व हीच धडपड अखेरपर्यंत झाली. पायांना अधूपणा आला होता तरी कित्येक वर्षेपर्यंत त्यांचा आवाज काम देत होता, व तशा स्थितीतही त्यांना गाण्या-भजनांची आमंत्रणे येत असत. अशा त्यांच्या विकलावस्थेतसुद्धा त्यांनी कित्येक मैफली रंगवल्या, आणि आपल्या पूर्वीच्या स्वर्गीय गायनाचा आस्वाद श्रोत्यांना

दिला असे अनुभव आहेत. या सर्व कार्यक्रमांच्या बाबतीतला व्यवहार पाहणे, ठरवणे व त्याप्रमाणे हिशेब घेणे हे काम अर्थात गोहरबाईकडेच असे.

लोकांना बालगंधर्व पाहिजे होते;— ते कसेही असले तरी त्यांच्या-बद्दल लोकांचे प्रेम व आदरभाव केव्हाच कमी झाला नव्हता. त्यांना कित्येक आमंत्रणे येत. त्यांनी आपल्याकडे येऊन आरामाने राहावे आणि त्यांच्या आरोग्याकरता यथोचित उपचार करावेत अशा सदिच्छेने कित्येक धनिकांनी त्यांना पाचारण केले; पण अशा एकाही स्थानी त्यांनी अल्प-कालसुद्धा घालवला नाही. यदाकदाचित राहिलेच, तरी बाईच्याकडून पत्र वगैरे येताच, हट्टाने परत मुंबईस जाण्याचा हेका धरला. काही औषधोपचार झाले असते तर त्यातूनही त्यांना थोडा आराम वाटला असता. पण बाईंनी त्यांना आपल्या निर्बुद्धपणाने (?) आपल्याच ताब्यात खिचपत पाडून ठेवून, एक प्रकारचा सूडच उगवला असे म्हणावे लागेल! पूर्वी प्रयत्न करूनही बालगंधर्व तिच्या हाती लागले नव्हते; कारण कंपनीचे मॅनेजर श्री. बापूराव राजहंस आणि कुटुंबातील मंडळींच्या विरोधामुळे पूर्वी तो योग आला नव्हता,— त्याचाच हा सूड असावा; आणि हाच आसुरी आनंद गोहरबाईला पाहिजे होता! गंधर्वांवरील सत्तेचा दिमाखही दाखवावयाचा होता.

भक्तिविना नाही वासना

मोठमोठ्या धनिक व लक्ष्मीपुत्रांशी बालगंधर्वांचा परिचय होता. गंधर्वांनी आपला पाहुणचार व सेवा घ्यावी अशा इच्छेने व आशेने ते बालगंधर्वांची मनधरणी करीत असत. बालगंधर्वांनी गेल्या पन्नास वर्षांत जी लहानथोर महाराष्ट्र रसिकांची निरलस आणि अंतःकरणपूर्वक सेवा केली, त्याबद्दलची कृतज्ञता आणि गुणाविषयी आदरभाव मनात वसत असल्याने, सर्वांना ते हवेहवेसे वाटावेत यात नवल नव्हते. अशा

कित्येक ज्ञात व अज्ञात व्यक्ती बालगंधर्वांवर प्रेम करणाऱ्या होत्या. प्रसंगोपात्तच त्यांचा हा भक्तिभाव दिसून येई. जनतेने तर त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले होते. असेच एक उदाहरण म्हणजे, परमुलखातले पण नानांवर व त्यांच्या स्वर्गीय गायनावर बेहद्द खूष असणारे श्रीमान शेठ लक्ष्मीचंद ईश्वरदास हे कराचीहून वर्षातून ठराविक वेळी पुण्या-मुंबईस येत असत व बालगंधर्वांच्या नाट्य-संगीताचा मनमुराद आस्वाद घेत. हा क्रम कित्येक वर्षे चालला होता व घरोबाही वाढला होता. अशा या लक्षाधीश लक्ष्मीपुत्रांनी, स्वतः ते मृत्युशय्येवर पडले असता कराचीत बालगंधर्वांनी यावे म्हणून फार खटपट केली; परंतु शेवटी बालगंधर्वांची आणि त्यांची भेट न होता त्यांचे गायन ऐकून इहलोकची यात्रा संपविण्याची त्यांची शेवटची इच्छा,-अखेर त्यांच्या गाण्याच्या रेकॉर्डस् लावून भागवावी लागली! नानांच्यावरील प्रेमासाठी त्यांनी लाखांवर देणगी राखून ठेवली होती असे समजले!

बालगंधर्वांचे पुण्यास असलेले थोरले पुतणे श्री. वसंतराव राजहंस व पुण्याचेच श्री. बापूसाहेब परांजपे ॲडव्होकेट हे नानांना विकलावस्थेतही त्यांच्या कलानेच वागून, त्यांची काही तरी सेवा घडावी या सद्हेतूने व प्रेमाने पुण्यास आपल्या घरी आणून ठेवीत असत. काही काळ नानांस हा पालट सुखावह वाटत असे. स्वतःच्याच घरात असल्याने ते आनंदात व खुशीत असल्याचे दिसून येई. अशा नानांच्या स्थितीत श्री. वसंतराव यांनी व त्याचबरोबर त्यांचे कनिष्ठ बंधू श्री. पांडुरंगराव राजहंस यांनी अखेरपर्यंत संधी मिळेल त्या त्या वेळी जीवाभावाने यांची सेवा-चाकरी केली.

अंतरात्मा तळमळून केलेली सेवा

श्री. बापूसाहेब परांजपे यांनीही मोठ्या भक्तीने त्यांची सर्व प्रकारे निगा राखून सेवा केली. कित्येक वेळा नानांना बोलतानाही दमा

लागल्यासारखे होई व आवाजही उमटत नसे. बापूसाहेब हरतऱ्हेने त्यांचे मन रिझवण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या स्थितीचा त्यांना विसर पडून त्यांनी आनंदात असावे, असा त्यांचा प्रयत्न असे. कित्येकदा ते स्वतः नाट्यगीते म्हणत किंवा रेडिओ वगैरे लावीत. रेडिओवर एकदा नानांचे नाटकातील पदांचे रेकॉर्ड लागले असताना ते ऐकून त्यांच्या डोळ्यांना पाणी आले, आणि हताशपणाने त्यांच्या तोंडून उद्गार निघाले,– 'हा मीच का गातो आहे? हाच का बालगंधर्व! द्रौपदी, रुक्मिणी–हेच का हातपाय?' असे आपल्या पसरलेल्या हातपायांकडे पाहून त्यांनी म्हटले. असा हा प्रसंग त्यांच्यावर यायला नको होता!

श्रीमंतांनी मनोभावे केलेली प्रेमसेवा

श्रीमंत राजेसाहेब पटवर्धन (बुधगावकर) हे श्री. बालगंधर्वांचे अतिशय प्रेमी, चाहते व त्यांच्या गाण्याचे षोकी! नानांच्या अशा अपंग अवस्थेतदेखील, श्रीमंतांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी नानांना आपल्या संस्थानी वातावरणात कित्येक वेळा ठेवून घेऊन उत्तम व्यवस्था राखली होती. तेथे त्यांना कसलीच उणीव अगर कमतरता भासू दिली नाही. आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणे त्यांचा दिनक्रम चालत असे. सकाळी अंगमालिश, वेळच्या वेळी खाणेपिणे, पाहिजे तेव्हा दूध, दोन प्रहरनंतर चार वाजता नानांच्या मनरंजनाकरिता नियमितपणे हजर राहणारे संगीताचे साथीदार, आणि जरूर तेव्हा लागणारा हजर नोकरवर्ग,–असा एखाद्या संस्थानिकासारखा बडेजाव राखला जात असे. डोळ्यांनी पाहिलेल्या या गोष्टी आहेत. असेच त्यांचे दिवस मजेत जातात न जातात तोच माशी शिंकत असे,–आणि मुंबईहून तसा संदेश येताच ते बेचैन होऊन आपणांस मुंबईला पोचवण्याबद्दल ध्यास घेत! त्यांना मुंबईची ओढ लागे.

दुर्दैवाने छळिले तरी

आपल्या शारीरिक अवस्थेबद्दल त्यांनी तोंडातून 'ब्र'ही काढलेला आम्हा कोणाला आठवत नाही. शेवटपर्यंत त्यांना एकाच गोष्टीचे दुःख

होत होते. ते म्हणजे आपल्याला गाता येत नाही ! परमेश्वराने आपला गळा शाबूत ठेवायला पाहिजे होता असे मात्र ते नेहमी म्हणत. त्यांचे दुःख हे एकच होते. आवाज चालत नव्हता, सूर लागत नसे, तरी आमच्यापैकी कोणी त्यांना भेटायला गेले तर त्याला हार्मोनियम (ऑर्गन) काढायला लावून, सूर लावायचा प्रयत्न करीत. कधी कधी त्यांना पदांचे शब्दही आठवत नसत; आणि– पुढे काय ? हे कसे ? ते पद कसे ?– असे विचारीत आणि स्वतः म्हणण्याचा प्रयत्न करीत. आपल्या शारीरिक अवस्थेबद्दल अगर व्यथेबद्दल दुःख असलेले सूक्ष्म चिन्हही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नसे. त्यांच्या बोलण्याचा विषय नाटक आणि संगीत हाच असे. त्याच विषयांच्या पूर्वस्मृतीत त्यांचे मन रमून राही. आपल्या कलेशी अशा स्थितीतही ते समरस झालेले दिसत. शरीराचा आणि त्यांचा काहीच संबंध नसल्यासारखी त्यांची वृत्ती असे. सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. आप्पासाहेब फडके यांनी त्यांना 'अवलिया' म्हणून संबोधलेले किती सार्थ होते ते अशा कित्येक प्रसंगी प्रतीत होई.

अजून भीमसेनची तोडी ऐकायची आहे !

१९६४ नोव्हेंबरमध्ये नाना पुण्यास श्री. वसंतराव राजहंस यांच्या घरी होते. अर्थात तेच त्यांचे घर होते. आम्ही त्यांना भेटून जावे अशी वसंतरावांनी इच्छा दर्शविली होती. पुण्यास जाऊन येणे हे सोपे असून आमचीही त्यांना पाहण्याची फार इच्छा असल्याने आम्ही दोघेही समाचारास गेलो होतो. दोनचार दिवसच आमचा तेथे मुक्काम होता. त्या वेळी कै. श्री. सवाईगंधर्वांच्या पुण्यतिथीनिमित्त चालू असलेल्या संगीत सभेस श्री. पंडित भीमसेन जोशी यांनी नानांना अगत्याने व आर्जवून आमंत्रण देऊन, त्यांची नेण्या-आणण्याची, आणि तेथे आरामात बसण्याची सिद्धता केली होती. आम्ही नानांच्याबरोबर शेवटच्या (तिसऱ्या) रात्री सभेस हजर राहिलो. सर्व रात्रभर नृत्य, संगीत आणि

शेवटचे स्वयंवर

डिसेंबर १९३४ मधील तो रविवार. कोल्हापूर येथील पॅलेस थिएटर तुडुंब भरले होते. कारण गंधर्व कंपनीचा शेवटचा खेळ होता तो. अन् त्यातून 'स्वयंवर'. कोल्हापुरातील झाडून सारे रसिक हजर होते. हा खेळ झाल्यानंतर गंधर्व कंपनी बंद होणार होती. बालगंधर्व प्रभात फिल्म कंपनीत जाणार होते.

आदल्या दिवशीचा प्रयोग जमला नव्हता. नारायणराव नाराज होते. ऑर्गनवर हरिभाऊंचे नाव यादीत होते. नेहमीप्रमाणे प्रयोगाच्या आधी हरिभाऊ नारायणरावांच्या पाया पडण्यास गेले. नारायणराव म्हणाले-"कालचा प्रयोग जमला नाही. आज तुम्ही आता काय उजेड लावणार पाहू या. मला सूर कळत नाही." हरिभाऊ काहीच बोलले नाहीत. नाटक सुरू झाले. हरिभाऊंनी पांढरी चार लावली. 'नाथ हा माझा' रंगले; 'स्वकुल-तार कसुता'ला तर टाळयांवर टाळया पडल्या. हरिभाऊ सांगतात, "त्या दिवशी नारायणरावांच्या चेहेऱ्याभोवती एक दिव्य तेजोवलय दिसत होते! आवाज पृथ्वीसारखा गोलाकार वाटत होता."

नाटक संपले, हरिभाऊ देशपांडे आत गेले. नारायणरावांचा निरोप घ्यायचा होता. डोळे अश्रूंनी भरले होते. कंठ दाटून आला होता. कसे-बसे हरिभाऊ म्हणाले- "नाना, मी जातो..."

"अरे जातोस कुठं वेड्या!- मी तुला प्रभात-मध्ये घेणार आहे-जेवायला चल आधी-" तो नटश्रेष्ठ म्हणाला!

वाद्यांचे झंकार चालू होते. नृत्यकलानिपुण असे श्री. बिरजूमहाराज यांच्या साभिनय नृत्यकौशल्याने डोळ्यांचे पारणेच फेडले. नानाही त्या धुंद वातावरणात दंग झालेले दिसले. सौ. पद्माने मध्यंतरानंतर, आता आपण घरी जाऊ! पायाला वांब येताहेत व अवघडल्यासारखे होईल— असे म्हणताच ते म्हणाले, ' बाप्पा! मला अजून भीमसेनची ' तोडी ' ऐकायची आहे!' त्या वेळी पहाटेचे पाच वाजले होते. शेवटी श्री. भीमसेन यांचे गायन झाले, तेव्हा आम्ही चांगले उजाडल्यावर घरी परतलो.

गोहरबाईंचा आकस्मिक मृत्यू

पुण्याहून परत कोल्हापुरात आल्यावर पाच-सहा दिवसांनीच बातमी समजली की, गोहरबाई कर्नाटकी यांचे मुंबईस देहावसान झाले. ' आपली प्रकृती बरी आहे, काळजी करू नये, ' असे नानांस त्यापूर्वी तीन-चार दिवस गोहरबाईंकडून पत्र आलेले असल्याने, नाना पुण्यास खुशालीत राहिले होते. ही अचानक बातमी समजताच, श्री. वसंतराव नानांना ताबडतोब माहीम येथे घेऊन गेले. अशा दुःखद प्रसंगी आम्हीही नानांस भेटणे आवश्यक वाटल्याने, काही दिवसांनंतर ता. ७ डिसेंबर १९६४ रोजी उभयता मुंबईस गेलो. त्यांना मानसिक त्रास होऊ नये आणि दुःखाचा विसर पडावा या दृष्टीने, काही दिवस तरी पुण्यास अगर शिरडीस श्री. साईबाबांच्या दर्शनाच्या निमित्ताने अन्य कोठे तरी न्यावे असा विचार होता. तसे आम्ही त्यांना म्हटल्यावर, गोहरबाबाचे दिवस (४० दिवस) झाल्याशिवाय कोठेच हालता येत नसल्याचे त्यांनी सांगितले. शिरडीस श्री. साईबाबांच्या दर्शनास जाण्याची त्यांची बरेच दिवसांची इच्छा होती.

गोहरबाईंच्या मृत्यूपूर्वी नाना पुण्यास असताना जरी त्यांची दिनचर्या दुसऱ्यांच्याच मदतीने होत होती, आणि उठवून बसवणे,

झोपवणे इत्यादी सेवाशुश्रूषा करावी लागत असली तरी एकंदरीत त्यांची वृत्ती उल्हासित होती. गोहरबाईंच्या आकस्मिक मृत्यूनंतर मात्र हळूहळू प्रकृती घसरू लागली. गोहरबाईंच्या पश्चात श्रीमती 'आशामा' या गोहरबाईंच्याबरोबर पूर्वीपासून असलेल्या बाईंनीच त्यांची परिचर्या करण्याचे पत्करले होते. नानाही तिला आपली मानलेली मुलगीच असे म्हणत असत.

आजारातील विविध विकृती

पुढे काही दिवसांनंतर श्रीमती आशामा यांच्याकडून 'नानांची प्रकृती जास्त बिघडली आहे, बोलता येत नाही.' अशा मजकुराचे पत्र आल्यावरून आम्ही माहीमला गेलो होतो. त्या वेळी दोन दिवसांपूर्वीपेक्षा प्रकृती बरी असल्याचे समजले. नाना आम्हांस ओळखतात किंवा नाही हे अजमावण्याकरता आशामाने जवळ जाऊन 'कोण आले आहे? समजले का?' असे (मुसलमानीत) विचारले. त्यांनी थोडे लक्ष देऊन व ध्यानात आल्यासारखे करून म्हटले की, 'हा पद्या आला आहे!' असे म्हणून उठवून बसण्यास सांगितले. बहुतेक आवाजावरून त्यांनी ओळखले असावे. त्यांना मोतीबिंदू झाला असल्याने दिसण्याचे मानही कमी झाले होते. स्मरणशक्तीही क्षीण झाल्याने आता बोललेले मग आठवत नसे. दोन-तीन दिवसांनंतर आम्ही परत फिरलो.

काय म्हणावे या स्थितीला?

पुन्हा एकदा अशीच प्रकृती अत्यवस्थ असल्याचे आशामाबाईचे पत्र आल्यावरून ता. २ डिसेंबर १९६६ रोजी माहीम येथे गेलो असता, पूर्वीपेक्षाही या वेळची स्थिती काळजी वाटण्यासारखी दिसली. आम्ही गेल्यावर त्यांना उठवून बसवण्यात आले. पण ते पहात मात्र रहात. तोंडातून शब्द स्पष्ट उमटत नसत, व काही तरी न समजण्यासारखे गुळमुळीत उच्चारत,–आणि शेवटी हुंदके देऊन रडू लागत. मध्येच

हसल्यासारखे करून बोलण्याचा प्रयत्न करीत. आतल्या आत कोंडमारा झाल्यासारखी दयनीय अवस्था झालेली दिसत होती.

अंतिम विकोपावस्था

श्री. वसंतराव राजहंस यांचे मुंबईहून एक्स्प्रेस पत्र आल्यावरून आम्हा उभयतांची मुंबईची तिसरी आणि शेवटची खेप झाली. त्या वेळी नानांना माहिमच्या निवासस्थानातून दादरच्या हिंदू कॉलनीतील 'कॉलनी नर्सिंग होम'मध्ये हालवले होते. ता. ११ एप्रिल ६७ रोजी सायंकाळी आम्ही तेथे पोचलो. दोनतीन दिवसांपूर्वीपासून ते बेशुद्धावस्थेतच होते. असंख्य स्नेही मंडळी व ऋणानुबंधी लोक त्यांच्या समाचारास आणि प्रकृतीची चौकशी करण्यास येत, आणि त्यांची ती दीनावस्था पाहून हळहळत असत. श्री. वसंतराव राजहंस, डॉ. भास्करराव व सौ. नलिनीबाई वाबळे वगैरे कुटुंबीय मंडळी जवळच होती. त्यांचा धाकटा पुतण्या चि. पांडुरंग राजहंस हा मुंबईस येऊन त्यांच्या सेवेसाठी काही दिवस राहिला होता. माझ्या दृष्टीने नानांची प्रलयावस्थाच होती. आम्हा सर्वांस मोठी आशा वाटत असे की, या अवस्थेतूनही ते काहीसे बरे होतील आणि आपल्या मंडळीशी चार शब्द तरी बोलतील;—निदान सर्वांना पाहू शकतील. सर्व प्रकारचे डॉक्टरी उपचार अहर्निश चालू होते. रक्तपुरवठा, ऑक्सिजन देणे, अन्न पुरवणे, इंजेक्शन्स— सर्व प्रकारचे उपाय रात्रंदिवस वेळच्या वेळी चालत असत. मोठमोठे डॉक्टर्स व स्पेशॅलिस्ट येऊन मोठ्या प्रेमाने आपला सल्ला देऊन जात, आणि त्या त्याप्रमाणे उपचार चालत.

'बहू केली आस'

एखादे वेळी त्यांना हुशारी वाटून, डोळयांची उघडझाप होई तेव्हा आशा वाटायची की, आता ते पाहतील व काही तरी बोलण्याचा प्रयत्न करतील ! पण व्यर्थ ! हा योग आज येईल, उद्या येईल, असे

म्हणता म्हणता दहा-पंधरा दिवस असेच गेले. काहीच फरक पडत नाही असे पाहून, कोल्हापुरास परतणे आवश्यक असल्याने आम्ही तेथून परत आलो. इतर आप्तेष्ट मंडळीही जवळ असल्याने आमची उपस्थिती तेथे आवश्यक होती असेही नव्हते,—आणि तेथे राहणेही अडचणीचे होत होते.

' दहती बहू मना नाना कुशंका '

मुंबईहून आम्ही कोल्हापुरास आलो असलो तरी मुंबईहून येणाऱ्या वृत्तपत्रांवर व केव्हा पत्र येते या गोष्टीकडे आमचे सर्व लक्ष केन्द्रित झालेले असे. असे बरेच दिवस गेले, आणि नानांस ता. १ मे रोजी मुंबईहून पुण्यास आणून ठेवल्याचे समजले. त्यांची नर्सिंगची व्यवस्था पुण्यास जिमखान्यावरील डॉ. माईणकर यांच्या नर्सिंग होममध्ये केल्याचे समजले. आम्हांस पुण्याला जाऊन राहणे शक्य नसल्याने, आपल्या ती. स्व. आजोबांची काही तरी सेवा घडावी या उद्देशाने आमचा मुलगा चि. विलास (गोविंद) यास पुण्यास डॉ. बाबळे यांच्याकडे म्हणजे त्याच्या मावशीकडे पाठवले. एक महिनाभर शक्य होईल ती त्यांची सेवा केली. नंतर कॉलेजमध्ये प्रवेश मिळवणे वगैरे कारणाकरता त्याला कोल्हापुरास परतणे आवश्यक झाले.

' गेला रवि अस्ताला... '

काही दिवसांनंतर त्यांना जहांगीर नर्सिंग होममध्ये ठेवल्याचे समजून आले. पण प्रकृतीत म्हणावा तसा काहीच फरक नव्हता असे पुण्याच्या पत्रांतून समजत होते. असेच दिवस जात असता, १५ जुलै ६७ रोजी ३-१५ वाजता त्यांचे दुःखद निधन झाल्याची ती दुष्ट बातमी आकाशवाणीने जगजाहीर केली ! जवळ जवळ शंभर दिवसांच्या बेशुद्धावस्थेत असतानाच त्यांना मृत्यूने आमच्यातून ओढून

नेले. त्यांच्या जीवित्वाबद्दल सर्वांचीच आशा जरी खुंटलेली असली, तरी प्रत्यक्ष मृत्यूचा घाला पडणे,–हा प्रसंग आप्तस्वकीयांसच नव्हे तर सर्व महाराष्ट्र रसिकवर्गास दुःखदायक आणि हळहळावयास लावणारा होता.

‘कटु वार्ता ती ऐकता’

ही बातमी कानावर येताच कशाचेही भान न राहता आम्ही उभयता पुण्यास जाणाऱ्या पहिल्या गाडीत बसलो. दुसऱ्या दिवशी पुण्यास पोचल्यावर काय दृश्य दिसेल,– आणि त्यांच्या अंतकाळचा सोहळा पाहणे कसे शक्य होईल,– वगैरे विचार सर्व रात्रभर अखंड चालले होते. मनात आले की, महाराष्ट्र रसिकांची पन्नास-साठ वर्षे अतुलनीय अशा दैवी नाट्यगुणांनी मनोभावे अखंड सेवा घडल्यानंतर, या असामान्य नटसम्राटाला शारीरिक दुर्बलता प्राप्त झाल्यामुळे, कदाचित अशी इच्छा होणे साहजिक होते की, जनतेची आपल्याकडून अंतःकरणपूर्वक भरपूर सेवा झाली आहे; यापुढे ते शक्य नाही,–म्हणून उरलेले आयुष्य आराम घेत पडून राहावे. परंतु या अशा शारीरिक अवस्थेत स्वस्थ पडून राहण्याची त्यांची वृत्ती नव्हती. शरीर उभे राहू शकत होते तोपर्यंत त्यांनी रंगमंचकावरून आपली सेवा रुजू करण्याची पराकाष्ठा केली. पायांना दुर्बलावस्था आलेली असतानाही त्यांच्या इच्छा–आकांक्षा दुर्दमनीय अशा होत्या. ‘नाट्य हेच जीवन’ असे त्यांचे कलाजीवनाचे परस्पर संबंध होते. रुग्णशय्येवर असूनही त्यांच्या मनाची भरारी फार मोठी होती. ‘तुकाराम’ नाटक रंगभूमीवर आणून त्यात तुकारामाची भूमिका करण्याची त्यांची शेवटची ज्वलंत इच्छा होती! गंधर्व नाटक मंडळी सरकारी मदतीने उभी करून ती चालू ठेवण्याचे, व स्वतःच्या देखरेखीखाली तिचे अखंड वास्तव्य राखावयाचे होते.

आपल्या गंधर्व गायनाने आणि शुद्ध आचरणाने वरचढ झालेले पाहून,– आता आपले स्थान पटकावतील आणि आपल्याला कमीपणा

गंधर्वांच्या गायनासाठींच जे जगले



कै. लक्ष्मीचंद्र इशरदास (कराडी)

मायबाप ! जोहार !



येईल या धास्तीने इतर गंधर्व-किन्नर आणि अप्सरांच्या मेळाव्यात त्यांच्याबद्दल असूया निर्माण होऊन, त्या सर्वांनी संगनमताने तो काटा दूर करण्याचा— म्हणजे त्यांची तेथून हकालपट्टी करण्याचा मनसुबा रचला असावा. इंद्राजवळ गाऱ्हाणे नेले असता, इंद्रालाही ते खरे वाटून, "तू मर्त्य लोकात जन्म पावशील" असा त्यांना शाप दिला. पण या मृत्युलोकीसुद्धा लहानपणापासून त्यांनी गंधर्वयुग चालू करून, अप्सरेच्या रूपाने या भूतलावर संगीत स्वर्ग निर्माण केला! लहानपणीच 'बालगंधर्व' हा किताब मिळवून, वृद्धावस्थेपर्यंत त्याची जोपासना केली, आणि अखेरपर्यंत ते "बाल"गंधर्व म्हणून आपल्या कलेत मिरवले! वयाने वृद्ध झाले तरी त्यांच्या कलेला वार्धक्य आलेले नव्हते,—ते बालच राहिले.

ग्रहदशेच्या फेऱ्यातील अंतर्दशा

भूलोकीच्या या गंधर्वाविषयीची कीर्ती स्वर्गलोकापर्यंत पोचत होती यात आश्चर्य नव्हते. त्यांचा हा भूलोकीचा उत्कर्षही स्वर्गातील त्यांच्या सहाध्यायांना न खपून की काय, तेथूनही त्यांनी या भू-गंधर्वाला अन्यान्य रीतीने उपद्रव देण्याचा आणि कलंकित करण्याचा डाव मांडला. ज्यांनी आपल्या उभ्या हयातीत स्व-स्त्रीशिवाय इतर स्त्रीजातीला माय—बहिणी, आणि जनता-जनार्दनाला माझे मायबाप— आणि 'देवा' या नावाशिवाय संबोधले नाही!—अशा निर्मळ मनाच्या, उच्च विचारसरणीच्या, आणि साधुवृत्तीच्या विभूतीला एका चेटकीच्या हातून चेटूक करवून,— त्यांच्या स्वर्गीय गायनादी नाट्यगुणांस कलंकित, आणि त्यापासून वंचित केले! जणू काय त्यांचे हातपायच मोडून असा बंदोबस्त केला की त्यांनी उभेसुद्धा राहू नये.

मनात विचारचक्र चालूच होते. झोप येण्याचा प्रश्नच नव्हता. नानांचे सारे आयुष्य डोळ्यांसमोरून जात होते. त्यांचे अंत्यदर्शन तरी व्हावे यासाठी आमची धडपड चालू होती. पण पुण्यास स्टेशनवर

पहाटे पोचताच,–त्यांचा अंत्यसंस्कार आदले दिवशीच विनाविलंब उरकला गेला !--हे समजताक्षणीच मनःक्षोभ मात्र झाला ! त्यांचे अंत्य-दर्शनही न होता, आम्हांस विन्मुख स्थितीत परतावे लागणार याचे फार वाईट वाटले. देव-दर्शनाच्या इच्छेने यात्रा करावी, आणि देव-दर्शनच दुर्लभ व्हावे अशी अवस्था झाली. नाही म्हणायला त्यांच्या रक्षा-विसर्जनाच्या कार्यास हात लागला हेही भाग्यच ! त्यातील काही रक्षा श्रीक्षेत्र नृसिंहवाडीस दत्तपादुकांसमक्ष कृष्णा–पंचगंगासंगमी विसर्जित केली !–आणि स्मृतीदाखल काही अंश घरी देवासान्निध जपून ठेवला आहे.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

परिशिष्ट

मराठी नाट्यपरिषदेतर्फे पद्मभूषण नटसम्राट बालगंधर्व यांच्या अमृत-महोत्सवानिमित्त मुंबई येथे दि. ८ फेब्रुवारी १९६४ या दिवशी दिलेले मानपत्र

बालगंधर्व,

भारतीय रंगभूमीवरील अत्यंत आदराचे आणि अभिमानाचे पद भूषविणाऱ्या आपल्यासारख्या कलावंताचा आजच्या या शुभप्रसंगी गौरव करताना आम्हांला अत्यंत आनंद होत आहे.

"बालगंधर्व" या शब्दाचा उच्चार करताच महाराष्ट्राला नेहमी लोकमान्य टिळकांची आठवण होते. आपल्या मोहक स्वरूपाला आणि गंधर्वतुल्य गायनाला अनुलक्षून लोकमान्य टिळकांनी १८९८ साली "बालगंधर्व" हा शब्द उच्चारला आणि तेव्हापासून नारायण श्रीपाद राजहंस या नावापेक्षा 'बालगंधर्व' या नावानेच आपण ओळखले जाऊ लागलात. केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर अखिल भारतात जसे एकच "लोकमान्य" झाले - तसे "बालगंधर्व" ही एकच झाले. आपण आपल्या वयाची पंचाहत्तर वर्षांची मर्यादा ओलांडलीत म्हणून अखिल महाराष्ट्रातर्फे हा महोत्सव साजरा करताना असंख्य रसिकांना आज आनंद आणि धन्यता वाटत आहे.

ज्या जमान्यात मराठी रंगभूमीवर स्त्रियांच्या भूमिका पुरुषांना कराव्या लागत होत्या, त्या जमान्यात १९०५ सालच्या गुरुद्वादशीच्या सुमुहूर्तावर लोकमान्य टिळकांच्या आणि शाहू छत्रपती महाराजांच्या आशीर्वादाने आपण किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केलात. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या "शाकुंतल" या पहिल्या संगीत नाटकातील शकुंतलेची भूमिका ही आपल्या असामान्य कारकीर्दीतील आपण केलेली

पहिली भूमिका पाहून रसिक तत्काल मंत्रमुग्ध झाले,—खरे सांगावयाचे म्हणजे, आपण प्रेक्षकांवर त्या दिवशी टाकलेल्या मंत्राचा अंमल अजूनही उतरलेला नाही.

अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंदराव देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, आणि राम गणेश गडकरी अशा महाराष्ट्राच्या थोर थोर नाटककारांनी लिहिलेल्या नाटकांतून आपण सुभद्रा, शारदा, रेवती, सरोजिनी, भामिनी, देवयानी, रुक्मिणी आणि सिंधू-अशा अनेक भूमिका अत्यंत कुशलतेने केल्या. स्त्रीच्या अंतरंगाचे दर्शन घडवून पुरुषाने केलेल्या स्त्री-भूमिकेत सर्वस्वी असामान्य आणि अजरामर असे यश आपण संपादन केले.

भास्करबुवा बखले यांच्यासारख्या थोर आणि रसिक गायक–श्रेष्ठाच्या तालमीत आपल्या नाट्यसंगीताच्या संपदेची जोपासना झाली. कारुण्य, शृंगार आणि भक्ती अशा निरनिराळ्या रसांचा उत्कर्ष आपल्या संगीताने साधून, आपण मराठीतले संगीत नाटक अत्यंत लोकप्रिय आणि परिणामकारक केले हे तर खरेच, पण आपल्या गायनातला सोपेपणा हा अवघडापेक्षाही अधिक अवघड ठरला आहे. विलक्षण सुरेलपणा आणि सूक्ष्म लयकारीचे अत्यंत मोहक दर्शन हे आपल्या गायकीचे वैशिष्ट्य आहे. स्वरांचा आणि शब्दांचा इतका मनोहर संगम ऐकण्याचे भाग्य लाभल्याची कृतज्ञता ही शब्दातून व्यक्त होणे केवळ अशक्य आहे. शास्त्रोक्त संगीत अखिल महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय करून नाट्य-संगीताचे एक नवे घराणेच आपण निर्माण केले. ‘मराठी नाट्य-संगीत’ म्हणजे ‘बालगंधर्व-संगीत’ असे समीकरण झाले आहे.

१९१३ साली आपण गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली, तेव्हापासून रंगभूमीच्या सेवेसाठी आपण असामान्य कष्ट केले आहेत. इतकेच नव्हे, तर रंगभूमीच्या वैभवाचा उत्कर्ष साधण्यासाठी वैयक्तिक

लाभाकडेसुद्धा लक्ष दिले नाही. गंधर्व नाटक मंडळीचे मालक या नात्याने आपण थोर थोर कलावंतांचा सतत समभावाने संग्रह केला. १९०५ साली आपण आपल्या कारकीर्दीतली पहिली आणि १९५५ साली शेवटची भूमिका केली. आपली पन्नास वर्षांची ही असामान्य कारकीर्द म्हणजे मराठी रंगभूमीच्या सेवेसाठी तिच्या निष्ठावंत सेवकाने केलेली एक प्रदीर्घ तपश्चर्याच आहे !

१९५५ साली भारताच्या संगीत नाटक अकादमीने आपल्या अभिनय-गुणांचा सत्कार करण्याकरिता आपल्याला राष्ट्रपतिपदक दिले, आणि गेल्याच महिन्यात भारत सरकारने आपल्यास 'पद्मभूषण' ही पदवी देऊन आपला असामान्य गौरव करून मराठी रंगभूमीचा गौरव केला आहे. आपल्यासंबंधी "शतकात एकच" असे उत्स्फूर्त उद्गार गेल्या अर्धशतकात असंख्य रसिकांच्या मुखांतून लक्षावधी वेळा आले असतील. याहून मोठा गौरव आम्ही तरी काय करणार.

परमेश्वराने आपल्याला दीर्घ आयुष्य आणि आरोग्य द्यावे अशी या प्रसंगी आम्ही प्रार्थना करतो.

अलौकिक प्रयोग

१९२१ च्या जुलै महिन्याच्या २२तारखेस मुंबई येथे बालीवाला थिएटरात केशव - नारायण यांचा संयुक्त मानापमान नाटकाचा प्रयोग झाला. या प्रयोगाला सोळा हजार आठशे रुपये उत्पन्न झाले. तिकीट विक्री सुरू झाल्यापासून अवघ्या चाळीस मिनिटांत सर्व तिकिटे संपली. सर्वांत अधिक तिकिट १०० रुपयांचे होते. आजवर एवढे तिकीट कोठल्याच नाटकास ठेवलेले नव्हते. तिकिटे न मिळालेले हजारो प्रेक्षक भर पावसात थिएटरच्या बाहेर उभे होते! या प्रयोगातील पात्र-योजना पुढीलप्रमाणे होती : धैर्यधर- केशवराव भोसले; भामिनी- नारायणराव; अक्कासाहेब - चापेकर; लक्ष्मीधर- गणपतराव बोडस; विलासधर-वाला- वलकर; कुसुम- रानडे. - ऑर्गनवर बापुराव पेंढारकर होते. सायंकाळी साडेसात वाजता सुरू झालेला हा अलौकिक प्रयोग पहाटे अडीच वाजता संपला.

